# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शुक्रवार ११ जुलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ १०









## गणेशोत्सव महाराष्ट्राचा महोत्सव म्हणून घोषित

**मुंबई/प्रतिनिधी :**महाराष्ट्रात भाजप नेते आशिष शेलार यांनी गणेशोत्सव हा आता राज्योत्सव म्हणून घोषित केल्याची घोषणा केली आहे. हे मुंबईच्या पावसाळी अधिवेशनात जाहीर झाले. या निर्णयाने गणेशभक्तांमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला आहे. महाराष्ट्रातील गणेशभक्तांसाठी एक अत्यंत आनंदाची आणि महत्त्वपूर्ण बातमी समोर आली आहे. भाजप नेते आशिष शेलार यांनी घोषणा केली आहे की, गणेशोत्सव आता महाराष्ट्राचा राज्य महोत्सव म्हणून घोषित करण्यात आला आहे. मुंबईतील पावसाळी अधिवेशनादरम्यान बोलताना त्यांनी हे भाष्य केले. आशिष शेलार यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने गणेशोत्सवाबाबत घेतलेली सकारात्मक भूमिका स्पष्ट केली. देवेंद्र फडणवीस यांनी न्यायालयासमोर गणेशोत्सवाबाबत अत्यंत स्पष्ट भूमिका मांडली आहे. पीओपी मूर्तींवरील निर्बंध हटवण्यात आले असून, विसर्जन परंपरागत पद्धतीनेच व्हावे, असे धोरण सरकार न्यायालयासमोर मांडत आहे. राज्य सरकारचे धोरण गणेशोत्सवासाठी कोणत्याही प्रकारे आडकाठीचे असणार नाही, असे आशिष शेलार यांनी नमूद केले आहे.

## दिलीप कुमार, राज कपूरच्या वास्तूचे पाकिस्तानात संवर्धन; 3.38 कोटींचा निधी मंजूर

**पेशावर/वृत्तसंस्था :** पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा प्रांतीय सरकारने हिंदी चित्रपटसृष्टीतील दोन दिग्गज कलाकार, दिलीप कुमार आणि



राज कपूर यांचे पेशावरमधील जुने घरं जतन करण्यासाठी तब्बल ३.३८ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. हा निर्णय प्रांताचे मुख्यमंत्री अली अमीन गंडापूर आणि पर्यटन व पुरातत्त्वविषयक सल्लागार जाहिद खान शिनवारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीत अनेक महत्त्वाचे पर्यटन आणि वारसास्थळांच्या संवर्धनाचे प्रकल्प मंजूर करण्यात आले. दिलीप कुमार आणि राज कपूर यांचे बालपण पेशावरमध्ये गेले होते. त्यांची तेथील घरे सध्या मोडकळीस आलेली असून, २०१४ मध्ये पाकिस्तानचे तत्कालीन पंतप्रधान नवाज शरीफ यांनी या इमारतींना 'राष्ट्रीय वारसा' म्हणून घोषित केले होते. राज कपूर आणि दिलीप कुमार यांचे पूर्वज मूळचे पेशावर (पाकिस्तानातील खैबर पख्तूनख्वा प्रांत) येथील होते आणि ते भारत-पाकिस्तानच्या फाळणीपुर्वीच भारतात स्थायिक झाले होते. पुरातत्त्व खात्याचे संचालक अब्दुस समद यांनी सांगितले की, दोन्ही वास्तूंना संग्रहालयात रूपांतरित करण्याची योजना आहे. या संग्रहालयांत दोन्ही कलाकारांचा मुंबईपर्यंतचा प्रवास, त्यांचे चित्रपट कारकिर्दीतील टप्पे आणि वैयक्तिक आयुष्याचे विविध पैलू दाखवले जाणार आहेत. या ठिकाणी विशेष गॅलरी उभारली जाणार असून, अभ्यागतांना त्यांच्या स्मृतींशी प्रत्यक्ष भेटता येणार आहे.

## कॅनडामध्ये कॉमेडियन कपिल शर्माच्या कॅफेवर गोळीबार

**सर्रे/वृत्तसंस्था :** बुधवारी रात्री कॅनडातील ब्रिटिश कोलंबियातील सरे येथील कॉमेडियन कपिल शर्माच्या कॅफेवर हल्ला झाला. कपिल शर्माने





तीन दिवसांपूर्वी, ७ जुलै रोजी कॅप्स कॅफे नावाच्या या कॅफेचे उद्घाटन केले होते. मीडिया रिपोर्ट्सनुसार, हल्लेखोरांनी कॅफेवर ९ राऊंड गोळीबार केला. खलिस्तानी दहशतवादी हरजीत सिंग लाडीने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. हरजीत सिंग हा राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) यादीतील मोस्ट वॉन्टेड दहशतवाद्यांपैकी एक आहे आणि तो बब्बर खालसा इंटरनॅशनलशी संबंधित आहे. हल्लेखोराने गोळीबाराचा व्हिडिओही बनवला, जो सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे. यामध्ये कॅफेच्या बाहेर कारमध्ये बसलेला एक व्यक्ती कारच्या आतून सतत गोळीबार करताना दिसत आहे. तथापि, या घटनेत अद्याप कोणीही जखमी झाल्याचे वृत्त नाही. गोळीबारानंतर पोलिस आणि फॉरेन्सिक पथके घटनास्थळी पोहोचली असून तपास करत आहेत. कपिल शर्माच्या जुन्या वक्तव्यामुळे संतप्त झालेल्या हरजीत सिंग लाडीने त्याच्या कॅफेमध्ये गोळीबाराची घटना घडवून आणल्याचे सांगण्यात येत आहे. विश्व हिंदू परिषद नेते विकास प्रभाकर उर्फ वकास बग्गा यांच्या हत्येप्रकरणी ग़क्ष्त्रह्णहरजीत सिंग लाडी यांचा शोध घेत आहे. एप्रिल २०२४ मध्ये पंजाबमधील रूपनगर जिल्ह्यात त्यांच्या दुकानात ज्त्तु नेत्याची गोळ्या घालून हत्या करण्यात आली होती. यापूर्वी १ सप्टेंबर २०२४ रोजी रात्री कॅनडातील व्हँकुव्हर येथे पंजाबी गायक एपी ढिल्लन यांच्या घराबाहेर गोळीबार झाला होता. याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता, ज्यामध्ये एक व्यक्ती ढिल्लन यांच्या घराबाहेर १४ गोळ्या झाडताना दिसत होता.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी

# 1 जुलै पर्यंतची मतदार यादी पात्र

### राज्य निवडणूक आयोगाचा निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी :**आगामी काळात होणा-या महापालिका, जिल्हा परिषद आदी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी १ जुलै २०२५ पर्यंत ज्यांची मतदार यादीत नावे आहेत त्यांना मतदान करता येईल. त्यानुसार १ जुलैची अंतिम केलेली मतदार यादी विचारात घेउन मतदार संख्या, मतदार केंद्र, मतदान यंत्र आणि उपलब्ध मनुष्यबळाचा विचार करून निवडणुकीचे नियोजन करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी गुरूवारी दिले. जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या आगामी निवडणुकांच्या प्राथमिक तयारीसंदर्भात वाघमारे यांनी दूरचित्र संवादाच्या माध्यमातून जिल्हाधिका-यांची बैठक घेतली. आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांच्यासह वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी स्वतंत्र मतदार यादी तयार केली जात नाही. भारत निवडणूक आयोगाने तयार केलेली मतदार यादी वापरली जाते. १ जुलै पर्यंत नावे नोंदविलेली यादी उपलब्धतेबाबत निवडणूक आयोगाशी प्राथमिक चर्चा झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका बहुसदस्यी पद्धतीने घेण्यात येतात. त्यामुळे विधानसभेच्या निवडणुकीपेक्षा या निवडणुकीत मतदान केंद्रांची संख्या वाढेल. मतदान केंद्र निश्चितीबाबत राज्य निवडणूक आयोगाने स्वतंत्र आदेशाद्वारे निकष निश्चित केले आहेत. सर्वसामान्य मतदार आणि दिव्यांग मतदारांसह सर्व घटकांचा विचार करून मतदान केंद्रांवर सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत दक्षता घ्यावी. त्याचबरोबर उपलब्ध मतदान यंत्रांचा अचूक आढावा घेण्यात यावाअसे आदेशही त्यांनी दिले. मतदान यंत्रांची प्रथमस्तरीय तपासणी तातडीने हाती घेण्यात यावी व ती निवडणुकांसाठी सज्ज करण्यात यावीत असे आदेश काकाणी यांनी दिले. मतदान केंद्राची जागा निश्चिती, मतदान केंद्र इमारतींची स्थिती, तेथील सर्व सोयीसुविधांबाबत आतापासूनच तयारी करावी; तसेच मनुष्यबळाची उपलब्धता किंवा कमतरतेबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात यावा. गरजेनुसार वेळीच मनुष्यबळ उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यासाठी संबंधित विभागीय आयुक्तांशी समन्वय साधावा अशा सूचनाही यावेळी देण्यात आल्या.च मनुष्यबळाची उपलब्धता किंवा कमतरतेबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात यावा. गरजेनुसार वेळीच मनुष्यबळ उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यासाठी संबंधित विभागीय आयुक्तांशी समन्वय साधावा अशा सूचनाही यावेळी देण्यात आल्या.



### गुजरात पूल दुर्घटना

## अनेक अधिकारी निलंबित; 18 मृतदेह सापडले

**अहमदाबाद/वृत्तसंस्था :**गुजरातमधील वडोदरा येथे बुधवारी झालेल्या भीषण पूल दुर्घटनेत आतापर्यंत १८ जणांचा मृत्यू झाला आहे, तर काही बेपत्ता लोकांचा शोध सुरू आहे. सुमारे ४० वर्षे जुना असलेला हा पूल जीर्ण झाला होता. पण त्यावरून जड वाहनांची वाहतूक सुरूच होती. मात्र बुधवारी सकाळी हा पूल कोसळला आणि मोठी दुर्घटना घडली. पूल कोसळला तेव्हा दोन ट्रक, दोन कार आणि एक रिक्षा अशी पाच वाहने नदीत पडली. तुटलेल्या पुलाच्या टोकाला एक टँकर अडकला होता. पूल कोसळल्याप्रकरणी मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी राज्याच्या रस्ते आणि इमारत विभागाच्या चार अभियंत्यांना निलंबित केले आहे. गुजरातमधील वडोदरा ➪ (पान २ वर)

## ठाकरे महाराष्ट्रा बाहेरचे

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठी भाषेवर कोणाचे प्रेम असेल, तर त्यावर कोणाचा आक्षेप असण्याचे कारण नाही. मराठीचा प्रचार, प्रसार करण्यासाठी कोणी कटिबद्ध होत असेल, तर यावर आक्षेप असण्याचे कारण नाही. परंतु, मराठी भाषेसाठी कुणी कानशिलात लगावायला लागले, तर त्या भाषेचे यश वाढेल का? केवळ महाराष्ट्रात राहणारे लोकच मराठीवर प्रेम करतात, असे आपल्याला वाटते का, संपूर्ण देश मराठीवर प्रेम करतो, असे प्रतिपादन शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी केले. चातुर्मासाची सुरुवात झाली असून, शंकराचार्य मुंबईत आहेत. मराठी भाषिक लोक देशभरात जाउन कार्य करत आहेत. देशाबाहेरही अनेक ठिकाणी मराठी शिकवली जाते. प्रत्येकाला एकापेक्षा जास्त भाषा येतीलच असे नाही. प्रत्येक जण बहुभाषिक असेल असे नाही. देशात केवळ एकच भाषा येणा-यांची संख्या जास्त आहे. त्यामुळे सगळ्यांना मराठी आली पाहिजे किंवा सगळ्यांनी मराठी शिकली पाहिजे, असा आग्रह



तुम्ही कसा काय धरू शकता, अशी विचारणा शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी केली. ठाकरे महाराष्ट्राच्या बाहेरून आले होते. ठाकरे मगधमधून आले होते. तेव्हा तेही मराठी नव्हते. त्यांनाही मराठी येत नव्हती. तेव्हा महाराष्ट्राने त्यांना स्वीकारले. मगध येथून आलेल्या कुटुंबाचा स्वीकार केला. त्यांना मोठे मराठी भाषिक केले आणि तेच आता मराठीसाठी लढा देत आहेत. मगध येथील मागधी भाषा विसरले आणि मराठी स्मरणात राहिली. महाराष्ट्रातील लोकांनी आपल्या पूर्वजांना प्रेम दिले. ते आपण पुढे का नेत नाहीत. लोकांना एवढे प्रेम द्या की, ते त्यांची भाषा विसरून मराठी स्वीकारतील. हा मार्ग तुम्ही का स्वीकारत नाही, असा सवाल शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी केला. दरम्यान, आम्हाला ठाकरे बंधूंच्या मराठी प्रेमावर आक्षेप नाही. तुम्हाला मराठीबाबत प्रेम असेल, तर चांगलीच गोष्ट आहे. प्रत्येकाला आपली संस्कृती, परंपरा, भाषा यावर प्रेम असलेच पाहिजे. आता आम्ही दोन महिने इथे असणार आहोत. राज ठाकरे-उद्धव ठाकरेंनी मला मराठी शिकवावी. तुम्ही मला मराठी शिकवा, मी देशभरात मराठी शिकवेन. दोन महिन्यानंतर मी जेव्हा इथून जाईन, तेव्हा त्यांच्यासोबत मराठीत बोलूनच जाईन, असे शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी म्हटले आहे.

## 'कुठूनही पैसे आणा, पण शेतकरी कर्जमुक्ती करा, सातबारा कोरा करा'

### मनसेचा बच्चू कडूंना पाठिंबा

**मुंबई/प्रतिनिधी :** बच्चू कडू यांचे अभिनंदन करतो. राज ठाकरे यांना सांगितले की, बच्चू कडू यांनी शेतक-यांसाठी दिंडी काढलेली आहे. सातबारा कोरा होण्यासह आणखीही काही त्यांच्या मागण्या आहेत. त्यासाठी आपल्या पक्षातर्फे त्यांना पाठिंबा देण्याची गरज आहे. राज ठाकरे यांनी तत्काळ होणार दिला. राज ठाकरे मला म्हणाले की, केवळ पाठिंबा देउ नको, तर तू स्वतः त्या ठिकाणी जा. बच्चू कडू यांच्या दिंडीत सहभागी होउन शेतक-यांना निरोप दे की, त्यांच्या प्रत्येक लढ्यात आम्ही सोबत आहोत. कुठूनही पैसे आणा पण शेतक-यांचा सातबारा कोरा करा, असे मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी म्हटले आहे.

पत्रकारांशी बोलताना बाळा नांदगावकर म्हणाले की, शेतकरी राजा



जे पिकवतो, तेच आम्ही खातो. या दिंडीला, पदयात्रेला मनापासून शुभेच्छा देण्यासाठी मी आलो आहे. मला एका गोष्टीचा आनंद वाटतो की, बच्चू कडू ताठ कण्याचे लढाउ बाण्याचे व्यक्तिमत्व आहेत. एक प्रामाणिक माणूस जर अशा प्रकारचा लढा पुढे घेउन जात असेल, तर त्या माणसाच्या पाठीशी खंबीरपणे आपण सगळ्यांनी उभे राहायला हवे. राजकारणाच्या पलीकडे जाउन तो विचार करायला पाहिजे, असे बाळा नांदगावकर यांनी सांगितले. सरकारकडे या सगळ्या गोष्टी करण्यासाठी पैसे आहेत का? जर तुमच्याकडे पैसे नाहीत. राज्यावर कर्ज जवळपास साडेनउ कोटींचे होईल. तुमच्याकडे पैसे नाही, तर तुम्ही घोषणा करता ➪ (पान २ वर)

## पांदण रस्त्यांची रूंदी 12 फूट अनिवार्य

### पोट हिस्स्याची नोंदणी आता सातबारावर

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील जमीन क्षेत्रावर सातबारावर आता पोट हिस्सा देखील नोंदविण्यात येणार असून, यासाठी राज्यात १८ तालुक्यांमध्ये पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. प्रत्येक महसूल विभागातील तीन तालुके अशा प्रकारे या उपक्रमात निवडण्यात आले आहेत, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानपरिषदेत दिली.विधानपरिषदेतील सदस्य शिवाजीराव गर्जे यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या चर्चेत सदस्य सदाभाउ खोत, चंद्रकांत रघुवंशी आणि शशिकांत शिंदे यांनी सहभाग घेतला.महसूल मंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, आतापर्यंत सातबारावर केवळ जमीन क्षेत्राची नोंद होत होती, परंतु भावांमधील वाटणी किंवा पोट हिस्सा दाखल होत नव्हता. अशा वाटण्या ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर करता येतील,



तर पोट हिस्सा मोजणीसाठी २०० रुपये शुल्क आकारले जाईल. आता कमीत कमी एक गुंठा क्षेत्र सुद्धा स्वतंत्रपणे नोंदविता येणार आहे. ते पुढे म्हणाले, या नव्या पद्धतीमुळे आधी मोजणी, नंतर नोंदणी अशी प्रक्रिया निश्चित करता येईल. यामुळे भावकीतील वाद टाळता येणार आहेत. 'डिजिटल इंडिया' उपक्रमांतर्गत राज्यातील ७० टक्के गावांचे नकाशे व नोंदी डिजिटायझेशन करण्यात आले असून, त्यामुळे बांध, शेत रस्ते, तसेच पांदण रस्त्यांवरील वादही मोठ्या प्रमाणात कमी होतील. पांदण रस्त्यांबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, पांदण रस्त्यांची रुंदी कमीत कमी १२ फूट असणे बंधनकारक करण्यात येणार आहे, जेणेकरून शेतक-यांना शेतीसाठी सहज वादमुक्त प्रवेश मिळू शकेल.

## शिक्षण उपसंचालक संदीप सांगवे निलंबित

**मुंबई/प्रतिनिधी :** शिक्षण विभागात एक महापॉवरफुल अधिकारी मागील तारखा टाकून लाखो रुपये उकलत असल्याचा आरोप भाजप आमदार संजय उपाध्याय यांनी केला. संजय उपाध्याय यांनी मुंबई शिक्षण उपसंचालक संदीप सांगवे यांच्यावर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केले आणि त्यांच्या विरोधात लक्षवेधी उपस्थित केली. त्यानंतर शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी संदीप सांगवे यांना निलंबित केल्याची घोषणा केली. भाजपचे आमदार संजय उपाध्याय यांनी मुंबई शिक्षण उपसंचालक संदीप सांगवे यांच्यावर गंभीर आरोप केले. ते म्हणाले की, महापॉवरफुल अधिकारी माझं कोणी काही करू शकत नाही असं वारंवार बोलून दाखवतो. मागील तारखा टाकून लाखो रूपये उकलत शेकडो फाईल मंजूर केल्या आहेत. या अधिका-याने शासनाच्या ➪(पान २ वर)



## राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट अडचणीत?

### ◆ आयकर विभागाने बजावली नोटीस ◆

**मुंबई/प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते आणि राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आयकर विभागाने त्यांना नोटीस बजावली आहे. याबाबतची माहिती खुद्द शिरसाट यांनी दिली आहे. आयकर विभागाच्या नोटिशीमुळे राजकीय वर्तुळात एकच चर्चा सुरू आहे. मंत्री संजय शिरसाट यांचा मुलगा सिद्धांत शिरसाट यांच्या विट्स हॉटेलची चर्चा सुरू आहे. छत्रपती संभाजीनगरातील विट्स हॉटेलची किंमत ११० कोटी रुपये असताना, ते केवळ ६७ कोटी रुपयांना संजय शिरसाट यांच्या ➪ (पान २ वर)









# बच्चू कडू यांच्या पायाला जखमा, सरकार अजूनही गप्प!

## 'सातबारा कोरा कोरा' यात्रेचा चौथा दिवस, शेतकऱ्यांच्या डोळयात अश्रू





**अमरावती/प्रतिनिधीः-**
शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी आणि सातबारा कोरा करण्याच्या मागणीसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेली 'सातबारा कोरा कोरा' पायदळ यात्रा आज चौथ्या दिवशी खडतर टप्प्यात दाखल झाली. सलग तीन दिवस सुरू असलेल्या संततधार पावसात वळसा – लालखिंड – तिवरी या अडथळ्यांनी भरलेल्या मार्गावरून पदयात्रा सुरू असताना खुद्द बच्चू कडू यांच्या पायाला खोल जखमा झाल्या.

कार्यकर्त्यांनी त्यांना थांबण्याची विनंती केली. मात्र, 'शेतकऱ्यांच्या जखमा माझ्यापेक्षा खोल आहेत, त्यामुळे थांबणे शक्य नाही' असं म्हणत त्यांनी औषध लावून, पट्टी बांधून पुन्हा मार्गक्रमण सुरू केलं. त्यांचा हा निर्धार पाहून अनेक कार्यकर्त्यांना अश्रू अनावर झाले; पण सरकार अजूनही आपल्या एसी केबिनमधून बाहेर आलेले नाही, ही शरमेची बाब आहे.

शेतकऱ्यांची कर्जमाफी, सातबारा कोरा करण्याची मागणी वर्षानुवर्षं प्रलंबित आहे. या लढ्याच्या निमित्ताने शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना भेट देत असताना अनेकांच्या डोळ्यांतून अश्रू थांबेनासे झालेत. परंतु, राज्य सरकारच्या मंत्र्यांना अजूनही प्रतिक्रिया द्यावीशी वाटलेली नाही. हे केवळ निष्काळजीपणाचं नव्हे, तर निर्ढावलेपणाचं लक्षण आहे.

## गुरुपौर्णिमेला बच्चू कडू यांची भावूक गुरुवंदना

## 'माझा गुरु म्हणजे शेतकरी!'

**- बच्चू कडू**



अमरावती/प्रतिनिधीः-
'या जगाच्या पाठीवर सगळ्यांना अन्न देणारा, स्वतः उपाशी राहून इतरांना पोसणारा शेतकरीच माझा खरा देव आहे,आणि तोच माझा गुरु आहे,' असे भावनिक उद्गार प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांनी गुरुपौर्णिमेनिमित्त आज तिवरी येथे काढले. सध्या महाराष्ट्रभर सुरू असलेल्या 'सातबारा कोरा कोरा' पायदळ यात्रेचा चौथा दिवस असून आज तिवरी येथे बच्चू कडू यांची पदयात्रा पोहचली त्याठिकाणी पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना बच्चू कडू यांनी ही भावनिक प्रतिक्रिया दिली. यात्रेच्या दरम्यान हजारो शेतकरी, महिलांचा उत्स्फूर्त सहभाग, आणि आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांच्या भेटी अशा घटनांनी वातावरण आधीच भारलेले असताना, गुरुपौर्णिमेच्या दिवशी त्यांचा हा शेतकऱ्याला दिलेला सच्चा मान संपूर्ण यात्रेला एक आध्यात्मिक अर्थ देऊन गेला. बच्चू कडू म्हणाले, 'तो शेतात घाम गाळतो, म्हणून आपण शहरात टीव्ही बघतो; तो भुकेला झोपतो, आपण पोटभर खातो. असा माणूस देव नाही तर कोण? आणि जो इतक्या समर्पणाने जगासाठी झिजतो, त्याला गुरु मानणं ही माझ्यासाठी फक्त भावना नाही – ही माझी जबाबदारी आहे.'सातबारा कोरा कोरा ही यात्रा म्हणजे केवळ रस्त्यावर चालणं नाही, तर शेतकऱ्याच्या वेदनेला आणि संघर्षाला न्याय देण्याचा प्रयत्न आहे. ही यात्रा म्हणजे माझ्या गुरूच्या चरणी अर्पण केलेली गुरुदक्षिणा आहे, असंही ते म्हणाले. आजच्या दिवशी त्यांनी आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबांना भेट दिली. या भेटींनी आणि त्या नजरेत दिसणाऱ्या दुःखाने त्यांच्या डोळ्यांत पाणी आणले. एक विधवा शेतकरी महिला आपल्या पतीच्या आठवणी सांगत असताना बच्चू कडू यांचा हात तिच्या डोळ्यांवर गेला – तेवढ्या शांततेतून शब्दही निघाले, 'तुमच्या नवऱ्याची लढाई आता माझी झाली आहे. ही यात्रा तुमच्यासाठी आहे.' शेतकऱ्याला फक्त सवलती नव्हे, तर आत्मसन्मान हवा आहे. कर्जमाफी ही त्याच्या हक्काची आहे, ही कोणती योजना नव्हे. सरकारने केवळ घोषणांच्या पलिकडे जाऊन कृती केली पाहिजे. बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली ही यात्रा शेतकऱ्याच्या न्यायासाठी चाललेली आहे शेतकरी वर्ग मोठ्या आशेने या आंदोलनाकडे बघत असून आता केवळ शासनाने या आंदोलनाची दखल घ्यावी अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# मागण्याची दखल घ्या, अन्यथा मनसे स्टाईलने आंदोलन करू

## - बाळा नांदगावकरांचा सरकारला इशारा

**अमरावती/प्रतिनिधीः-**
शेतकऱ्यांसाठी आम्ही जात, पात, धर्म, राजकीय विचार सर्व बाजूला ठेऊन एकत्र येत शेतकऱ्याचा सातबारा कोरा केल्याशिवाय आता थांबायचं नाही असा निर्धार केला आहे, बच्चूभाऊ कडू यांनी '७/१२ कोरा कोरा कोरा' यात्रेला सुरुवात केली आहे. त्यांनी केलेल्या मागण्यांची सरकारने दखल घ्यावी अन्यथा मनसे स्टाईलने आंदोलन करू, अशा थेट इशाराच मनसेचे नेते बाळा नांदगावकर यांनी दिला. तर आमच्या शेतीमाला भाव द्या, आम्हाला कुठल्याही योजनांचे पैसे नकोत. आमच्या शेतीमालाला जर योग्य भाव मिळाला तर आम्हीच पंतप्रधान नरेंद्र मोदींना दर महिन्याला ५००० देऊ..., असे बच्चू कडू यांनी म्हटले.

देशाचे माजी कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जन्मगाव पापळ येथून प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष तथा माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली सुरु झालेली '७/१२ कोरा कोरा कोरा' यात्रा



दारव्हा तालुक्यातील लालखिंड येथे आज पोहचली. यावेळी मनसेचे नेते बाळा नांदगावकर यांनी पदयात्रेत सहभागी होऊन शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी काढण्यात आलेल्या यात्रेला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने पाठिंबा दर्शविला. यावेळी नांदगावकर म्हणाले की, बच्चू कडू यांनी सरकारकडे ज्या सतरा मागण्या केल्या आहेत त्या मागण्या अतिशय योग्य आहेत. कष्टकरी शेतकरीराजाला मदत झालीच पाहिजे. त्याला पीकविमाचे पैसे मिळाले पाहिजेत आणि सर्वात महत्त्वाचं कर्जमाफी झाली पाहिजे. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधताना बच्चू कडू म्हणाले की, यात्रा ना जात, ना धर्म, ना पक्ष विरहित निघालेली आहे. या यात्रेत सर्व जाती धर्मांचे लोक आणि विविध पक्षाचे कार्यकर्ते सहभागी झाले आहेत. आम्ही उभारलेला हा लढा शेतकऱ्यांसाठी आहे, शेतकऱ्यांच्या एकजुटीसाठी आहे. त्यामुळे या लढ्यात सर्वांनी सहभागी झाले पाहिजे. जात, पात बाजूला ठेवत शेतकऱ्यांसाठी एकत्रित येत असून मत कोणाला पण द्या पण शेतकऱ्यांसाठी एकत्रित व्हा, असे आवाहन बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांना केले.

## १ व १० वरिल उर्वरित

### चाकूचा धाकावर २० हजारांची

गुन्ह्यात वापरलेला चाकू आणि चोरीसाठी वापरलेली कडी जप्त करण्यात आली आहे.

ही कारवाई अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय अधिकारी डॉ. शुभम कुमार, तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनात पार पडली. कारवाईत सपोनि महेंद्र गवई, पीएसआय प्रशांत जाधव, सतिश पुनसे, अंमलदार अमोल कपले, मिलिंद इंगोले, भारत कोहळे, नंदाराम पटोकार, वैभव मांडवगणे, अभय हरदे, अनुप टिंगणे, आणि सायबर पोलीस स्टेशनचे सागर धापड यांचा मोलाचा सहभाग होता.

### चिखलदराच्या प्रवाशाला

येथील गोकुळ हिराजी तोता व अशोक कुमार राजभर पश्चिम बंगाल कोकण कन्या एक्सप्रेस मधून प्रवास करत होते.त्यावेळी आरोपी मोहम्मद उस्मान पण त्यांच्यासोबत प्रवास करत होता. त्याने दोघांशी मैत्री केली आणि त्यांना चॉकलेट खायला दिली. हे चॉकलेट खाल्ल्यावर थोड्यावेळाने गोकुळ तोता आणि अशोक कुमार बेहोश झाले. दोघेही बेहोश होताच आरोपीने त्यांचे मोबाईल आणि खिशातील पर्स चोरी केली. ही ट्रेन जेव्हा संगमेश्वर रेल्वे स्थानकावर थांबली तेव्हा आरोपी कोच बदलून स्लीपर कोच मध्ये गेला. मात्र तिथे त्याला पकडण्यात आले.त्याच्याकडून २ मोबाईल, प्रवाशांचे कपडे, ७१० रुपये ,पॅनकार्ड, ३ एटीएम कार्ड व प्लास्टिक च्या पिशवीतून चॉकलेट जप्त करण्यात आले आहे. रेल्वे पोलिसांनी नागरिकांना प्रवासादरम्यान सावध राहण्याचे आवाहन केले आहे. कोकण रेल्वे आरसीएफ पथकाने ही कारवाई केली.

### कृषी उत्पन्न बाजार समितीचे

यांच्याकडून काय कारवाई होणार याकडे दर्यापूर तालुक्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

याबाबत कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनिल गावंडे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी कृषी भवनाच्या भाड्याच्या पावतीच्या रकमेत कुठलीही तफावत झाली नसल्याचे सांगितले. कृषी भवनाचा आर्थिक व्यवहार पाहणारी मुलगी ही सुटीवर असल्याने तक्रार कर्त्यास व्यवस्थापक हे ९ हजार रुपयाची रितसर पावती देऊ शकले नाही. कृषी भवन व बाजार समितीचा सर्व व्यवहार हा पारदर्शक आहे. तक्रार कर्त्यांची ११ हजार रुपयाची पावती हीऑन रेकॉर्ड आहे. तेवढी रक्कम ही बँकेत जमा सुद्धा झाली आहे.कृषी भवनच्या भाड्याच्या पावतीच्या रकमेत तफावत झाल्याचा हा गैरसमज आहे. **-सुनिल गावंडे,** सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, दर्यापूर

### नोकरीच्या नावावर ८.५० लाखांने

रवींद्र भगवान गुजर (गुलजारपुरा), प्रदीप बेदरकर (दहिगाव रेचा, अंजनगाव सुर्जी) ,गोपाल मनोहर नारे (ताजनपुरा, चंडिकापूर, अकोट) यांचा समावेश आहे. ढोरे आणि आरोपी गुजर हे एकमेकांचे शेजारी आहे. आरोपी गुजरने ढोरेला सांगितले की, मी तुमच्या मुलाला नोकरीवर लावून देतो. आमची टीम आहे, जे नोकरी लावण्याचे काम करते. तुमच्या मुलाला गुप्तपणे नोकरीवर लावून देतो. त्यासाठी आधी २० लाख रुपये मागितले.ढोरेने याकडे दुर्लक्ष केले.काही कालावधी नंतर आरोपीं गुजरने नोकरीसाठी १७ लाख रुपये मागितले. ढोरेने मुलाच्या भविष्याचा विचार करून पैसे भरण्याकरिता होकार दिला. यानंतर आरोपी गुजर, प्रदीप बेदरकर, गोपाल नारे आणि ढोरे एका ठिकाणी भेटले. अर्धी रक्कम आता व अर्धी रक्कम मुलगा नोकरीवर लागल्यावर देण्याचे ठरले. त्यानुसार चर्चा झाल्यावर २२ ऑक्टोबर २०२१ रोजी सकाळी ११ वाजता ५ लाख रुपये नंतर ३.५० लाख रुपये असे एकूण ८.५० लाख रुपये ढोरे यांनी आरोपींना दिले. दोन वर्षानंतर ही मुलाला कुठेही नोकरी लागली नाही किंवा नोकरीची ऑर्डर आली नाही. यामुळे ढोरे यांना फसवणूक झाल्याचे वाटले. त्यांनी तत्काळ पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी तिन्ही आरोपीं विरुद्ध कलम ४१७,४२०,३४ अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### अमरावती शहरात 'मिशन फ्री

आयुक्तांनी कठोर पावले उचलण्याचे ठरविले आहे.

आयुक्तांनी दिलेल्या सूचनांनुसार, अमरावती महानगरपालिका क्षेत्रात सर्वच अतिक्रमणांची तातडीने तपासणी (सर्वेक्षण) करून त्यावर नियमानुसार कारवाई करण्यात यावी. तसेच हे 'फुटपाथ मोकळे' अभियान दररोज राबवले जावे व त्याचा अहवालही नियमितपणे सादर करावा, असे आदेश देण्यात आले आहेत. या मोहिमेचा उद्देश पादचाऱ्यांना सुरक्षित आणि मोकळा मार्ग उपलब्ध करून देणे हा असून नागरिकांनीही यास सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले आहे. अमरावती महानगरपालिकेच्या वतीने शहरात 'मिशन फ्री फुटपाथ – फुटपाथ मोकळे' हे विशेष अभियान सुरू करण्यात आले आहे. या अभियानाचा उद्देश नागरिकांना, विशेषतः वृद्ध, महिला, विद्यार्थी आणि दिव्यांग व्यक्तींना सुरक्षित व मोकळा पादचारी मार्ग उपलब्ध करून देणे हा आहे. या पार्श्वभूमीवर महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी अमरावतीकर नागरिकांना आवाहन केले की, 'शहराच्या विकासात पादचाऱ्यांचे स्वच्छ, मोकळे आणि सुरक्षित मार्ग हे अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. रस्त्यालगत व पादचारी मार्गांवरील अनधिकृत अतिक्रमणामुळे सर्वसामान्य नागरिकांचे दैनंदिन हाल होत आहेत. हे थांबवण्यासाठी महानगरपालिकेने 'मिशन फ्री फुटपाथ' अभियान हाती घेतले आहे. या मोहिमेसाठी नागरिकांनी सक्रिय सहकार्य करावे. दुकान, गाळे, स्टॉलधारकांनी स्वतःहून अतिक्रमण काढून टाकावे आणि सार्वजनिक जागांचा उपयोग जनहितासाठी होईल यासाठी पुढे यावे. आपले अमरावती शहर सुंदर, सुटसुटीत आणि सुरक्षित करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येण्याची ही वेळ आहे. आपण जबाबदार नागरिक असल्याचे दाखवा – फुटपाथ मोकळे करा!' असे आवाहन करण्यात आले.

### लाचखोर कंत्राटी अभियंता

गावातील घरकुल लाभार्थ्याने एसीबीकडे तक्रार दाखल केली होती की, त्याला रमाई योजनेतील ४० हजार रुपयांच्या तिसऱ्या हप्त्यासाठी १५ हजारांची लाच मागण्यात आली आहे. पावसामुळे तातडीने केवळ १० हजार रुपये देण्याचे ठरले व उर्वरित ५ हजार रुपये चेक मिळाल्यानंतर देण्याचे ठरले. तक्रारीची खातरजमा केल्यानंतर १० जुलै रोजी दुपारी एसीबीच्या पथकाने सापळा रचून निंघोट याला त्याच्या टेबलवरच लाच घेताना रंगेहाथ पकडले. त्यावेळी कार्यालयात इतर कर्मचारीही उपस्थित होते, त्यामुळे काही वेळ कामकाजात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. ही कारवाई एसीबी अमरावती विभागाचे पोलीस अधीक्षक मारुती जगताप, अप्पर पोलीस अधीक्षक सचिंद्र शिंदे, उप पोलीस अधीक्षक सुनील किनगे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पथकात पोलीस निरीक्षक सुजाता बन्सोड, पीआय मेसरे, ज्ञानोबा फड, प्रमोद रायपुरे, शैलेश कडू, आशिष जांभोळे, उपनिरीक्षक सतीश कीटुकले, पोलीस हवालदार शेंडे यांचा समावेश होता.

### शालेय वाहतूक अधिक सुरक्षित

निश्चित करून विद्यार्थ्यांची गर्दी टाळावी. शाळांच्या प्रवेशद्वारांवर सीसीटीव्ही आणि खासगी सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात यावी. वाहतुकीबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृतीसाठी कार्यशाळांचे आयोजन करण्यात यावे व वाहतूक विभागाच्या अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन घ्यावे. प्रत्येक शाळेने वाहतुकीच्या नियमांबाबत विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणे आवश्यक ठरवण्यात आले. स्कुल बसमध्ये स्पीड गर्व्हनर, अग्निशमन यंत्र, फर्स्ट एड किट, संकटकालीन दरवाजा कार्यरत, वाहन कागदपत्रे पूर्ण असणे बंधनकारक आहे. प्रवास करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याची माहिती ठेवावी. वाहन चालक व वाहकांची वैद्यकीय, नेत्र तपासणी व चारित्र्य तपासणी नियमितपणे करावी. क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थी बसमध्ये घेऊ नये, आणि महिला वाहकांची नियुक्ती आवश्यक ठिकाणी करावी. अशा सुचना देण्यात आल्या. बैठकीत शाळांचे प्रतिनिधी, शिक्षक, स्कुल बस चालक व संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी आपापल्या समस्या मांडल्या. त्यावर संबंधित विभागांमार्फत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे अरविंद चावरीया आणि उर्मीला पवार यांनी आश्वासन दिले.

### खाजगी रुग्णालयातून

पोलीसांनी संशयित शेख रौशन याला ताब्यात घेऊन विचारपूस केली असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिली आणि चोरी केलेले दोन्ही मोबाईल पोलिसांच्या हवाली केले.

ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, सहायक पोलीस आयुक्त जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके, रामदास पालवे, विजय गीते, घनश्याम यादव, दीपक श्रीवास, प्रदीप राठोड, मंगेश दिघेकर, अथर अली बेग, दिनेश जवंजाळ यांच्या पथकाने केली.

### दुकानफोडी प्रकरणातील दोन

अशोक नगर) आणि त्याचा साथीदार आनंदा लक्ष्मणराव राक्षसकर (वय ४७, रमाबाई आंबेडकर नगर) या दोघांना मांडवा झोपडपट्टीतून अटक केली.त्यांच्या ताब्यातून चोरीचा माल जप्त केला.

ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सहायक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत गाडगे नगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल वर, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज मानकर, डीबी पथक प्रमुख भारत वानखडे, जावेद अहमद, राजेश गुरेले, गुलरेज खान, रुपेश हटकर, नंदकिशोर करोची, महेश शर्मा यांनी सहभाग घेतला.

### गावठी हातभट्टीसह ८१ हजारांचा

या दुचाकीवर रबरी ट्यूबमध्ये भरलेली ६० लिटर गावठी हातभट्टीची दारू आढळून आली. पोलिसांनी घटनास्थळावरून सहा हजाराची दारू, ७५ हजाराची दुचाकी असा एकुण ८१ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी ब्राम्हणवाडा थडी पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा क्रकलम ६५ (अ), ६५ (ई) महाराष्ट्र दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीस ताब्यात घेतले असून, त्याच्यावर पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय अधिकारी डॉ. शुभम कुमार, पोलीस निरीक्षक किरण वानखडे (स्थानीय गुन्हे शाखा) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कार्यवाहीत सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत जाधव (ठाणेदार, ब्राम्हणवाडा थडी), राजू मरस्कोल्हे, अनुप मानकर, चालक राजेश तायडे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

### सासरच्या छळाला कंटाळून

योगेश खडतकर याच्याशी झाले होते. या दाम्पत्याला १८ महिन्यांची एक मुलगी सुद्धा आहे. मात्र, सासरकडील मंडळींनी वारंवार माहेरून पैसे आणण्याची मागणी करत तिचा मानसिक आणि शारीरिक छळ सुरू केला होता. ८ जुलै रोजी या छळाला कंटाळून पूजाने राहत्या घरात गळफास लावून आत्महत्या केली, अशी माहिती पूजाच्या ४६ वर्षीय आईने पोलिसांना दिली. या तक्रारीच्या आधारे दत्तापूर पोलिसांनी पती योगेश खडतकर, सासरे संजय खडतकर, तसेच देवर अतुल खडतकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून सखोल तपास सुरू केला आहे.

### राष्ट्रसंतांच्या महासमाधीस्थळी

वातावरनात वेगळेच चैतन्य निर्माण झाले होते. सामुदायिक ध्यानाच्या कार्यक्रमानंतर आश्रमाच्या महाद्वारावर नवी कोरी भगवी पताका अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवामण्डळच्या वतीने फडकविन्यात आली.भाविकांना गुरुतत्वाशी जोडण्यासाठी तसेच गुरूंना साक्षी ठेऊन सामाजिक धार्मिक व राष्ट्रीय हितासाठी प्रेरणा मिळावी या उद्देशाने अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळच्यावतीने दरवर्षी गुरुपौर्णिमा महोत्सवाचे आयोजन गुरुकुंजात केले जाते.

पहाटे चार वाजता अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवामंडळचे सर्वाधिकारी लक्ष्मण गमे यांच्या हस्ते पूजन करून सामुदायिक ध्यानाने या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी प्रचार प्रमुख प्रकाश वाघ यांनी सामुदायिक ध्यानावर चिंतन व्यक्त केले. दुपारी बारा वाजता ज्ञानेश्वरी दीदी यांचे गुरुमहिमा या विषयावर प्रवचन करण्यात आले. गुरुकुंजात दिवसभर सुरू असलेल्या कार्यक्रमात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज लिखित ' गुरुकृपा नही पडी सडक पर, यासह विविध लोकप्रिय भजने सादर करण्यात आली.

गुरुपौर्णिमा महोत्सवानिमित्त आज भाविकासाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली. हजारो भाविकांनी यानिमित्त महाप्रसासाचा लाभ घेतला.गुरुकुंजात दरवर्षी आयोजित करण्यात आलेल्या गुरुपौर्णिमा महोत्सवाची सांगता सामुदायिक प्रार्थनेने करण्यात आली. याकरीता अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवामंडळ व गुरुपौर्णिमा महोत्सव आयोजन समिती प्रमुख यांनी अथक परिश्रम घेतले.

### अनेक अधिकारी निलंबित;

आणि आणंदला जोडणारा पूल कोसळल्यानंतर महिसागर नदीतून १८ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. एनडीआरएफला गुरु वारी सकाळी २ मृतदेह, दुपारी एक आणि संध्याकाळी एक मृतदेह सापडला, तर बुधवारी १३ मृतदेह सापडले होते. या अपघातात एकाच कुटुंबातील तीन जणांचा मृत्यू झाला आहे. तर २ जण अजूनही बेपत्ता आहेत. गुजरातमधील वडोदरा येथे झालेल्या पूल दुर्घटनेनंतर राज्य सरकारने या प्रकरणी कारवाई केली आणि अपघातासाठी जबाबदार असलेल्या गुजरात रस्ते आणि इमारत विभागाच्या चार अभियंत्यांना तात्काळ निलंबित केले. प्राथमिक चौकशीच्या आधारे राज्य सरकारने ही कारवाई केली. या दरम्यान, सरकारने एनएम नाईकवाला (कार्यकारी अभियंता), यूसी पटेल (उप्र-कार्यकारी अभियंता), आरटी पटेल (उप्र-कार्यकारी अभियंता) आणि जेव्ही शाह (सहाय्यक अभियंता) यांना निलंबित केले. या अपघातानंतर मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी वडोदरा आणि आणंदला जोडणा-या या पुलावरील अपघाताची सखोल उच्चस्तरीय चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. मुख्यमंत्र्यांनी अपघातग्रस्त मुजपूर-गंभीरा पुलाची आतापर्यंत केलेली दुरु स्ती, तपासणी आणि गुणवत्ता तपासणी यासारख्या मुद्द्यांवर तज्ज्ञांच्या पथकाला अहवाल तयार करण्याची जबाबदारीही दिली होती. त्यानंतर तज्ज्ञांच्या पथकाने अपघातस्थळाला भेट दिली आणि अपघाताच्या कारणांचा प्राथमिक तपास अहवाल सरकारला सादर केला. याआधारे, राज्य सरकारने या चार अधिका-यांना निलंबित केले.

### 'कुठूनही पैसे आणा, पण शेतकरी

कशाला? घोषणा करायला नको. दिल्लीपासून तर गल्लीपर्यंत सरकार तुमचे आहे. केंद्र सरकारकडून शेतक-यांसाठी पैसे आणा. राज्याने जीएसटीच्या माध्यमातून ३१ हजार कोटी रु पये दिले. यूपीसारख्या राज्यांनी केवळ ९ हजार कोटी रु पये दिले. केंद्र सरकार पैसे द्यायला नकोत का. तुमच्याकडे पैसे नसेल तर आणा कुठून आणि शेतक-यांचा सातबारा कोरा करा, असे बाळा नांदगावकर यांनी म्हटले आहे. दरम्यान, महाराष्ट्राच्या मातीत कानाकोप-यात राबणारा एक वर्ग आहे, तो शेतकरी आणि मजूर आहे. मातीचा सुगंध अवघ्या महाराष्ट्राला नाही, तर देशाला देणारा हा महाराष्ट्रातील शेतकरी, शेतमजूराने सुखाचा श्वास घेतला पाहिजे. त्याचे मरण थांबले पाहिजे. यवतमाळमध्ये मनसेने दिलेला पाठिंबा दिला. बाळा नांदगावकर इथे आले. त्यांचे निश्चितच आम्ही आभार मानतो. देशाच्या आर्थिक राजधानीतून राज ठाकरे जेव्हासोबत राहतील, तेव्हा कर्जमाफीला एक वेगळी दिशा मिळेल. शेतक-यांना कर्जमाफी दिल्याशिवाय आम्ही शांत राहणार नाही. सरकारला नमावे लागेल आणि कर्जमाफी करावी लागेल. पैसे नाही म्हणतात तर शक्तिपीठ महामार्गाला वीस हजार कोटी कसे दिले? ते पैसे कुठून आले, तुमच्याकडे कोणी मागितले होते? साधा एक अर्ज शेतक-यांचा दाखवा की, शक्तिपीठ महामार्ग हवा म्हणून केला असेल. लाडकी बहीण योजना आमच्यावर लादली. अर्ध्या बहिणींचे अर्ज तुम्ही रद्द करून टाकले, जी मागणी आहे ते द्यायचे नाही आणि नको ते द्यायचे, अशी टीका बच्चू कडू यांनी केली.

### शिक्षण उपसंचालक संदीप सांगवे

तिजोरीचं कोट्यवधी रूपयांचं नुकसान केलं आहे. संदीप सांगवे यांची लक्षवेधी लागली तर याचे अनेक दलाल माझ्याकडे आले. ही लक्षवेधी सभागृहात मांडूच शकणार नाही असं खुलं आव्हान मला या अधिका-यानं दिलं होतं असं संजय उपाध्यय म्हणाले. ते म्हणाले की, 'महापालिकेतील अधिकारी माझ्यावर रेकी करत होते. एकही आमदार माझ्या विरोधात काही करू शकणार नाही अस वारंवार आव्हान दिलं गेलं. चौकशी चालू असताना या अधिका-यानं सरसकट चुकीच्या मान्यता दिल्या.' संदीप सांगवे हा अधिकारी अख्खी विधानसभा ताब्यात घेण्यासाठी दोन-पाच कोटी घेउन फिरतोय अशी चर्चा सुरू आहे असा गौप्यस्फोट यावेळी आमदार रणधीर सावरकर यांनी केला. त्यावर एका आठवड्याच्या आत चौकशी करून संबंधित अधिका-यावर कारवाई केली जाईल असं शिक्षणमंत्री दादा भुसे म्हणाले. या उत्तरावरून सभागृहात गोंधळ झाल्याचं पाहायला मिळालं. या प्रकरणाची चैकशी करण्यासाठी आयएस अधिकारी , आयपीएस आणि शिक्षण तज्ञ यांची एसआयटी स्थापन करु न चौकशी केली जाईल. कोणालाही पाठीशी घातलं जाणार नाही. तोपर्यंत संबधित अधिकारी संदीप सांगवेला निलंबित करण्यात येत आहे.

### राज्याचे सामाजिक न्यायमंत्री

मुलाने विकत घेतले, असा आरोप होत आहे. याप्रकरणाच्या चौकशीची मागणी विरोधकांकडून केली जात होती. असे असताना आता आयकर विभागाने नोटीस बजावली आहे. दरम्यान, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील नुकतीच मोठी घोषणा केली. छत्रपती संभाजीनगरमधील हॉटेल विट्सच्या विक्रीत सहभागी असलेल्या निविदा प्रक्रियेची चौकशी करण्याचे आदेश त्यांनी दिले. या प्रकरणात राज्याचे सामाजिक न्याय मंत्री आणि शिवसेना नेते संजय शिरसाट यांचे पुत्र सिद्धांत यांची कंपनीही सहभागी होती. त्यानंतर आता आयकर विभागाने ही नोटीस बजावली आहे. विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला | वाशिम | बुलडाणा
■ शुक्रवार, ११ जुलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com

# पंचायत समिती कार्यालय, कारंजा घाणीच्या विळख्यात



## बि.डी.ओं.चे दुर्लक्ष; वरिष्ठांच्या शस्त्रक्रियेची गरज

■ प्रशांत ठाकरे ■

**कारंजा : कारंजा तालुक्यातील सर्व गाव गाड्यांचा कारभार चालवीणारे प्रशासकीय मुख्य कार्यालय म्हणून कारंजा पंचायत समितीकडे पाहण्यात येते. पंचायत समिती कारंजा येथील कार्यालयामध्ये जाण्यासाठी असलेल्या प्रवेशद्वारा समोर व आत रस्त्यावर घाण पाण्याचे व चिखलाचे साम्राज्य पसरलेले आहे.**

खेड्यापाड्यावरून नागरिक आपल्या कार्यालयीन कामाकरीता पंचायत समिती कार्यालय या ठिकाणी येतात. त्याचप्रमाणे पंचायत समिती कारंजा अंतर्गत कार्यरत सर्व कर्मचारी ( शिक्षण विभाग, बांधकाम विभाग, पंचायत विभाग, कृषी विभाग, आरोग्य विभाग ) अधिकारी कार्यालयीन कामाकरीता पंचायत समिती कारंजा येथील प्रशासकीय इमारतीत मध्ये ये जा करतात. सततच्या पाण्यामुळे पंचायत समिती कार्यालयाच्या प्रवेशद्वारा समोरच गढूळ पाण्याचा नैसर्गिक लघु तलाव निर्माण झालेला आहे. अभ्यागत, कर्मचारी, अधिकारी यांना कार्यालयात येताना-जाताना या तलावाला पार करून प्रवेशाचे दिव्य पार करावे लागत आहे. कारंजा तालुक्यातील सर्व खेड्यापाड्यातील आरोग्य व्यवस्था व स्वच्छतेचे नियंत्रण करणाऱ्या प्राधिकरणालाच स्वच्छते विषयी असलेल्या कर्तव्याचा विसर पडला आहे. मोठ्या जिगरीने प्रवेशद्वार पार केल्यानंतर पंचायत समिती आवारातील पाण्यामुळे निर्माण झालेला गाटा स्वागताकरिता मुबलक प्रमाणात तयारच असते.

डोळसपणे कार्यभारासाठी प्रसिद्ध असलेल्या गटविकास अधिकारी राणे मॅडम मात्र या प्रकाराबाबत अंध असल्याचे त्यांच्या कोणतीही कृती न करण्याच्या कृतिवरून सिद्ध होत आहे. पंचायत विभाग व शिक्षण विभाग पडणाऱ्या पाण्याचा प्रत्यक्षात अनुभव घेत आहे. दोन्ही विभागामध्ये पाणी गळत असल्याने कार्य, कर्तव्य पार पाडीत असतांना पावसाळ्याचा प्रत्यक्षात अनुभव घेणे येथील कर्मचाऱ्यांना शक्य होत आहे. गटविकास अधिकारी राणे मॅडम यांच्या अंधदृष्टीची शस्त्रक्रियेची गरज असल्यामुळे वरिष्ठांनी त्वरित या प्रकरणी लक्ष घालून शस्त्रक्रिया करून त्यांची भूमिका व दृष्टी दुरुस्त करावी. या प्रकारची सर्वसामान्य नागरिकांकडून मागणी करण्यात येत आहे.

> गटविकास अधिकारी राणे यांना भ्रमणध्वनीद्वारे संपर्क केले असता मीटिंगमध्ये असल्याचे सांगितले. व्हाट्सअप द्वारे फोटो पाठवून प्रतिक्रिया विचारली असता कोणत्याही प्रकारची प्रतिक्रिया दिली नाही. कोणत्याही प्रकारचा संपर्क केला नाही, बोलणे टाळले.

## जलोत्सव अभियानात नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा - जिल्हाधिकारी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

पावसाळ्यात मिळणारे पाणी हे निसर्गाचे अनमोल देणे असून पाण्याचे व्यवस्थापन करण्यासाठी जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात 'जलोत्सव' या विशेष अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे. या अभियानामध्ये जलसंधारणाच्या कामांचे सामूहिक स्वरूपात उत्सव साजरे करण्यात येणार असून नागरिकांचा सक्रीय सहभाग अपेक्षित आहे.

जिल्हाधिकारी बुवनेश्वरी यांनी सांगितले की, पावसाचे पाणी साठवण्यासाठी आणि जमिनीत रिचार्ज कंपोस्ट करण्यासाठी नागरिकांनी स्वयंस्फूर्तपणे प्रयत्न करावेत. हे केवळ पर्यावरण रक्षणासाठीच नाही, तर भविष्यातील पाण्याच्या सुरक्षिततेसाठीही अत्यावश्यक आहे.ष्या अभियानांतर्गत, नागरिकांनी आपल्या घरात, परिसरात किंवा शेतीत तयार केलेल्या रेन वॉटर हार्वेस्टिंग संरचनांचे (जसे की जलतरा खड्डा, शाफ्ट, टाकी इ.) २० ते ३० सेकंदांचे व्हिडीओ तयार करून सोशल मीडियावर पोस्ट करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या व्हिडीओमध्ये व्यक्तीचे नाव, गाव, आणि पावसाचे पाणी साठत किंवा रिचार्ज होत असल्याचे दृश्य स्पष्टपणे दिसणे आवश्यक आहे. व्हिडीओ सहज व स्पष्ट असावा, त्यात कोणतीही एडिटिंग आवश्यक नाही. सेल्फी मोडमध्ये किंवा दुसऱ्याच्या सहाय्याने हा व्हिडीओ शूट करता येईल. व्हिडीओ पोस्ट करताना #caughttherain, #jalkranti, #PMModi हे हॅशटॅग वापरण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## यावार्डीच्या कु. प्रिया इंगळेला आदिशक्ती पुरस्कार



■ प्रतिनिधी | कारंजा ■

मागील नऊ वर्षापासून आदिशक्ती संस्थेतर्फे पुरस्कार दिल्या जातो. इयत्ता दहावीत ८५.४० टक्के गुण घेऊन शाळेतून प्रथम आल्याबद्दल यावार्डी येथील बाबासाहेब धाबेकर माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनीला पुरस्काराचे वितरण, रुपये दोन हजाराचे रोख पारितोषिक व सन्मान चिन्ह देण्यात आले. यावर्डी येथील बाबासाहेब धाबेकर माध्यमिक विद्यालयात ०४ जुलै रोजी आयोजित कार्यक्रमांमध्ये शाळेची विद्यार्थिनी कु. प्रिया राजाराम इंगळे हीला आदिशक्ती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आदिशक्ती महिला बहुउद्देशीय संस्था वाल्हई तालुका कारंजा तर्फे शैक्षणिक सत्र २०२४-२५ मधील इयत्ता दहावी मध्ये शाळेतून प्रथम येणाऱ्या मुलीला गत नऊ वर्षापासून आदिशक्ती पुरस्कार देण्यात येतो. त्यानुसार या वर्षी इयत्ता दहावी मध्ये ८५.४० टक्के गुण घेऊन विद्यालयातुन मुलीं मधून पहिली आलेली कु. प्रिया राजाराम इंगळे हिला आदिशक्ती पुरस्काराचे वितरण उपस्थित मान्यवराच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये रुपये दोन हजार रुपये रोख, प्रशस्तीपत्र व स्मृती चिन्हाचा समावेश आहे. कु. प्रिया इंगळे हिने वर्ग दहावी मध्ये ५०० पैकी ४२७ गुण प्राप्त करून शाळेतील मुलींमधून प्रथम येण्याचा मान प्राप्त केला होता.

## राज्य महसुल वाढीसाठी व रोजगार निर्मितीसाठी अनंत तायडे यांची अभिनव संकल्पना; शासनाकडे चर्चा करण्याची मागणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राज्याच्या आर्थिक बळकटीकरणासाठी व बेरोजगारी कमी करण्यासाठी नवनवीन उपाययोजना राबविण्याची गरज आहे, हे लक्षात घेऊन वाशिम येथील अनंत धर्मराज तायडे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार तसेच जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद प्रमुख व जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे एक सविस्तर निवेदन सादर केले आहे.

तायडे यांनी सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, त्यांच्या संकल्पनांची अंमलबजावणी केल्यास शासनास प्रतिवर्षी हजारो कोटी रुपयांचा अतिरिक्त महसुल मिळू शकतो. विशेष म्हणजे, यासाठी शासनास कोणताही अतिरिक्त आर्थिक भार पडणार नाही, असा दावा त्यांनी केला आहे.



तायडे यांनी आपल्या निवेदनात शासनाकडे मागणी केली आहे की, या संकल्पनांची सविस्तर माहिती घेण्यासाठी त्यांना शासन स्तरावर चर्चा करण्यासाठी निमंत्रित करावे. तसेच, यासंदर्भात ऑनलाईन लाईव्ह टेलीकास्टच्या माध्यमातून तज्ज्ञांना प्रश्न विचारण्याची मुभा द्यावी, जेणेकरून या संकल्पनांचे पारदर्शकपणे स्पष्टीकरण होऊ शकेल.तायडे यांनी असेही स्पष्ट केले की, राज्य व केंद्र सरकारकडून यापूर्वी त्यांच्या काही संकल्पना स्वीकारल्या गेल्या आहेत, याचे पुरावे त्यांच्याकडे उपलब्ध आहेत. मात्र, संकल्पना चोर वाढल्यामुळे त्यांनी अद्याप कोणत्याही प्रकारचा लिखित दस्तऐवज सादर केलेला नाही, याची नोंद घेण्याची विनंती त्यांनी केली आहे. तायडे यांच्या या अभिनव संकल्पनांमुळे राज्यातील महसूल वाढवणे, बेरोजगारी कमी करणे तसेच सामान्य जनतेच्या उत्पन्नात वाढ करणे या महत्त्वपूर्ण मुद्द्यांना चालना मिळू शकेल, असे मत अनेकांनी व्यक्त केले आहे.

**मुख्य मुद्दे व फायदे :** राज्यातील दारिद्र्यरेषेखालील किमान २ ते २.५ कोटी कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न ६० ते ८० हजार रुपयांनी वाढवता येईल. सौरऊर्जा प्रकल्पांच्या माध्यमातून राज्यातील १० ते १२ लाख सुशिक्षित बेरोजगार युवकांना आणि युवतींना कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध होईल. सौरऊर्जा क्षेत्रात कार्यरत कंपन्यांच्या वार्षिक उत्पन्नात किमान १ ते १.५ लाख कोटी रुपयांची वाढ होईल. राज्यातील सुमारे १० ते १२ लाख फुटपाथ व्यापाऱ्यांना निर्भयपणे व्यवसाय करता येईल.

## नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांना आयोगाच्या नोटीसा

**अकोला :** गेल्या सहा वर्षांत एकाही निवडणूकीत सहभागी न झालेल्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांना भारत निवडणूक आयोगाच्या आदेशाने मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून नोटीसा बजावण्यात येत आहेत. त्याअंतर्गत 'इंडियन मिलन पार्टी ऑफ इंडिया' यांनाही 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्यात आली आहे.

देशातील राजकीय पक्षांची नोंदणी ही लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम २९अ अंतर्गत केली जाते. त्याअंतर्गत नोंदणीकृत झालेल्या 'इंडियन मिलन पार्टी ऑफ इंडिया'ने २०१९ पासून सहा वर्षांत एकाही निवडणुकीत सहभाग घेतला नाही. त्यामुळे भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाने मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयातर्फे पक्षाची नोंदणी रद्द का करू नये, 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्यात आली आहे.

## नैसर्गिक हळद उत्पादन तंत्रज्ञानावर प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न



■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यात हळद हे एक महत्वाचे नगदी पीक म्हणून उदयास आले असून यावर्षी सुमारे १८ ते २० हजार हेक्टर क्षेत्रावर हळद लागवड झाली आहे. नैसर्गिक व सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या उद्यानविद्या विभागामार्फत शेतकऱ्यांना प्रशिक्षण, प्रात्यक्षिके आणि प्रक्षेत्र भेटींच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात येत आहे. या उपक्रमांना शेतकऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून नैसर्गिक पद्धतीने घेतलेल्या हळद उत्पादनातून चांगले उत्पन्न मिळत असल्याचे निदर्शनास आले आहे.

या अनुषंगाने दि. ८ जुलै रोजी रिसोड तालुक्यातील बीबखेडा गावात नैसर्गिक हळद उत्पादन तंत्रज्ञानावर एक दिवसीय प्रशिक्षण व प्रक्षेत्र भेटीचे आयोजन नवचैतन्य कृषी विकास शेतकरी उत्पादक कंपनी, रिसोड आणि कृषी विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. हे प्रशिक्षण प्रगतिशील शेतकरी सुशांत दिनकर आटोळे यांच्या शेतावर संपन्न झाले.

कार्यक्रमाचे उद्घाटन बीबखेडा ग्रामपंचायतीचे उपसरपंच श्री. विठ्ठल नरवाडे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्रगतिशील शेतकरी दिनकर आटोळे होते. तांत्रिक मार्गदर्शक म्हणून उद्यानविद्या तज्ज्ञ निवृत्ती पाटील उपस्थित होते.

## महिलांना कचरा व्यवस्थापनातून स्वयंपूर्णतेचा मार्ग : एकदिवसीय कार्यशाळेला प्रतिसाद



■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

नगर परिषद मंगरुळपीर व कुशाग्र इनोव्हेशन फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छ भारत अभियान नागरी २.० अंतर्गत तसेच दिनदयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानाच्या अंतर्गत महिला बचत गटासाठी एकदिवसीय विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत एकूण ५५ महिलांनी सहभाग नोंदवला. महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी आणि उपजीविकेचे नवे मार्ग शोधण्यासाठी या कार्यशाळेत विविध उपक्रमांवर प्रशिक्षण देण्यात आले. त्यामध्ये सुका कचरा प्रक्रिया केंद्र चालवणे, इ-कचऱ्याचे व्यवस्थापन, कापडाच्या कचऱ्याचा पुनर्वापर करून पर्स, पिशव्या, पॉकेट तयार करणे, बांधकामातील राडारोड्याचा पुनर्वापर, खतनिर्मिती (कंपोस्टिंग, बायोगॅस), तसेच फुलांच्या निर्माल्यापासून अगरबत्ती तयार करणे आदी विषयांचा समावेश होता.

याशिवाय बाजारपेठेची उपलब्धता, विक्री तंत्र आणि व्यवसाय वृद्धी याबाबत सखोल मार्गदर्शन देण्यात आले.

कार्यक्रमाला डे एन यु एल एमचे सहायक प्रकल्प अधिकारी राहुल भगत, समुदाय संघटक च. इंजळकर, शहर समन्वयक अर्जुन मेहरे, कार्यालयीन अधीक्षिका श्रीमती ममता ठाकरे, नेहा भगत, कुशाग्र फाउंडेशन पुणेचे प्रकाश जोगदंड व प्रफुल गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

## आयुष्मान भारत आणि महात्मा फुले जन आरोग्य योजनेमुळे वारकऱ्याचे वाचले प्राण

**अकोला :** आषाढी वारीसाठी नांदेडहून आलेले वारकरी बालाजी संगेकर (वय ७५) यांना अचानक हृदयविकाराचा तीव्र झटका आला. वारीदरम्यान तब्येत खालावल्याने तातडीने त्यांना पंढरपूर येथील डॉ.काने हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले. वैद्यकीय तपासणीनंतर त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे स्पष्ट झाले आणि अँजिओप्लास्टी करण्याचा निर्णय डॉक्टरांनी घेतला. उपचाराचा खर्च मोठा असल्याने संगेकर यांना एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत ETI (Emergency Tertiary Intervention) सेवा मिळाल्यामुळे संपूर्ण उपचार मोफत करण्यात आले.

## सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन

### सामाजिक संघटनांकडून कारखेड्यात पार पडणार विवाह विधि

■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील कारखेडा येथे हिंदू, मुस्लिम, बौद्ध, सिख आणि ख्रिश्चन धर्मातील उपवर वधूंच्या सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन बालब्रह्मचारी गोपाल महाराज मंगल कार्यालय कारखेडा येथे सामाजिक संघटनांच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे.

या मेळावायला राज्याचे मंत्री,संजय राठोड, इंद्रनील नाईक तसेच खा. संजय देशमुख,,बाळासाहेब मंगरूळकर आमदार,सई ताई डहाके,मदनभाऊ येरावार, धर्मगुरू बाबुसिंग महाराज आणि कबीरदास महाराज, सुनील महाराज, जितेंद्र महाराज, रमेश महाराज तसेच राजकीय नेत्यांना आमंत्रित करण्यात आले असून अनेक समाज सेवक उपस्थित राहणार आहे.



समाजातील डीजे आणि हुंडा पद्दत बंद व्हावी, तसेच समाजात होत असलेल्या एवाढव्य खर्चास आळा बसावा म्हणून सर्व जाती धर्माचा सामूहिक मेळावा दि. १९ जुलै २०२५ रोजी सकाळी आयोजित करण्यात आला आहे.

मेळाव्यात उपवधू वरांसोबत आई वडिलांना उपस्थित राहण्याची विनंती करण्यात आली आहे.मेळाव्यातील लग्न करणाऱ्यांना कन्या दान म्हणून शासन २५०००/- थेट खात्यात शासन अनुदान देणार आहे.

बंजारा समाजाच्या आर्थिक, राजकीय आणि आरक्षण, अन्याय, अत्याचार विरोधात लडनारी राष्ट्रीय बंजारा विकास मिशनचे राष्ट्रीय अध्यक्ष देवराव राठोड आणि गेली पंधरा वर्षा पासून समाज कार्य करणारी संस्था कमलदेवी तेजू फाउंडेशन यवतमाळच्या अध्यक्षा सौ. वर्षा अनिल चव्हाण यांच्या तालुक्यातील कारखेडा येथे हा सामूहिक विवाह सोहळा पार पडत आहे असे एका पत्रकात वर्षा अनिल चव्हाण यांनी म्हटले आहे.

वरील सामूहिक विवाह सोहळ्यासाठी गोपाल महाराज यांनी विनामूल्य मंगल कार्यालय उपलब्ध करून दिले अशी माहिती दिली.

## वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे!

### गो ग्रीन फाउंडेशनचा पर्यावरणपूरक स्तुत्य उपक्रम

**कारंजा :** वाढत्या शहरीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत असून तापमानवाढ, पाण्याची टंचाई व नैसर्गिक आपत्ती यासारख्या समस्या वाढत आहेत. यावर उपाय म्हणजे मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण आणि त्यांचे योग्य संवर्धन. हाच संदेश घेऊन गो ग्रीन फाउंडेशन, कारंजा ही संस्था मागील काही वर्षांपासून समर्पितपणे कार्यरत आहे.

संस्थेने आतापर्यंत ७०० ते ८०० झाडे शहरातील विविध सार्वजनिक व संरक्षित ठिकाणी लावली आहेत. विशेष म्हणजे, फक्त रोपं लावून थांबत नाही, तर त्यांच्या संगोपनासाठी पाणी देणे, ट्री गार्ड्स बसवणे, तण काढणे, खत देणे अशा सर्व जबाबदाऱ्या स्वतः पार पाडल्या जातात. गो ग्रीन फाउंडेशनकडून वड, पिंपळ, कडू निंब, आंबा, जांभूळ, कदंब, बहावा, बेल, चिंच, आवळा आदी देशी व पर्यावरण पूरक झाडांचीच लागवड केली जाते. झाडांची देखरेख किमान तीन वर्षे केली जाते, त्यामुळे झाडांची जीवितता व वाढ निश्चित होते.

संस्थेच्या कार्यामध्ये डॉक्टर, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व्यावसायिक, वन्यजीव अभ्यासक, पक्षी मित्र तसेच निसर्गप्रेमी नागरिक सहभागी आहेत. प्रत्येक सदस्य वार्षिक वृक्ष दान करतो, तसेच झाडांसाठी आवश्यक साहित्य, ट्री गार्ड्स आणि रोपे खरेदी करण्यासाठी देणगीही दिली जाते. या देणग्यांचा काटेकोर व पारदर्शक वापर केला जातो. दरवर्षी जून ते ऑगस्ट या काळात विशेष वृक्षारोपण मोहीम राबवली जाते.

## महिला पोलिस कर्मचा-याकडून नवविवाहितेला दमबाजी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

नवविवाहित महिलेला पोलिस कर्मचाऱ्यांनीच धमकावल्याचा खळबळजनक प्रकार वाशीममध्ये समोर आला आहे. सरस्वती मनोज खडसे (वय २५), या तरुणीने वाशीम ग्रामीण पोलीस स्टेशनला दिलेल्या निवेदनात पोलीस कॉन्स्टेबल रूपाली राहुल रोकडे व तिच्या सहकाऱ्यांविरुद्ध गंभीर आरोप केले आहेत.

संबंधित महिलेला तिचे भाडेकरू म्हणून राहणाऱ्या घराचे जबरदस्तीने जास्त पैशाची मागणी करत तिचे घरगुती साहित्यसह महत्त्वाची कागदपत्रेही परत न देण्याचा आरोप करण्यात आला आहे.सौ. खडसे या वाशीम तालुक्यातील पंचशील नगर येथे पतीसह वास्तव्यास होत्या. मात्र घर लहान असल्याने ऑक्टोबर २०२४ पासून त्यांनी सुंदर वाटिका वाशीम येथील महिला पोलीस रूपाली रोकडे यांच्या मालकीच्या घरात दरमहा तीन हजार रुपये भाड्याने राहत होत्या. डिपॉझिट म्हणून २०,००० रुपयेही रोकडे यांच्या सासूला दिले गेले. दरम्यान, वेळोवेळी



१५,००० रुपयांचे ऑनलाइन पेमेंट करून भाडे दिले असल्याचेही अर्जदाराचे म्हणणे आहे. सदर घरात पूर्वीच्या भाडेकरूने भरलेले न थकवलेले १२,००० रुपयांचे वीजबिलही नव्या भाडेकरूंना जबरदस्तीने भरायला लावण्यात आले. हे बिल भरून देखील काही दिवसांनी वीजपुरवठा खंडित करण्यात आला, त्यामुळे त्यांनी पुण्याला स्थलांतर केले. दरम्यान, पुण्याहून सामान घेण्यासाठी येण्याची तयारी करत असताना रात्री १.३० वाजता पोलिस कर्मचारी कपील अवचार यांनी 'एकटीच ये, नवऱ्यासह येऊ नको, नाहीतर सामान जाळून टाकीन' असा धमकीवजा फोन केल्याचा धक्कादायक आरोपही निवेदनात आहे. त्यानंतर जबरदस्तीने घर रिकामे करण्यास भाग पाडण्यात आले. घरात एलईडी टीव्ही, दोन कॉम्प्युटर, प्रिंटर, होम थिएटर, दोन कपाटे, फ्रीज, कुलर, भांडी, बॅटरी, सोलर प्लेट, लग्नसराईतील

### घर रिकामे करून सामान ठेवले अडवून

साड्या व महत्त्वाची कागदपत्रे यासह संपूर्ण संसार उपयोगी साहित्य अडकून आहे, असा आरोप सौ. सरस्वती यांनी केला. यावरून आता रूपाली रोकडे यांनी त्यांच्या विरोधात ४०,००० रुपये थकीत असल्याची बनावट नोटीसें ऐंज्जवर पाठवून धमकी दिल्याचेही म्हटले आहे. पोलिस कर्मचारी असलेल्या रूपाली रोकडे या त्यांच्या पदाचा वापर करून अटक व खोटी केस लावण्याची धमकी देत असल्याचे सरस्वती खडसे यांनी म्हटले आहे. यावरून त्यांनी जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक वाशीम यांच्याकडेही निवेदन देत न्यायाची मागणी केली आहे.या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी होत आहे. एका महिला पोलिसाच्या वर्तणुकीबाबत नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक २२६ ■ शुक्रवार, ११ जुलै २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# जप्त केलेला रेतीचा टिप्पर चक्क.. पोलिस ठाण्यातून पळविला

## -दोघांवर गुन्हा दाखल, अमरावतीच्या रेती तस्कराचा प्रताप

**तळेगाव जनमाध्यम :** रेती माफियांना आता पोलिसांचा धाकच राहिला नाही, तळेगाव पोलिसांनी अवैध रेतीचा टिप्पर पकडून तो पोलीस ठाण्याच्या आवारात नेऊन त्याच्यावर कारवाई करण्यात आली, त्या रेती माफियाने तळेगाव पोलिस ठाण्याच्या आवारातून मोठे धाडस करून जप्त केलेला रेती भरलेला टिप्पर चोरून नेला. या प्रकारामुळे पोलिस प्रशासनात एकच तारांबळ उडाली असून दोघांविरुद्ध तळेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कारवाई करून जप्त करण्यात आलेली रेती भरलेला एम. एच. २७ बी. एस. ७११४ क्रमांकाचा टिप्पर तळेगाव पोलिस स्टेशनच्या आवारात उभा करण्यात आला होता. या टिप्परमध्ये ६ ब्रास रेती होती. रेती भरलेला टिप्पर पोलिस स्टेशनच्या आवारात उभा असताना गजानन चंदुसिंग धुमोने रा. गुरुदेवनगर, मोझरी ता. तिवसा जि. अमरावती व त्याच्या एका साथीदाराने पळवून नेला. टिप्पर पळवून नेताना रेती माफियांनी सुरूवातीला २.१० ब्रास रेती पोलिस स्टेशनच्या आवारातच उतरवली. नंतर ३.९० ब्रास रेती भरलेला टिप्पर घेऊन पोबारा केला. रेती चोरट्यांच्या या कारनाम्यामुळे तळेगाव पोलिस ठाण्यातील अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांच्या कार्यप्रणालीवर प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या दणक्याने उड्डाण पुलाच्या दुरुस्तीला आला वेग

**हिंगणघाट जनमाध्यम :** येथील राष्ट्रीय महामार्गावरील नांदगाव चौकातील उड्डाण पुलावर एका वर्षात दोनवेळा पडलेल्या जीवघेण्या खड्ड्या बाबत पुराव्या सहित माहिती केंद्रीय मंत्री ना. नितीन गडकरी यांना भेटून दिल्यानंतर ना. गडकरी यांनी त्वरित राष्ट्रीय महामार्गच्या अधिकाऱ्यांना या उड्डाण पुलाबाबत माहिती देऊन सदर काम करणाऱ्या ठेकेदाराला ताबोडतोब ब्लॅकलिस्ट मध्ये टाकण्याचे आदेश दिले.ना. गडकरी यांचा आदेश येण्याच्या आधी ज्या पद्धतीने थातूर मातुर काम सुरु होते ते बंद करून वरिष्ठ महामार्ग अधिकारी हें स्वतः आपल्या तांत्रिक अधिकारी व कर्मचाऱ्यांसह स्वतः घटनास्थळी येवून या पुलाची स्थायी स्वरूपात दुरुस्तीचे काम सुरु केले आहे. यांच बरोबर उपजिल्हा रुग्णालया जवळील व कलोडे चौक



येथे सुरु असलेल्या उड्डाण पुलाच्या कामाकडेही या राष्ट्रीय महामार्गच्या अधिकाऱ्यांचे लक्ष दिसत आहे. ना. नितीन गडकरी यांना राका नेते अतुल वांदिले यांनी प्रत्यक्ष भेटीत निवेदन दिल्यावर व ना. गडकरी यांनी त्वरित दखल घेतल्याने हिंगणघाटचे सर्वसाधारण नागरिक या दोघांनाही धन्यवाद देत आहे. यावेळी मनसेचे राज्य चिटणीस हेमंत गडकरी हें उपस्थित होते.

येथील राष्ट्रीय महामार्गावरील उपजिल्हा रुग्णालया जवळील लोखंडी पूल वणा नदीवर स्थानांतरीत करण्याच्या एका विरोधी पक्षाच्या नेत्याने करूनही पक्ष भेद विसरून या दोन्ही मागणीची त्वरित दखल ना, गडकरी यांनी घेतली हें विशेष!

यावेळी राकाचे जिल्हाध्यक्ष सुनील राऊत, दशरथ ठाकरे उपस्थित होते.

# वॉशींगच्या दुकानाला आग; लाखाचे नुकसान



**हिंगणघाट जनमाध्यम :** येथील पिंपळगाव मार्गावरील स्पंदना वसतिगृहाच्या समोरील बाजूस असलेल्या वॉशिंग शो रूममध्ये बुधवार ९ जुलै रोजी रात्रीच्या सुमारास अचानक आग लागली. या आगीत अंदाजे एक लाखाचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

प्रणय निनावे यांच्या मालकीचे वॉशिंग सेंटरला अचानक आग लागली. या आगीत कॉम्प्रेसर व इतर अद्यावत मशीन, ऑइल, फर्निचर जळून खाक झाले. सततच्या पावसामुळे प्रणय हे दुपारी दुकान बंद करून घरी गेले. त्यानंतर रात्री ७.३० वाजताच्या सुमारास ही घटना घडली. दुकानातून धूर निघत असल्याचे लक्षात येताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. शिवाय अग्निशमन दलाला पाचारण केले. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळ गाठून आगीवर पाण्याचा मारा करीत परिस्थितीवर नियंत्रण मिळविले. शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याचे बोलले जात आहे. आग विझविण्यासाठी परिसरातील नागरिकांनी शर्तीचे प्रयत्न केले.

# नवीन नोकरीच्या शोधात असलेल्यांसाठी सुवर्णसंधी !

**वर्धा जनमाध्यम :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, प्रशासकीय भवन, ३ रा मजला, सिव्हिल लाईन्स, वर्धा येथे आज ११ जुलै रोजी सकाळी १० वाजता रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये अनेक नामांकित कंपन्या सहभागी होणार असून जिल्ह्यातील नोकरी इच्छुक उमेदवारांना रोजगाराची उत्तम संधी मिळणार आहे.

या रोजगार मेळाव्यात एकूण १७ रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. यामध्ये एसबीआय जीवन विमा कंपनी, एमडीएसएचजी प्रा.लि. व मल्लापूरम बँक वर्धा कंपन्या त्यांच्याकडील रिक्त पदे भरणार आहे. फील्ड एक्झिक्युटिव्ह -७ पदे, मॅनेजर -५ जागा, मल्टीपर्पज ऑफिस वर्कर -५ जागा असे एकूण १७ पदे भरण्यात येणार आहे.

इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी आपले शैक्षणिक प्रमाणपत्र, सी.व्ही. इत्यादी आवश्यक कागदपत्रांसह सकाळी १० वाजता जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रावर उपस्थित राहावे. उद्योजक उपस्थित उमेदवारांच्या मुलाखती घेऊन त्यांना ऑफर लेटर देतील आणि त्यांची नियुक्ती करतील. ही संधी नोकरीच्या शोधात असलेल्या तरुणांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त यांनी केले आहे.

# पालकमंत्री दोन दिवस जिल्ह्याच्या दौऱ्यावर

**वर्धा जनमाध्यम :** राज्याचे गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनिकर्म विभागाचे राज्यमंत्री तथा वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.भोयर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे.

दि. १२ जुलै रोजी सकाळी ९.३० वाजता नागपूर येथून वर्ध्याकडे प्रयाण करतील. सकाळी ११.३० वाजता वर्धा जिल्हा मुख्याध्यापक संघातर्फे आयोजित शैक्षणिक परिषद कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी १२ ते दुपारी १.४५ वाजेपर्यंत राखीव. दुपारी २ वाजता चरखा भवन सेवाग्राम रोड वर्धा येथे थोर स्वातंत्र्य सेनानी पाडुरंग गोसावी गुरूजी यांच्या स्मृती ग्रंथाचे प्रकाशन कार्यक्रमास उपस्थित राहतील. दुपारी ३ वाजता सार्वजनिक वाचनालय वर्धा येथे आयोजित संवाद शेतकरी बांधवाशी यशोगाथा व चर्चासत्र कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी ४ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह क्र. २ येथे इंडियन मेडिकल असोशिएशन वर्धा जिल्ह्यातील नेत्र तज्ञ यांच्यासमावेत बैठक तसेच मोतीबिंदू मुक्त वर्धा जिल्हा अभियान संदर्भात बैठकीस उपस्थित राहतील. त्यांनतर वर्धा येथून सोयीनुसार नागपूरकडे प्रयाण करतील. दि. १३ जुलै रोजी दुपारी २ वाजता कोराडी येथून वर्धाकडे प्रयाण करतील. दुपारी ३ वाजता जिल्हा परिषद सभागृह वर्धा येथे आगमन व आयुर्वेदा परिचर्या व नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोशिएशनच्या कार्यकारणी सर्वसाधारण बैठकीस उपस्थित राहतील व सोयीनुसार शासकीय वाहनाने नागपूरकडे प्रयाण करतील.



### सावंगीच्या कॅन्सर रुग्णालयात अवघड चेहऱ्याच्या पुनर्बांधणीची शस्त्रक्रिया

# कर्करुग्णाला मिळाला उपचारांनी नवा आत्मविश्वास

**वर्धा जनमाध्यम -** इतरत्र झालेल्या मुखकर्करोग शस्त्रक्रियेनंतर तोंडाच्या आतील बाजूसह गालाला आरपार छिद्र होऊन खाण्यापिण्यास व बोलण्यास त्रास आणि चेहरा कुरूप झाल्याने नैराश्यग्रस्त असलेल्या ४५ वर्षीय रुग्णाला उपचारांद्वारे त्याचा चेहरा पूर्ववत करीत नव्याने आत्मविश्वास मिळवून देणारी शस्त्रक्रिया सावंगी मेघे येथील सिद्धार्थ गुप्ता मेमोरियल कॅन्सर रुग्णालयात करण्यात आली.

यवतमाळ येथील या रुग्णाची काही दिवसांपूर्वी नागपूरच्या एका खासगी रुग्णालयात मुखकर्करोगाची शस्त्रक्रिया करण्यात आली. कर्करोगाची गाठ काढल्यानंतर गालावर मोठी जखम होऊन त्याचे रूपांतर फिस्टुलात झाले. त्यावर उपचार करण्यासाठी या रुग्णालयात प्रथम रुग्णाच्या मांडीची त्वचा व स्नायू वापरले गेले, मात्र ही शस्त्रक्रिया अयशस्वी ठरली. दुसऱ्या टप्प्यात छातीवरील स्नायू तर तिसऱ्या टप्प्यात कपाळावरील त्वचा वापरून शस्त्रक्रिया करण्यात आली, मात्र त्यातही अपयश आले. कर्करोगपश्चात झालेल्या उपचारांमध्ये सतत अपयश येत असल्याने रुग्ण आपला आत्मविश्वासच गमावून बसला. रुग्णाला खाणे, पिणे आणि बोलणे अशक्य झाले होते. या दरम्यान परिचित व्यक्तीने सावंगी रुग्णालयात उपचार घेण्याचा सल्ला दिला.



अत्यंत गुंतागुंतीच्या स्थितीत या रुग्णाला सावंगीच्या सिद्धार्थ गुप्ता मेमोरियल कॅन्सर रुग्णालयातील प्लास्टिक सर्जरी विभागात दाखल करण्यात आले. येथे प्लास्टिक अँड रिकन्स्ट्रक्टिव्ह सर्जन डॉ. फिरोज बोरले यांनी रुग्णतपासणी केली. रुग्णाच्या गळ्याची त्वचा कठीण व संसर्गग्रस्त झाल्यामुळे नवीन फ्री फ्लॅप करता येणे शक्य नव्हते. अखेर फ्लॅप डीले टेक्निकचा वापर करून पुनर्बांधणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार डॉ. बोरले आणि वैद्यकीय चमूने उपचार सुरू केले आणि रुग्णाला त्याचा आत्मसन्मान परत मिळवून देणारी ही शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्णत्वाला नेण्यात आली.

**आधुनिक तंत्रज्ञान, तज्ज्ञांचे कौशल्य व अनुभवामुळे शक्य झाले -डॉ. बोरले**

अडीच महिन्यांच्या या तीन टप्प्यातील उपचार प्रक्रियेत प्रथम पीएमएमसी फ्लॅपच्या काही रक्तवाहिन्यांना बंद करून उरलेल्या भागात रक्तपुरवठा सुधारण्याचा प्रयत्न केला गेला. त्यानंतर हळूहळू त्या फ्लॅपला उचलून गालावरील जखमेवर हलविण्यात आले. शेवटी जखम पूर्णपणे बंद करण्यात आली आणि प्लास्टिक सर्जरीद्वारे तोंड व बाहेरचा गाल यातील छिद्र कायमचे बंद करण्यात आले. या यशस्वी शस्त्रक्रियेमुळे रुग्णाची जखम पूर्ण बरी झाली असून त्याचे सर्व दैनंदिन व्यवहार पूर्ववत झाले आहेत आणि त्याचा आत्मविश्वासही दुणावला आहे, असे डॉ. फिरोज बोरले यांनी सांगितले.

# नागपूरला जाणारा टोमॅटोचा ट्रक पलटला

## -जीवितहानी नाही, ट्रकचे मोठे नुकसान



**हिंगणघाट जनमाध्यम :** नागपूर-हैदराबाद महामार्गावरील शासकीय रुग्णालय चौक परिसरात टोमॅटो घेऊन जाणारा ट्रक अनियंत्रित होत उलटला. ही घटना बुधवारी मध्यरात्री १२ वाजताच्या सुमारास घडली. चालकाने वेळीच वाहनाबाहेर उडी घेतल्याने थोडक्यात बचावला.

मिळालेल्या माहितीनुसार, ए. पी. ३९ यू. डी. ६२९९ क्रमांकाचा ट्रक टोमॅटो घेऊन हैदराबाद येथून नागपूरच्या दिशेने जात होता असताना शासकीय रुग्णालय चौकात चालकाचे नियंत्रण सुटले. नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न चालकाने केला.

पण, यश येत नसल्याचे लक्षात येताच त्याने वाहनाबाहेर उडी घेतली. त्यानंतर ट्रक उलटला. यात ट्रकचे मोठे नुकसान झाले. तसेच ट्रक उलटल्याने रस्त्यावर टोमॅटोचा सडा पडला होता. अपघाताची माहिती मिळताच हिंगणघाट पोलिसांनी घटनास्थळ गाठले. शिवाय खोळंबलेली वाहतूक सुरळीत केली.

### वारी विठुची' एक वेगळाच अनुभव

# पंढरपूरच्या वारीचा, सुकळी येथे साजरा करण्यात आला

**वर्धा जनमाध्यम -** आषाढी एकादशीच्या निमित्याने येळाकेळी ते श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर सुकळी (बाई) पर्यंत पायदळ दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडीत समस्त विठ्ठल भक्तांनी सहभाग घेतला होता. पंढरपूर ला जाणारी वारीचा जसा प्रत्यक्ष अनुभव असतो तो अनुभव सर्व विठ्ठल भक्तांना या ठिकाणी घेतला. गावातील अनेक भजन मंडळ, तसेच वर्धेचे विणा दाते, वनिता धामंदे याचे महिला भजनी मंडळ तसेच इस्कॉन चे प्रकाश जावुळकर याचे भजनी मंडळी, विठ्ठल भक्त या दिंडीत सहभागी होते. विठ्ठल नामाच्या गजरात दिंडीची सुरुवात येळकेळी पासून माजी सरपंच जयश्री उडदे यांनी भगवा झेंडा दाखवून दिंडीची सुरुवात झाली. विठ्ठल रुक्मिणीची मूर्ती डोक्यावर ,भगवे पताके हातात, टाळ, विना,मृदुंग आणि विठ्ठलाचा गजर या सगळ्या वातावरणात येळकेळी ते सुकळी पर्यंतचा मार्ग विठ्ठल नामाने जणू भारावून गेला अशा प्रकारचे चित्र या ठिकाणी निर्माण झाले होते. पायांनी चालतो तो प्रवास,



मनाने चालते ती यात्रा आणि हृदयातून चालतो ती वारी असा प्रत्यक्ष अनुभव या पायदळ दिंडीत लोकांनी घेतला. दिंडी नंतर सुकळी गावात शिरल्यावर पायदळ वारीचा आंनद आणखी द्विगुणित होऊन गावातील लोकांचा उत्साह बघण्यासारखा होता.गावातील लोकांनी दिंडीला भरघोस प्रतिसाद दिला. नंतर पायदळ दिंडी विठ्ठल रुक्मिणी मंदिर मध्ये पोहचल्यावर विठ्ठल भेटीनंतर परमानंदाने न्हाहून निघाला. अशा प्रकारे नामाच्या गजरात दिंडीचे समापण झाले. नंतर सर्व दिंडीतील भजन मंडळातील विठ्ठल भक्तांचे सुश्री.साधना सराफ यांनी भगवा शेला आणि तुळशीचे रोपटं देऊन मान्यवरांना सन्मानित करण्यात आले. वारीचा आनंद या ठिकाणी विठ्ठल भक्तांकडून व्यक्त करण्यात आला. आणि सर्वांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. विठुची वारी या दिंडीचे आयोजन सुश्री. सुहासिनी सराफ, श्री प्रशांत सराफ यांच्या मार्गदर्शनाने या वारीचे संचालन करण्यात आले. पूर्ण वारी यशस्वी रित्या पार पाडण्यासाठी महादेव बाबा सेवा समितीचे समस्त पदाधिकारी आणि ग्रामस्थांनी सहभाग घेतला होता.

### महसूल अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाईच्या निषेधार्थ

# विदर्भ पटवारी संघाचे एकदिवसीय धरणे आंदोलन

## -निलंबन मागे घेण्याची मागणी

**वर्धा जनमाध्यम:** आर्वी तालुक्यातील देऊरवाडा येथे कार्यरत महसूल अधिकारी आणि वाठोडाच्या विभागीय अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली. या कारवाईच्या निषेधार्थ महसूल अधिकारी आणि विभागीय अधिकाऱ्यांनी गुरुवार १० जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील महात्मा गांधी पुतळा परिसरात धरणे आंदोलन करून निलंबन मागे घेण्याची मागणी केली.



अवैध रेती उत्खनन आणि वाहतूक प्रकरणात आर्वी तालुक्यातील देऊरवाडा येथील महसूल अधिकारी शुभांगी डेहनकर आणि वाठोडाचे विभागीय अधिकारी किशोर चौधरी यांना निलंबित करण्यात आले. कर्मचाऱ्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी न देता जिल्हाधिकाऱ्यांनी एकतर्फी निलंबनाची कारवाई केल्याचा आरोप करण्यात आला. अनधिकृत रेती प्रकरणाची चौकशी करून १७ एप्रिल रोजी तहसीलदारांना अहवाल सादर केला होता.

तहसीलदारांनी त्याची दखल घेतली आणि २२ एप्रिल रोजी पंचनामा केला. जप्त केलेली रेती तहसील कार्यालयात वर्ग करण्यात आली. या प्रकरणात महसूल अधिकारी आणि विभागीय अधिकाऱ्यांनी त्यांचे कर्तव्य प्रामाणिकपणे बजावले. परंतु, चुकीच्या माहितीमुळे निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. या अन्यायकारक कारवाईच्या निषेधार्थ विदर्भ पटवारी संघ तसेच जिल्ह्यातील सर्व महसूल अधिकारी आणि विभागीय अधिकारी या एक दिवसीय धरणे आंदोलनात सहभागी झाले होते.

# जेव्हीबीसी कंपनीच्या संचालकाला अटक

## -६३० गुंतवणुकदारांना घातला २.४९ कोटींचा गंडा

**कारंजा (घा.) जनमाध्यम:** येथील जेएसव्ही डेव्हलपर इंडिया लिमिटेड व जय विनायक बिल्ड क्रॉप लिमिटेड नावाने कंपनी सुरू करून जादा परत फेडचे आमिष देत तब्बल ६३० गुंतवणुकदारांना २.४९ कोटींनी गंडा घालण्यात आला. कारंजा पोलिस ठाण्यात दाखल या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून केला जात आहे. पोलिसांनी कंपनीचे संचालक दिनेश टेंभरे (४६) रा. आमगाव जि. गोंदिया यास सहा वर्षानंतर ८ जुलै रोजी अटक करून १५ जुलैपर्यंत पोलिस कोठडी मिळवली आहे.

कारंजा पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या आर्थिक ठगबाजीच्या प्रकरणातील आरोपींनी जेएसव्ही डेव्हलपर इंडिया लिमिटेड व जय विनायक बिल्ड क्रॉप लिमिटेड या नावाने कंपन्या स्थापन केल्या. याच कंपनींमध्ये नियमित ठेवी, मुदतठेवी व दैनदिन ठेवींवर जास्त व्याज देण्याचे आमीष देत एजन्टच्या मार्फत परिसरातील नागरिकांची मोठी गुंतवणूक करून घेतली. पण, नंतर पैसे परत करण्यास टाळाटाळ करण्यात आली. ही बाब पुढे आल्यावर तक्रारीवरून कारंजा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला. प्राथमिक चौकशीत ६३० गुंतवणुकदारांची २ कोटी ४९ लाख २८ हजार २४० रुपयांनी फसवणूक झाल्याचे पुढे आले. त्यांनतर हे प्रकरण सखोल तपासासाठी आर्थिक गुन्हे शाखेकडे वळते करण्यात आले. पोलिसांनीही सन २०१९ मध्ये दाखल असलेल्या या गुन्ह्याच्या अनुषंगाने ६ वर्षांपासून फरार असलेल्या आरोपी देवेंद्र नागपुरे (४७), प्रमोद कुकडे दोन्ही रा. दवनीवाडा जि. गोंदिया यांना २४ जून रोजी अटक केली. तर आता कंपनीचा संचालक दिनेश टेंभरे याला ८ जुलैला अटक करून त्याची १५ जुलैपर्यंत पोलिस कोठडी मिळवली. दिनेशवर मध्यप्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र येथे ५ ते ६ गुन्हे दाखल आहे. आर्थिक गुन्हे शाखेकडून आरोपीने फसवणूक करून त्या रकमेतून जी मालमत्ता विकत घेतली ती मालमत्ता गुन्ह्यात संलग्न केली आहे. तसेच संबंधित मालमत्तेच्या लिलावासाठीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी वर्धा यांच्या मार्फत शासनाकडे पाठविला आहे. तर उर्वरित फरार आरोपींचा शोध सध्या घेतला जात आहे.

पुढील तपास पोलिस अधीक्षक अनुराग जैन, पोलिस उपअधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा पुंडलिक भटकर यांच्या मार्गदशनात पोलिस निरीक्षक विलास पाटील, पोलिस उपनिरीक्षक शांताराम मुदमाळी, गजानन काळे, संतोष जयस्वाल, शैलेश भारशंकर, विरेद्र कांबळे, राजेश पाचरे, देवेंद्र कडु, मनोज झाडे, रोशनी ठाकरे करीत आहेत.

# स्वाधार योजनेचे अर्ज स्विकारण्यासाठी आज विशेष शिबीर

**वर्धा जनमाध्यम :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे सन २०२४-२५ या वर्षात एकूण २६९ विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाइन प्रणालीतून स्विकारण्यात आले असून विद्यार्थ्यांचे अर्ज त्रृटीपूर्तता करण्यासाठी सेंडबॅक करण्यात आले आहेत. परंतु hmas.mahait.org या ऑनलाइन प्रणालीवर त्रृटीपूर्तता करण्याची कार्यवाही १० जून २०२५ पासून बंद असल्याने सेंडबॅक झालेले अर्ज ऑफलाइन पध्दतीने ११ जुलै रोजी विशेष शिबिरामध्ये स्विकारण्यात येणार आहे.

# पतंजलीच्या वतीने गुरूपूर्णिमा महोत्सव उत्साहात साजरा

**हिंगणघाट जनमाध्यम :** रा.सू.बिडकर महाविद्यालयात गुरुपौर्णिमा निमित्ताने पतंजली योग परिवाराचे वतीने गुरु पूर्णिमा महोत्सव कार्यक्रम क्रिडाभवणात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारत स्वाभिमान ट्रस्ट प्रभारी अध्यक्ष वसंतराव पालगुरूजी,तर प्रमुख प्रामुख्याने ज्ञानेश्वर खडसे,ह.भ.प. राजा महाराज शेंडे, डॉ.गंगाधर नाखले, मार्गदर्शक योग शिक्षक योगेश सुंकटवार संगिता आगरकर, श्रीमती विद्या पेंडके. उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी वैदिक हवन द्वारे करण्यात आली.गुरुपौर्णीमेचे उत्सवाबाबत राजा महाराज यांनी तर योग प्राणायाम , प्राणायाम सूर्यनमस्कार



यावर योगशिक्षकांनी मार्गदर्शन केले.उपस्थित योगसाधकांना मान्यवरांनी गुरुपौर्णिमेनिमित्त मार्गदर्शन केले. व गुरु पौर्णिमेचे महत्त्व विशद केले.सदर कार्यक्रमाचे संचालन व आभार अनिल तरोडकर यांनी केले.

लक्ष्मणराव तेजणे, गोपाल मांडवकर, सुरेश दविले, मनोहर झोंटिग, रविकुमार भालेकर, वैभव निनावे, आयुष हावगे, राजेंद्र वरखेडे, परमेश्वर खडसे,शरदचंद्र बाकडे, अरुण थुटे, अशोक ठाकरे, विशाल गिरसावळे, संजयजी अवचट, सुरेश भोयर, पुरण जयस्वाल सह महीला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.



# जनसुरक्षा विधेयक एकमताने मंजूर

## नक्षलवादी संघटनांच्या कारवायांना चाप लावण्यासाठी मोठा निर्णय



**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून वादग्रस्त ठरलेले महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आलं आहे. जनसुरक्षा विधेयकावर विरोधकांनी आक्षेप घेतल्यानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. चंद्रशेखर बावनकुळेंच्या अध्यक्षतेखालील समितीने तयार केलेला अहवाल ९ जुलै रोजी विधानसभेत पटलावर ठेवण्यात आला होता. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे विधेयक विधानसभेत मांडले. त्यानंतर एकमताने हे जनसुरक्षा विधेयक मंजूर करण्यात आलं आहे.

शहरी नक्षलवाद आणि लोकशाहीविरोधी संघटनांचा बिमोड करण्यासाठी हे विधेयक आणण्यात आलं. १२,५०० सूचनांचा अभ्यास करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनसुरक्षा विधेयक विधानसभेत सादर केलं होतं. चर्चेनंतर आवाजी मतदानाने हे विधेयक मंजूर करण्यात आलं आहे. शहरी नक्षलवादी संघटनांच्या कारवायांना चाप लावण्यासाठी महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. तसेच हे विधेय राजकीय भूमिकेतून नाही, तर देशाच्या अंतर्गत सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचं असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.या विधेयकाला डाव्यांचे माकपचे आमदार विनोद निकोले यांनी विरोध केला. 'मी कम्युनिस्ट पक्षाचा एकमेव आमदार सभागृहात आहे. मार्क्स संविधानाला मानतो. डाव्या संघटनांच्या नेतृत्वाखाली जेव्हा आम्ही नाशिकवरुन शेतक-यांचा मोर्चा काढला. तेव्हा बोर्डाच्या परीक्षा होत्या. विद्यार्थ्यांना अडचण होईल म्हणून आमचा शेतकरी सलग चालून रात्रीच मुंबईत दाखल झाला. जेणेकरुन दिवसा आपला त्रास होउ नये. आमच्या अशा मोर्चांनाही उद्या बेकायदेशीर ठरवणार आहात का,' असा सवाल करत आमदार विनोद निकोले यांनी विधेयकाला विरोध दर्शवला.

'जनसुरक्षा कायद्यासंदर्भात अनेकांच्या मनात संभ्रम आहे, परंतु पुराव्यांची पूर्तता झाल्याशिवाय अटक करण्याची तरतूद या कायद्यात नाही, बॅन झालेल्या संघटनेचा कुणी मेंबर असेल तरच अटक होईल. इतर राज्यापेक्षा आपण जो कायदा केलेला आहे तो अतिशय व्यवस्थित आहे, आपला उद्देश कुणालाही उचलून जेल मध्ये टाकणं हा नाही. अनेकांनी या कायद्याच्या बाबतीत संभ्रम निर्माण करण्याचे प्रयत्न केले परंतु सरकारच्या बतीने सर्व सन्मानित पत्रकारांना बोलवून मुद्दा दर मुद्दा त्यांच्या आक्षेपांचं निराकरण करण्यात आलं,' असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

### कायद्याबद्दल गैरसमज पसरवले जात आहेत

हा अहवाल सादर होताना कोणतीही डिसेंट नोट नाही. ही अभिमानाची गोष्ट आहे. लोकशाही संघटना असल्याचा नावानं बनाव असला तरी, कडवी डावी विचारसरणीने प्रेरित होउन अनेक लोक बंदूका हातात घेउन व्यवस्थेच्या विरोधात होते. साम्यवादी विचारांचे राज्य उभारण्याचा त्यांचा उद्देश होता. राज्यात नक्षलवादी विचारांचा प्रभाव असलेले ४ जिल्हे होते. आता फक्त २ तालुके उरले आहेत, ते देखील संपतील. सगळ्यात जास्त डाव्या विचारसरणीच्या संघटना महाराष्ट्रात असून, हा आकडा ६४ आहे. कायदा नसल्यामुळे त्यांच्यावर बंदी घालता येत नाही. बाहेरील राज्यांत बंदी असल्यामुळे त्या संघटना महाराष्ट्रातून ऑपरेट करत आहेत. या कायद्यानंतर कुणालाही अटक करता येणार नाही. कायद्याबद्दल गैरसमज पसरवले जात आहेत. पुरावे सापडले तर फोरमसमोर जावे लागेल. त्यांनी मान्यता दिल्यानंतर अटकेची कारवाई होईल. फोरमच्या मान्यतेनंतरही संघटनेला न्यायालयात जाण्यासाठी एक महिन्याची मुभा आहे. राज्य सरकारवर टीका केली, पोलिसांवर टीका केली म्हणून कारवाई होणार नाही. हा समतोल साधणारा कायदा आहे. इतर राज्यांपेक्षा आपला कायदा पुरोगामी आहे. कुणालाही त्रास देण्यासाठी नाही, हे दाव्याने सांगतो, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले. जनसुरक्षा विधेयक वादात अडकले होते. या विधेयकावर विरोधकांनी आक्षेप घेतल्यानंतर चर्चा करण्यासाठी दोन्ही सभागृहांच्या सदस्यांची एक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीचा अहवाल ९ जुलै रोजी विधानसभा सभागृहात पटलावर ठेवण्यात आला. विरोधकांच्या आक्षेपानंतर या विधेयकात काही बदल करण्यात आले. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनसुरक्षा विधेयक विधानसभेत सादर केले. विरोधकांनी सूचवलेले बदल आम्ही केले असून, यावर आता सार्वमत झाले आहे. लोकशाही न मानणा-या संघटनांना संविधानावर आधारित राज्य उलथवून टाकायचे आहे. त्यांच्यावर नियंत्रण आणण्यासाठीच हा कायदा आणत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. दुसरीकडे, या विधेयकाला १२ हजार ५०० सूचना, हरकती आल्या होत्या. त्याचा अभ्यास करून मूळ विधेयकात तीन महत्त्वाचे बदल करण्यात आल्याचे समजते.

### जनसुरक्षा कायदा म्हणजे काय?

- जनसुरक्षा कायदा (PSA) हा एक अजामीनपात्र आणि प्रतिबंधात्मक कायदा आहे. या कायद्यानुसार, जर सरकारला वाटत असेल की, एखादी व्यक्ती सार्वजनिक सुव्यवस्थेसाठी किंवा राष्ट्रीय सुरक्षेसाठी धोका आहे, तर त्या व्यक्तीला कोणत्याही आरोपाशिवाय ताबडतोब ताब्यात घेतले जाउ शकते.
- या केंद्रीय कायद्याअंतर्गत कारवाई करताना अनेक वेळा प्रशासकीय अडचणी आणि पूर्वपरवानगीचे अडथळे येतात. महाराष्ट्रात स्वत?चा स्वतंत्र कायदा बनवण्याची मागणी अनेक वर्षांपासून केली जात आहे. राज्य सरकारचा असा युक्तिवाद आहे की, हा राज्याचा अंतर्गत सुरक्षेसाठी एक प्रभावी कायदा असेल.
- महाराष्ट्राला जनसुरक्षा कायद्याची आवश्यकता काय?
- हा जनसुरक्षा कायदा आणि त्याअंतर्गत बनवलेला कायदा प्रामुख्याने अंतर्गत सुरक्षेशी संबंधित आहे. या कायद्याचा मुख्य उद्देश नक्षलवादी/माओवादी आणि अंतर्गत सुरक्षेला धोका निर्माण करणा-या इतर संघटना आणि व्यक्तींवर कारवाई करणे असा आहे.
- देशातील काही नक्षलग्रस्त राज्यांमध्ये असा विशेष कायदा आधीपासूनच अस्तित्वात आहे. परंतु महाराष्ट्रात असा कायदा नसल्याने पोलीस आणि सुरक्षा यंत्रणांना UAPA सारख्या केंद्र सरकारच्या कायद्यांचा आधार घ्यावा लागतो.
- जनसुरक्षा कायद्यातील तरतुदी काय आहेत?
- एखाद्या संघटनेला बेकायदेशीर संघटना जाहीर करता येउ शकेल. तसेच त्या संघटनेचे कार्यालय, परिसर, इतर संपत्ती जप्त करता येईल. बेकायदा जाहीर झालेल्या संघटनेच्या बँकमधील खाते गोठवता येईल.
- संघटनेला बेकायदा ठरवण्यासाठी उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाच्या समकक्ष तीन सदस्यीय सल्लागार मंडळ असेल. सल्लागार मंडळाच्या परवानगी नंतरच एखाद्या संघटनेला बेकायदा जाहीर करता येईल. त्यामुळे एखाद्या अधिका-याची मनमानी चालेल असे होणार नाही, असे म्हटले जात आहे.
- डीआयजी रँक अधिकाराच्या परवानगीनेच गुन्हे दाखल करता येईल. किमान पोलीस उपनिरीक्षक दर्जाचा अधिकारीच या गुन्ह्याचा तपास करेल. अतिरिक्त पोलीस महासंचालक दर्जाच्या अधिका-याच्या परवानगीनेच या गुन्ह्यांमध्ये आरोपपत्र दाखल करता येईल. त्यामुळे कायद्याचा गैरवापर होणार नाही याची काळजी सरकारकडून घेतली जात आहे.
- बंदी घातलेल्या संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते नव्या नावाने संघटना उभारून तेच कार्य करत असतील, तर नवी उभारलेली संघटना ही मूळ बेकायदा संघटनेचा भाग मानली जाईल, ती ही बेकायदा ठरेल. दरम्यान, केंद्र सरकारने देखील अनेक वर्षांपासून महाराष्ट्र राज्याने असा कायदा करावा अशी अपेक्षा ठेवली होती. अंतर्गत सुरक्षेसाठी केंद्र सरकारकडून राज्यांना निधी दिला जातो. त्या योजनेमध्ये केंद्राकडून अंतर्गत सुरक्षेसाठी निधी मिळवणा-या राज्याने असा सक्षम कायदा करावा अशी अपेक्षा करण्यात आली आहे.

## शेतमजुरांना सामाजिक सुरक्षा देणारी नवीन योजना

**मुंबई/प्रतिनिधी :** शेतकरी आत्महत्या होउच नये यासाठी शेतकरी हिताच्या विविध योजनांचे प्रभावी कार्यान्वयन करण्यात येत आहे. तसेच कृषी क्षेत्रातील गुंतवणुक करून कृषीला समृद्ध करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. शेतकरी आत्महत्या शून्यावर आणण्याचे शासनाचे उद्दिष्ट असून त्यासाठी शासन सर्वतोपरी कार्य करीत आहे. याचबरोबर शेतमजुरांना सामाजिक सुरक्षा देणारी नवीन योजना लवकरच राज्यात लागू करण्यात येणार असल्याची घोषणा वित्त व नियोजन, मदत व पुनर्वसन, विधि व न्याय, कामगार आणि कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी विधानसभेत केली. विधानसभेत विरोधी पक्षांनी नियम २९३ अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर उत्तर देताना कृषी राज्यमंत्री जयस्वाल बोलत होते. राज्यमंत्री जयस्वाल म्हणाले, राज्यामध्ये १ कोटी ७१ लाख शेतकरी आहेत. या शेतक-यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. संकटकाळात त्यांच्या पाठीशी राज्य शासन खंबीरपणे उभे आहे. नमो शेतकरी सन्मान योजना, पीक विमा योजना, कृषी यांत्रिकीकरण, गोपीनाथ मुंडे शेतकरी सानुग्रह अनुदान योजनेसह राज्यात ६९ हजार ८८९ कोटींचा खर्च करण्यात आला आहे. नमो शेतकरी सन्मान योजनेतून गेल्या तीन वर्षात ५६ हजार २९३ कोटींची मदत करण्यात आली आहे. मागील तीन वर्षात मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनेच्या माध्यमातून अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील शेतक-यांसह १९ हजार ३१० कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला आहे. पीक विमा योजनेतून १६ हजार ३८९ कोटी, नुकसान भरपाईपोटी १९ हजार ५९२ कोटी रुपयांची मदत देण्यात आली आहे. शेतक-यांना संपन्न करण्यासाठी निर्यातक्षम पीक लागवडीला शासन प्रोत्साहन देणारा आहे. पिकांची संपत्ती आणि दायित्व अशा दोन पद्धतीने विभागणी करण्यात येईल. पीक विमा योजनेच्या माध्यमातून शेतक-यांना मदत करण्यात आली आहे. राज्य आपत्ती आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या निकषांपेक्षा जास्त शेतक-यांना मदत दिली आहे. पीक विमा योजनेत मदत न मिळालेल्या शेतक-यांना शासन मदत करेल. शासनाने एक रुपयात पीक विमा योजनेत बदल केल्यामुळे यामधून वाचलेले ५ हजार कोटींची कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक करण्यात येणार आहे. कृषी विभागात लाभासाठी लॉटरी पद्धत बंद करण्यात आली असून प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या पद्धतीनुसार लाभ देण्यात येणार आहे. ज्या योजनेत जास्त मागणी आहे त्या योजनेत नियतव्यय वाढवून देण्यात येणार आहे.

## कस्तुरबा सेवाग्राम रुग्णालयातील आरोग्य सुविधांसंदर्भात उच्चस्तरीय समिती गठीत करणार

**मुंबई/प्रतिनिधी :** वर्धा जिल्ह्यातील कस्तुरबा हेल्थ सोसायटीद्वारे संचालित कस्तुरबा सेवाग्राम रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयाच्या आरोग्य सुविधा आणि व्यवस्थापन संदर्भातील तक्रारीबाबत उच्चस्तरीय समिती गठीत करून स्थानिक लोकप्रतिनिधींसोबत बैठक घेउन सविस्तर आढावा घेतला जाईल असे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी विधानसभेत सांगितले. विधानसभा सदस्य राजेश बकाने यांनी प्रश्नोत्तराच्या तासात या विषयावर प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर उत्तर देताना श्री. मुश्रीफ बोलत होते. कस्तुरबा सेवाग्राम रुग्णालय गोरगरीब रुग्णांसाठी माफक दरात सेवा पुरवते. हे रुग्णालय ५० टक्के केंद्र सरकार आणि २५ टक्के राज्य सरकारच्या अनुदानावर चालवले जाते. मात्र वैद्यकीय उपकरणांची कमतरता, तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध नसणे, अपु-या आरोग्य सुविधा आणि व्यवस्थापनाकडून होणारे दुर्लक्ष यासंदर्भातील प्राप्त तक्रारीच्या पार्श्वभूमीवर आरोग्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत करून. या समितीची आणि स्थानिक लोकप्रतिनिधींची एकत्रित बैठक घेउन याबाबतचा सविस्तर अहवाल केंद्र शासनाकडे सादर केला जाईल असे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले. या चर्चेदरम्यान लातूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात देखील आरोग्य सुविधा सुधारण्यासाठी संबंधित लोकप्रतिनिधींशी बैठक घेउन तत्काळ उपाययोजना केल्या जातील असेही श्री. मुश्रीफ यांनी सांगितले. विधानसभा सदस्य समीर कुणावार, सुमित वानखेडे, अभिमन्यू पवार, अमित देशमुख यांनी उपप्रश्न उपस्थित केले होते.

## कारखान्यांना फायर ऑडिट आणि सुरक्षेच्या उपाययोजना बंधनकारक

**मुंबई/प्रतिनिधी :**कामगारांच्या सुरक्षेच्या दृष्टीने राज्यातील सर्व कारखान्यांनी फायर ऑडिट करणे आणि इतर सुरक्षेच्या उपाययोजना करणे बंधनकारक आहे, असे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी विधानसभेत सांगितले. नाशिक जिल्ह्यातील मुंडेगाव येथील जिंदाल पालिफिल्म्स या कारखान्यात लागलेल्या आगीच्या पार्श्वभूमीवर विधानसभा सदस्य नाना पटोले, सरोज अहिरे, राजेश बकाने, अमित देशमुख राम कदम यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्यास उत्तर देताना मंत्री फुंडकर बोलत होते. सदर घटनेच्या पार्श्वभूमीवर भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होउ नये यासाठी एक अभ्यासगट स्थापन करण्यात आला असून, त्याचा अहवाल आल्यानंतर आवश्यक ती कठोर कारवाई केली जाईल. जिंदाल पॉलिफिल्म्स या कारखान्यात गेल्या अडीच वर्षांत दोनदा आग लागल्याच्या घटना घडल्या आहेत. मात्र कारखाना पूर्णपणे बंद केल्यास हजारो कामगारांवर उपासमारीची वेळ येईल, हे लक्षात घेउन अपघात झालेला भाग तातडीने बंद करून आवश्यक सर्व दुरुस्ती आणि सुरक्षिततेच्या उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

## अंगणवाडी सेविका, मदतनीस भरती प्रक्रिया; बालविकास प्रकल्प अधिकारी निलंबित

**मुंबई/प्रतिनिधी :** एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत जालना जिल्ह्यातील घनसागंवी प्रकल्प १ व २ मध्ये झालेल्या अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस भरती प्रक्रियेत दोषी आढळून आलेल्या बालविकास प्रकल्प अधिका-याचे निलंबन करण्यात येत असल्याचे महिला व बाल विकास राज्यमंत्री मेघना बोर्डीकर-साकोरे यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले. विधानसभा सदस्य हिकमत उढाण यांनी विधानसभेत याविषयीची लक्षवेधी सूचना मांडली. या लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर-साकोरे यांनी ही माहिती सांगितली. महिला व बाल विकास राज्यमंत्री बोर्डीकर-साकोरे यांनी सांगितले, फेब्रुवारी २०२५ मध्ये भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली. या भरती मधील याद्या एप्रिल-मे महिन्यात जाहीर करण्यात आल्या. जाहीर याद्यांवर काही नागरिकांनी तक्रारी दाखल केल्यानंतर या तक्रारींच्या अनुषंगाने सुनावणी घेण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जालना यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी महिला व बाल विकास यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली. या समितीने सखोल चौकशी करून आपला अहवाल सादर केला आहे.

## 'बालभारती'ची नवीन सुसज्ज इमारत लवकरच

### शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

**मुंबई/प्रतिनिधी :** बालभारतीची मुख्य इमारत अत्यंत कमकुवत झाल्यामुळे तातडीने पुनर्बांधणी करण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती शिक्षण राज्यमंत्री ंकज भोयर यांनी विधानपरिषदेत दिली. पुणे येथील बालभारती कार्यालयाची इमारत जुनी झाल्याने नवीन इमारत बांधण्यासंदर्भात सदस्य ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी लक्षवेधीद्वारे प्रश्न विचारला होता, त्यास राज्यमंत्री भोयर यांनी उत्तर दिले. यात सदस्य जगन्नाथ अभ्यंकर, विक्रम काळे, किशोर दराडे यांनी सहभाग घेतला.



राज्यमंत्री भोयर म्हणाले की, बालभारतीची स्थापना २७ जानेवारी १९६७ रोजी झाली. इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या शासनमान्य अभ्यासक्रमाची पुस्तके याच ठिकाणी छापली जातात आणि संपूर्ण महाराष्ट्रभर वितरित केली जातात. सध्या अस्तित्वात असलेली इमारत लोड बेअरिंग स्ट्रक्चरमध्ये बांधण्यात आलेली आहे. या इमारतीच्या स्ट्रक्चरल ऑडिट अहवालानुसार या इमारतीच्या जागी नवीन इमारत बांधणे आवश्यक आहे. त्यामुळे ही इमारत नव्याने बांधण्यासाठी लवकरच नियामक मंडळापुढे प्रस्ताव मांडून मान्यता घेतली जाईल आणि मंजुरी मिळाल्यानंतर काम सुरू केले जाईल.

राज्यमंत्री भोयर यांनी एससीईआरटी आणि एनसीईआरटी अभ्यासक्रमासंबंधी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना स्पष्ट केले की, राज्य शासनाच्या धोरणानुसार स्थानिक गरजांनुसार अभ्यासक्रम तयार केला जाईल. तसेच बालभारतीने तयार केलेल्या वर्कबुक्सचा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी जास्तीत जास्त वापर करण्याचा प्रयत्न केला जाईल.राज्यमंत्री .भोयर यांनी 'मुख्यमंत्री ज्ञानपत्र योजना' सादर करताना सांगितले की, राज्यभरातील वापरलेली पुस्तके आणि वह्या गोळा करून त्यांचा पुनर्वापर केला जाईल आणि त्यातून नवीन वह्या व पुस्तके विद्यार्थ्यांना कमी दरात उपलब्ध होतील. तसेच, ज्या ठिकाणी बालभारतीच्या मालकीच्या जागा आहेत, त्या ठिकाणी आवश्यक पायाभूत सुविधा उभ्या करण्याचा सरकारचा प्रयत्न राहील, असेही त्यांनी सांगितले.

## गोठा बांधणे अनुदानामध्ये नोंदणीकृत गोशाळांचा समावेश

**मुंबई/प्रतिनिधी :** रोजगार हमी योजनेंतर्गत जनावरांसाठी गोठा बांधण्याकरिता देण्यात येणा-या अनुदानामध्ये राज्यातील नोंदणीकृत गोशाळांचा समावेश करण्यासंदर्भात रोजगार हमी योजना आणि पशुसंवर्धन विभाग यांची संयुक्त बैठक आयोजित करून निर्णय घेतला जाईल, असे रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले. विधानसभा सदस्य श्वेता महाले यांनी या विषयीची लक्षवेधी सूचना मांडली. या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेत सदस्य अभिमन्यू पवार, सत्यजित देशमुख यांनी सहभाग घेतला. गाईला राज मातेचा दर्जा दिला असल्याने तिचे संगोपन करणे हे सर्वांचेच कर्तव्य आहे. रोजगार हमी विभागामार्फत प्रत्येक तालुक्यात गोशाळा मंजूर करण्यात आल्या असून त्यासाठी अनुदानही देण्यात येते, या गोशाळांना वाढीव अनुदान देण्यासंदर्भातही विचार केला जाईल. ग्रामीण भागातील आजारी गाई, भाकड आणि इतर जनावरांच्या संगोपनासाठी अनुदान देणेबाबतही आयोजित बैठकीत चर्चा करण्यात येईल. या बैठकीसाठी संबंधित लोकप्रतिनिधींना आमंत्रित केले जाईल, असे मंत्री श्री. गोगावले यांनी सांगितले.

## अधिवेशनातून

### शेतक-यांच्या मदतीत गैरव्यवहार; दोषींवर फौजदारी कारवाई

**मुंबई/प्रतिनिधी ::** जालना जिल्ह्यातील अंबड व घनसावंगी तालुक्यातील नैसर्गिक आपत्तीत बाधित शेतक-यांना देण्यात आलेल्या मदतीतील गैरव्यवहारात दोषी आढळणा-या सर्वच अधिकारी कर्मचा-यांवर फौजदारी कारवाई करण्यात येईल असे, वित्त व नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय आणि कामगार राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले. विधानसभा सदस्य संतोष दानवे यांनी या संदर्भातील लक्षवेधी विधानसभेत मांडली. या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेत सदस्य बबनराव लोणीकर, नारायण कुचे यांनी सहभाग घेतला. राज्यमंत्री जयस्वाल यांनी सांगितले, शेतक-यांना देण्यात येणा-या मदतीत गैरव्यवहार करणे हा गंभीर गुन्हा आहे. याची राज्य शासनाने दखल घेतली आहे. या प्रकरणात सहभागी असलेल्या दोषींवर कठोर कारवाई करून गैरव्यवहाराची रक्कम संबंधितांच्या वेतनातून वसूल करण्यात येईल. या प्रकरणातील दोषींना निलंबित ठेउन त्यांची विभागीय चौकशी कालमर्यादेत पूर्ण करण्याचे निर्देशही देण्यात येतील. या प्रकरणाची जिल्हास्तरीय समितीने चौकशी करून दोषी ठरविलेल्या २१ तलाठी व लिपीकांना निलंबित करण्यात आले आहे. ३६ तलाठी व लिपिक यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच ४५ ग्रामविकास अधिकारी व २४ कृषी सहायक यांना नोटीस देण्यात आली असून त्यांची चौकशी संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांच्यामार्फत सुरू आहे. या गैरव्यवहार प्रकरणाचा संबधित तालुक्यातील तत्कालीन तहसीलदारांची जबाबदारी निश्चित करण्यात येणार आहे. याबाबतचा वस्तुनिष्ठ व सविस्तर अहवाल जिल्हाधिका-यांकडून मागवण्यात आला आहे, असे राज्यमंत्री जयस्वाल यांनी सांगितले. राज्यमंत्री जयस्वाल म्हणाले, नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेला एकही पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही. शेतक-यांना देण्यात येणा-या मदतीमध्ये गैरव्यवहार होणारा नाही याची दक्षता घेतली जाईल. तसेच जालना जिल्ह्यासह अन्य जिल्ह्यातही यासंदर्भात संबंधित विभागीय आयुक्तांमार्फत चोकशी करण्यात येईल.

### शासकीय योजनांमध्ये गैरव्यवहार; कठोर कारवाईसाठी नवीन कार्य प्रणाली

**मुंबई/प्रतिनिधी :**शासकीय योजनांमध्ये गैरव्यवहार टाळण्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. त्या अनुषंगानेच अशा गैरव्यहरांमध्ये सहभाग आढळणा-या अधिकारी-कर्मचा-यांवर कठोर कारवाई करण्यासाठी नवीन विशिष्ट कार्य प्रणाली तयार करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाला सूचित केले जाईल. या कार्यप्रणालीत दोषींचे केवळ निलंबन नव्हे तर शिक्षेची तरतूद करण्यात येईल, असे वित्त व नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय आणि कामगार राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी सांगितले. विधानसभा सदस्य राजेश पवार यांनी विधानसभेत मांडलेल्या लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात कृषी राज्यमंत्री जयस्वाल यांनी ही माहिती दिली. शेतक-यांच्या शाश्वत विकासासाठी राज्यशासन अनेक योजना व उपक्रम राबवित आहे. नांदेड जिल्ह्यात प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना व नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प योजनेंतर्गत सूक्ष्म सिंचन योजना राबविण्यात आली. या योजनेत झालेल्या अनियमिततेची शासनाने गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे. ही अनियमितता व शासकीय रकमेच्या अपहार प्रकरणी जबाबदार २२ अधिकारी कर्मचा-यांपैकी आठ क वर्गातील कर्मचा-यांना निलंबित करण्यात आले असून गट ब वर्गातील दोन अधिका-यांचे निलंबन येत्या आठ दिवसात केले जाईल, असेही राज्यमंत्री जयस्वाल यांनी सांगितले,

### पीक कापणी, काढणी पश्चात नुकसान भरपाईचे वाटप प्रगतीपथावर

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रधानमंत्री पीक विमा योजनेत परभणी जिल्ह्यात सन २०२४-२०२५ या पीक हंगामाकरिता मंजूर असलेल्या ४४३.५० कोटी रकमेपैकी ४१८.२५ कोटी रुपयांची नुकसान भरपाई वाटप करण्यात आली आहे. उर्वरित रक्कम वाटपाची कार्यवाही सुरू असून पीक कापणी व काढणी पश्चात नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही प्रगतीपथावर असल्याची माहिती कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनांच्या उत्तरात दिली. विधानसभा सदस्य राजेश विटेकर यांनी यासंदर्भातील लक्षवेधी सूचना विधानसभेत मांडली. या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेत सदस्य रोहित पवार यांनी उपप्रश्न विचारून सहभाग घेतला. परभणी जिल्ह्यात स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित क्षेत्रासाठी मध्य हंगामातील प्रतिकूल परिस्थितीकरिता २९९.२४ कोटी नुकसान भरपाई निश्चित केली. यापैकी २९८.७८ कोटीचे वाटप करण्यात आल्याचे कृषीमंत्री श्री. कोकाटे यांनी सांगितले. परभणी जिल्ह्यात आयसीआयसीआय लोंबार्ड या विमा कंपनीच्या माध्यमातून पीक विमा योजना राबविली जात आहे. सन २०२४-२०२५ मध्ये परभणी जिल्ह्यात काही बाधित शेतक-यांना विमा रक्कम मिळाली नसल्याच्या लोकप्रतिनिधींकडून तक्रारी प्राप्त झाल्या. त्यानुसार लोकप्रतिनिधी, बाधित शेतकरी, विमा कंपनीचे प्रतिनिधी, कृषी विभागाचे अधिकारी यांची बैठक घेण्यात आली.

### पारधी समाजातील युवकांनी व्यवसाय अर्थसहाय्यासाठी 30 ऑगस्टपर्यंत अर्ज करावे

**मुंबई/प्रतिनिधी :**मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील पारधी समाजातील सुशिक्षित बेरोजगार युवकांनी व्यवसाय करण्यास अर्थ साहाय्य मिळण्यासाठी ३० ऑगस्ट २०२५ पर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प मुंबई यांनी केले आहे. जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रमाअंतर्गत पारधी समाजातील सुशिक्षित बेरोजगार युवकांना त्यांच्या निवडीनुसार व्यवसाय करण्यास अर्थ साहाय्य करण्यात येते. जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रमाअंतर्गत मुंबई शहर जिल्हा आणि मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी आर्थिक वर्ष २०२५-२०२६ साठी अनुदान उपलब्ध झाले आहे. त्यामुळे या योजनेचा लाभ मिळविण्यासाठी मुंबई शहर जिल्हा आणि मुंबई उपनगर जिल्ह्यातील पारधी समाजातील सुशिक्षित बेरोजगार युवकांनी आवश्यक कागदपत्रांसह ३० ऑगस्ट, २०२५ पर्यंत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, मुंबई कस्तुरबा क्रास रोड न. २, कस्तुरबा महानगरपालिकेची मराठी शाळा क्र.२ सभागृह हाल, तळमजला, बोरिवली पूर्व, मुंबई या पत्त्यावर अर्ज करावेत, असे प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प मुंबई यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

### पुण्यातील अनधिकृत बांधकामाना नोटीस देउन पाडण्याचे आदेश देणार

**मुंबई/प्रतिनिधी :** पुणे शहरातील विशेषतः गुरुवार पेठ परिसरात बांधकामे करून त्याआधारे अनधिकृत शेड उभारली गेली आहेत. त्यामुळे ज्या बांधकामांना अधिकृत परवानग्या नाहीत, अशा बांधकामांची तातडीने सुनावणी घेउन ती बांधकामे पाडण्याचे आदेश दिले जातील, असे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विधान परिषदेत सांगितले. सदस्य योगेश टिळेकर यांनी लक्षवेधीद्वारे पुणे शहरातील अनधिकृत बांधकामासंदर्भात प्रश्न उपस्थित केला. या लक्षवेधीदरम्यान सदस्य सदाभाउ खोत, अभिजित वंजारी यांनीही सहभाग घेतला. उद्योग मंत्री सामंत म्हणाले की, जी बांधकामे धार्मिक स्थळांच्या बाबतीत अधिकृत आहेत, त्यांच्यावर मात्र कारवाई होणार नाही. जी अनधिकृत बांधकामे आहेत, त्यांच्यावर कारवाई होईल. तसेच ज्या अधिका-यांनी अनधिकृत बांधकामाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले, त्या अधिका-यांचीही चौकशी केली जाईल, असेही उद्योग मंत्री सामंत यांनी यावेळी सांगितले.

### सर्वसामान्यांना परवडतील अश्या घरांबाबत सिडकोला निर्देश

**मुंबई/प्रतिनिधी :**सिडको ही नफा कमावणारी संस्था नाही. सर्वसामान्यांना परवडणारी घरे हीच सिडकोमार्फत बांधण्यात येणा-या घरांची संकल्पना आहे. त्यामुळे सिडकोच्या जाहिरातीनुसार वाढलेल्या किमतीबाबत आणि अन्य समस्यांबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात येईल. ही बैठक होईपर्यंत यापूर्वीच्या जाहिरातीनुसार पैसे भरलेल्या कोणालाही घर मिळण्यापासून वंचित केले जाणार नाही, असे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विधान परिषदेत सांगितले. सर्वसामान्यांना परवडतील अशी घरे दिली जाण्याबाबत सिडकोला निर्देश दिले जातील, असेही उद्योग मंत्री उदय सामंत यांनी सांगितले. सदस्य शशिकांत शिंदे यांनी याबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री प्रवीण दरेकर, विक्रांत पाटील यांनी सहभाग घेतला. उद्योग मंत्री सामंत म्हणाले, सिडको मार्फत यापूर्वी जाहीर केल्यानुसार ३२२ चौ.फूटाचीच घरे दिली जातील. त्यात कपात होणार नाही.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# ब्रिक्स आणि भारत

विकसनशील देश हे दुटप्पीपणाचे बळी ठरले असून, जागतिक अर्थव्यवस्थेत भरीव योगदान देणाऱ्या राष्ट्रांना निर्णय प्रक्रियेत स्थान नाकारले जात असल्याची टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ब्राझीलमधील रिओ दि जानेरो येथे भरलेल्या ब्रिक्स शिखर परिषदेत केली आहे. बड्या देशांना कोणीतरी हे सुनावणे आवश्यकच होते. संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेत भारताला कायमस्वरूपी सदस्यत्व मिळावे, अशी आग्रही भूमिकाही त्यांनी मांडली. विकास संसाधनांचे वितरण असो किंवा सुरक्षेसंबंधीचे मुद्दे, विकसनशील देशांच्या मागण्या दुर्लक्षितच राहतात. भारताने नेहमीच स्वहितापेक्षा मानवतेच्या हितासाठी काम करणे कर्तव्य मानले. २० व्या शतकात स्थापन झालेल्या जागतिक संस्थांमध्ये दोन तृतीयांश मानवी समाजास पुरेसे प्रतिनिधित्व नाही. जागतिक व्यापार आणि आर्थिक उलाढालीत भारतासारख्या प्रमुख देशांचा लक्षणीय वाटा आहे; पण जागतिक आरोग्य संघटना, व्यापार संघटना, नाणेनिधी, जागतिक बँक, संयुक्त राष्ट्र संघ या संस्थांच्या निर्णय प्रक्रियेत पुरेसा वाटा मिळत नाही, हे वास्तव आहे.केवळ भारतच नव्हे, तर अनेक विकसनशील देशांची गाऱ्हाणी ऐकून घेतली जात नाहीत. म्हणूनच जागतिक संस्थांचा कारभार आणि रचनेत आमूलाग्र सुधारणा होण्याची गरज आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात जिथे तंत्रज्ञान आठवड्याला बदलते, तिथे जागतिक संस्थांमध्ये ८० वर्षांतून एकदाही सुधारणा झालेली नाही. २१ व्या शतकातील सॉफ्टवेअर २०व्या शतकातील टाईपरायटरवर चालवता येत नाही, अशी कोपरखळीही मोदी यांनी यावेळी मारली. अर्थात, कोणतीही भीडभाड न ठेवता ब्रिक्स परिषदेत भारताने भूमिका मांडली असून, आता संबंधित संस्थांनी त्याची नोंद घेतली पाहिजे. ब्रिक्स या संघटनेची ताकद विविधतेमध्ये आणि बहुधृवीय जगासाठीच्या कटिबद्धतेत दडलेली आहे. या संदर्भात भारतात ब्रिक्स मार्फत कृषी संशोधनाचा उपक्रम हाती घेतला आहे. तसेच भारताने 'ब्रिक्स सायन्स अँड रिसर्च रिपॉझिटरी'च्या स्थापनेचा उत्तम प्रस्ताव ठेवला आहे. विकसित देशांची मदत मिळाली, तर या रिपॉझिटरीमुळे जागतिक संशोधनात उल्लेखनीय भर घालता येऊ शकेल.'ब्रिक्स न्यू डेव्हलपमेंट बँके'च्या माध्यमातूनही नवनवीन प्रकल्प हाती घेता येतील. हवामान बदल आटोक्यात ठेवण्यासंबंधीच्या योजनांसाठी अधिक अर्थपुरवठा करण्याची विशेष जबाबदारी विकसित देशांवर अधिक आहे, याकडे भारताने वेळोवेळी लक्ष वेधले आहे; पण अमेरिका व युरोपातील समृद्ध देश याबाबत जबाबदारी नीट पार पाडत नाहीत, हे सत्य आहे. या परिषदेत पहलगाममधील हल्ल्याचा कडक शब्दांत धिक्कार करण्यात आला आणि दहशतवादाविरोधात सामूहिक लढाई लढण्याचे आवाहन करण्यात आले. सीमापार दहशतवाद आणि त्यास मिळणारे अर्थसाह्य याचाही ठरावात उल्लेख केला असला, तरी पाकिस्तानचे नाव त्यात घेतलेले नाही. पहलगाममधील हल्ला हा भारताच्या आत्म्यावरील आघात होता आणि केवळ व्यक्तिगत वा राजकीय फायद्यासाठी दहशतवाद्यांना मदत करणे किंवा त्यांच्या संघटनांच्या कृत्यांबद्दल मौन बाळगणे, कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाऊ शकत नाही.अशावेळी दहशतवाद्यांविरोधात आर्थिक निर्बंध लागू केले पहिजेत, असे सार्थ आवाहन मोदी यांनी यावेळी केले; मात्र नाणेनिधी आणि जागतिक बँकेने भारताच्या भावनांकडे दुर्लक्ष केले असून, पहलगाम हल्ल्यास जबाबदार असणाऱ्या पाकिस्तानला या संस्था भरघोस मदत करत आहेत. अमेरिकेनेही पाकिस्तानला संरक्षण सामग्रीची व लढाऊ विमानांची मदत देण्याचे थांबवले नसून, पाकिस्तानचे भारतद्वेष्टे लष्करप्रमुख असीम मुनीर यांचे अमेरिकेत आगतस्वागत झाले. दुसरीकडे, ब्रिक्स ही अमेरिकाविरोधी आहे, तिला डॉलरला पर्यायी चलन निर्माण करायचे आहे, अशी अनाठायी भीती अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्यक्त केली आहे. ब्रिक्सच्या सदस्य राष्ट्रांवर अतिरिक्त कर लादण्याची धमकीही त्यांनी दिली आहे. वास्तविक, केवळ ब्रिक्स संघटनाच जगाची रचना बदलू इच्छत आहे वा अमेरिकेस शह देऊ पाहत आहे, हे काही खरे नाही.ट्रम्प यांना तर जगाची रचना एकधृवीय असावी, म्हणजेच अमेरिकेच्या तालावर जगाने नाचावे, असे वाटत आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय व्यवस्था बदलली. १९४४ मध्ये जगात आर्थिक स्थिरता निर्माण करण्यासाठी ब्रिटनवुडस् करारानुसार, जागतिक अर्थ संस्थांची स्थापना झाली. चलनांचे दर निश्चित करण्यासाठी एक प्रणालीही तयार केली. अमेरिकन डॉलर सुवर्णसाठ्यावर आधारित होता आणि इतर चलनांना डॉलरच्या तुलनेत निश्चित दरावर ठेवले जात होते. आज केवळ ब्रिक्स नव्हे, तर ट्रम्प हेही जागतिक बँक आणि नाणेनिधीच्या कार्यपद्धतीत परिवर्तन व्हावे, अशी मागणी करत आहेत; मात्र ट्रम्प यांना या संस्था आपल्या पद्धतीने चालाव्यात, असे वाटते. आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना जगली पाहिजे, यासाठी ब्रिक्स प्रयत्नशील आहेत. ट्रम्प यांना समान नियमांवर आधारित व्यापार संघटनेची कार्यपद्धतच मान्य नाही.दुसरीकडे, ब्रिक्सची सदस्य राष्ट्रेही वॉशिंग्टनमध्ये जाऊन अमेरिकेशी द्विपक्षीय करार करू पाहत आहेत आणि त्यांनी अमेरिकन हितसंबंध जपणारे करार करावेत, ही ट्रम्प यांची इच्छा आहे. चीनने अमेरिकेशी मर्यादित समझोता केला आहे, तर कम्युनिस्ट देशच असलेल्या व्हिएतनामनेही अमेरिकेसोबतच्या व्यापारी कराराची घोषणा केली आहे. अमेरिकेसोबतची भारताची कराराची बोलणी लवकरच फलदायी ठरतील, अशी अपेक्षा आहे. भारताचे ब्रिक्सचा सदस्य असलेल्या चीनसोबतचे संबंध नेहमीच तणावपूर्ण राहिले आहेत आणि इराणसारख्या देशाची कट्टरतावादी धोरणे भारताला पसंत नाहीत. पुढील वर्षी ब्रिक्सची शिखर परिषद भारतात होणार असून, 'ह्युमॅनिटी फर्स्ट' ही या परिषदेची मध्यवर्ती संकल्पना असणार आहे. येत्या वर्षभरात ती कोणत्या दिशेने वाटचाल करते पाहावे लागेल. ब्रिक्ससारख्या व्यासपीठांवरून भारताला जागतिक नेतृत्व करण्याची आणि दहशतवादविरोधाचा व मानवतावादी दृष्टिकोन जगापुढे मांडण्याची संधी मिळते. अशा व्यासपीठांचा भारताने पुरेपूर उपयोग करून घेतलाच पाहिजे.

# दलाई लामांचा उत्तराधिकारी कोण?



तिबेट... चीनच्या अरेरावीमध्ये पिचलेली जनता. इतकेच काय, तिबेटचे धर्मगुरू दलाई लामा यांनाही या वरंवट्याला तोंड देण्यासाठी देश सोडणं भाग पडतं. आता प्रश्न पुढे आला आहे, तो त्यांच्या उत्तराधिकाऱ्याच्या निवडीचा. आपल्या मृत्यूनंतरच त्याची निवड होईल व तो चीनच्या बाहेरील असेल, असे घोषित करून त्यांनी चिनी मनसुब्यावर पाणी फेरले आहे. भविष्यातील कोणताही दलाई लामा हा आमच्या मान्यतेनंतरच वैध ठरेल, या चिनी उद्दामपणाला ही चपराक आहे.

बौद्ध धर्मियांचे सर्वात मोठे गुरू दलाई लामांनी हे स्पष्ट केले आहे की, त्यांचा उत्तराधिकारी त्यांच्या मृत्यूनंतरच निवडला जाईल. इतकेच नव्हे, तर पुढचा दलाई लामा चीनच्या बाहेरचा असेल, हेही त्यांनी स्पष्ट केले आहे. दलाई लामांच्या या घोषणेची धर्मशाळा तसेच जगभरातील त्यांच्या लाखो अनुयायांनी आतुरतेने वाट पाहिली होती. या घोषणेला विशेष महत्त्व असण्याचे कारण २०११ मध्ये दलाई लामांनी यासंदर्भात एक महत्त्वाचे वक्तव्य केले होते. त्यानुसार ते नव्वद वर्षांचे झाल्यावर तिबेटी लामांशी आणि तिबेटी जनतेशी चर्चा करून 'दलाई लामा' ही संस्था टिकवायची की नाही, याबाबतचा निर्णय घेतील. अलीकडेच त्यांनी समाजमाध्यमांवर पोस्ट केलेल्या व्हिडीओ संदेशामध्ये सांगितले की, त्यांच्या उत्तराधिकाऱ्याची निवड तिबेटी बौद्ध परंपरेतील सर्व प्रमुख आणि शपथबद्ध, विश्वासार्ह धार्मिक गुरूंसोबत विचारविनिमय करून व्हावी. इतर कोणालाही यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. या विधानामुळे त्यांच्या उत्तराधिकाऱ्याच्या निवडीत चीनची काहीही भूमिका असणार नाही, हे स्पष्ट झाले आहे.

दलाई लामांचे हे विधान चीनसाठी सणसणीत चपराक देणारे आहे. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्या माओ निंग यांनी सांगितले की, दलाई लामांचा उत्तराधिकारी, पंचेन लामा आणि इतर बौद्ध गुरू यांची निवड गोल्डन अर्नच्या माध्यमातूनच व्हावी आणि त्यावर चीन सरकारचे शिक्कामोर्तब असावे. याचाच अर्थ चिनी सरकारने शिक्कामोर्तब केल्या नंतरच दलाई लामांच्या उत्तराधिकाऱ्याला मान्यता मिळेल, असे चीनचे म्हणणे आहे.

चीन आणि तिबेट यांच्यातील संबंध हे तणावपूर्ण स्वरूपाचेच राहिले आहेत. चीन तिबेटवर आपला दावा सांगत असला, तरी मूळ तिबेटीयन लोकांमध्ये चीनविरोधी कमालीचा असंतोष आहे. चीन आपली तिबेटवरील पकड जितकी घट्ट करण्याचा प्रयत्न करत आहे, तितकाच तिबेटकडून त्याला कडाडून प्रतिकार केला जात आहे. विशेषतः तिबेटमधील सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरा नष्ट करण्याचा प्रयत्न चीनकडून नियोजनबद्धरीत्या सुरू आहे. मुळातच चीनने आपले कोअर इंटरेस्ट किंवा गाभ्याचे हितसंबंध अधोरेखित करून ठेवले आहेत. यामध्ये दक्षिण चीन समुद्र, तिबेट यांचा समावेश आहे. या हितसंबंधांच्या रक्षणासाठी चीन कोणत्याही स्तराला जाऊ शकतो. प्रसंगी अण्वस्त्रांचाही वापर करू शकतो. याच कोअर इंटरेस्टमध्ये दलाई लामांचा उत्तराधिकारी निवडीचा प्रश्नही समाविष्ट आहे. दोन वर्षांपूर्वी मंगोलियामधील बौद्ध धर्माचे ६०० अनुयायी धर्मशाळामध्ये आले होते. त्यांच्या उपस्थितीत एक फार मोठा धार्मिक सोहळा तेथे पार पडला होता. या सोहळ्यामध्ये साधारणतः दहा वर्षांच्या मुलाला आशीर्वाद देतानाची काही दृश्ये आणि छायाचित्रे व्हायरल झाली होती. दलाई लामा एका छोट्या मुलाला दीक्षा देताहेत, असे दर्शवणारी ही दृश्ये होती.

तिबेट पुरस्कृत बौद्ध धर्माला वङ्कायान किंवा महायान असे म्हटले जाते. यामध्ये सर्वोच्च धर्मगुरू हे दलाई लामा म्हणून ओळखले जातात. त्यांच्या नंतर दुसरे सर्वांत प्रभावशाली बौद्ध धर्मगुरू असणाऱ्या व्यक्तीला पंचेन लामा असे म्हटले जाते. त्यानंतरचे तिसरे स्थान या लहान मुलाला दिले गेले होते. आता हाच लहान मुलगा दलाई लामांचा उत्तराधिकारी किंवा वारस असणार का, याबाबत स्पष्टता झालेली नाही. ही स्पष्टता न आणण्यामागे त्यांना चीनकडून असणारी असुरक्षितता हे प्रमुख कारण आहे. कारण, चीनचा इतिहासच तसा राहिला आहे. १४ मे १९९५ रोजी तिबेटी धर्मगुरू दलाई लामा यांनी गेधुन चोएक्यी नीमा यांना ११ वे धर्मगुरू म्हणून घोषित केले होते; परंतु १७ मे १९९५ मध्ये सहावर्षीय गेधुन चोएक्यी नीमा कुटुंबीयांसह रहस्यमयरीत्या गायब झाले. २८ मे १९९६ पर्यंत या अपहरणा मागे नेमका कुणाचा हात आहे, याबाबत कोणतीही माहिती मिळाली नव्हती. संयुक्त राष्ट्राच्या बाल हक्क कायद्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीने हा मुद्दा उचलल्यानंतर चीनने पंचेन लामा यांना कैद केल्याचे समोर आले होते. दरम्यान, २९ नोव्हेंबर १९९५ रोजी चीनने ग्लालसन नोरबू यांना पंचेन लामा घोषित केले होते.

सध्याच्या दलाई लामांनी मागील काळात 'पुढचे दलाई लामा किंवा १४ वे दलाई लामा हे कदाचित एका स्वतंत्र, लोकशाही असणाऱ्या देशामधून येतील' असे विधान केले होते. कदाचित ती महिलाही असू शकते, असेही त्यांनी म्हटले होते. त्यामुळे दलाई लामांचा उत्तराधिकारी कोण असणार, याबाबतची उत्सुकता सध्या शिगेला पोहोचली आहे. तिबेटमधील बौद्ध धर्माची आवृत्ती जी महायान किंवा वङ्कायान म्हणून ओळखली जाते, त्यामध्ये एक पुनर्जन्माची संकल्पना आहे. त्यानुसार श्रेष्ठ धर्मगुरू असणारे दलाई लामा हे आपले शरीर बदलतात. त्यांचा आत्मा हा संजीवन असल्यामुळे तो केवळ शरीर त्यागून दुसऱ्या देहामध्ये प्रवेश करतो. यासाठी दलाई लामांच्या निधनाच्या दिवशीच अन्यत्र जन्मलेल्या बाळांचा शोध घेतात. त्यांच्यात आणि दलाई लामांच्यात काही साम्य आहे का, हे पाहिले जाते. तसेच या मुलांना दलाई लामांच्या काही वस्तू दाखवल्या जातात. यापैकी कोणता मुलगा त्या ओळखतो, त्याच्या काही आठवणी आहेत का, याचा विचार केला जातो. त्यानुसार एका मुलाची निवड केली जाते. सध्याच्या दलाई लामांचा जन्म ६ जुलै १९३५ रोजी तिबेटमधील तक्तसर भागात एका शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचं जन्मनाव होतं ल्हामा थोंडुप. ते जेव्हा दोन वर्षांचेच होते, तेव्हा त्यांना तेराव्या दलाई लामांनी सोडलेल्या निशाणांच्या आधारे शोधून त्यांचा अवतार म्हणून निवडण्यात आले. चौदावे दलाई लामा निवडल्यानंतर त्यांनी आपलं नवीन नाव निवडलं तेनजिन ग्यात्सो.

१९५० मध्ये जेव्हा ते १५ वर्षांचे होते, तेव्हा तिबेटवर चीनने कब्जा केला आणि दलाई लामांनी तिबेटचं राजकीय नेतृत्व आपल्या हाती घेतलं. १९५४ मध्ये माओत्से तुंग आणि इतर चिनी नेत्यांबरोबर शांतता चर्चेसाठी ते बीजिंगला गेले; पण काही निष्पन्न झालं नाही. १९५९ मध्ये तिबेटमधील उठाव अयशस्वी ठरल्यावर ते आश्रयासाठी भारतात आले आणि धर्मशाळेमध्ये निर्वासित सरकार स्थापन केले. शांतता आणि अहिंसेचे विचार जगभर पसरवण्याच्या कार्याची दखल घेत १९८९ मध्ये त्यांना नोबेल शांतता पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. २०११ मध्ये त्यांनी तिबेटीयन निर्वासित सरकारमधील आपली राजकीय भूमिका सोडली आणि केवळ अध्यात्मिक नेतृत्व स्वतःकडे ठेवलं. २०२४ मध्ये ते उपचारासाठी अमेरिकेला गेले आणि त्यानंतर उत्तराधिकाराच्या मुद्द्यावर नव्याने चर्चा सुरू झाली. आता याबाबतची स्पष्टता त्यांनी स्वतःच दिली असून त्यातून चीनला मोठा धक्का बसला आहे. कारण, चीनला कोणत्याही स्थितीत त्यांच्या मर्जीतले दलाई लामा तिबेटमधील बौद्ध धर्मियांवर लादायचे होते; परंतु तिबेटीयन लोकांचा याला प्रचंड विरोध आहे.

दलाई लामांचा उत्तराधिकारी निवडण्याचा वाद हा चीन आणि तिबेट यांच्यातील तसा जुना वाद आहे. मागील काळात अमेरिकेसारखी काही मोठी राष्ट्रे यामध्ये स्वारस्य घेताना दिसून आली. अमेरिकेच्या काँग्रेसमध्ये दोन-अडीच वर्षांपूर्वी संमत झालेल्या एका विधेयकानुसार, तिबेटमधील दलाई लामांचे उत्तराधिकारी निवडण्याचा संपूर्ण अधिकार हा तिबेटी जनतेचा आहे. यामध्ये कोणत्याही बाह्यराष्ट्राची भूमिका किंवा हस्तक्षेप असता कामा नये. इतकेच नव्हे, तर चीनने हस्तक्षेप केला, तर चीनवर आर्थिक निर्बंध लादले जावेत, अशी तरतूद या कायद्यात आहे. अमेरिकेसारख्या राष्ट्राने अशा स्वरूपाचा कायदा केल्यामुळे आंतरराष्ट्रीय जनमत या प्रश्नाविषयी संवेदनशील बनू लागले आहे.

तिबेटमधील ६० लाख जनता ही १४ व्या दलाई लामांची अनुयायी आहे. त्यांच्या धार्मिक भावना या दलाई लामांमध्ये गुंतलेल्या आहेत. त्यामुळे चीनकडून निवडल्या जाणाऱ्या दलाई लामांना तिबेटीयन समुदायाकडून अजिबात महत्त्व दिले जाणार नाही. असे असूनही चीनने हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला, तर तिबेटीयन जनतेच्या धार्मिक भावना मोठ्या प्रमाणावर दुखावल्या जातील. त्यातून शिनशियांग प्रांतामध्ये उइघूर मुस्लिमांनी एक मोठी चळवळ उभी केली आहे, तशीच चळवळ तिबेटमध्येही सुरू होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

भारताने दलाई लामांना आश्रय दिल्यामुळे त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांबाबत भारतात चर्चा होणे स्वाभाविक आहे; पण चीनला तिही मान्य होत नाही. मागील काळातही या मुद्द्यावरून चीन आणि भारत यांच्यात तणाव निर्माण झालेला पाहायला मिळाला आहे. तिबेटपासून २५ किलोमीटर अंतरावर असणाऱ्या तवांगमधून सहाव्या दलाई लामांची निवड करण्यात आली होती. या तवांगला ज्या-ज्यावेळी दलाई लामांची भेट होते त्या-त्यावेळी भारत-चीन यांच्यात तणाव निर्माण होतो. येणाऱ्या काळात तिबेटीयन जनतेच्या धार्मिक भावनांचा आदर चीनकडून ठेवला गेला पाहिजे, ही बाब भारताने चीनला निक्षून सांगणे गरजेचे आहे.

**डॉ. शैलेंद्र देवळाणकर**

# लोकसंख्या शिक्षण काळाची गरज

आज ११ जुलै आजचा दिवस जगभर जागतिक लोकसंख्या दीन म्हणून साजरा केला जातो. ११ जुलै १९८७ रोजी जगात पाच अब्जावे बालक जन्माला आले तेंव्हापासून हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून पाळला जातो. १९८७ ते २०२१ म्हणजे अवघ्या चोवीस वर्षात जगाची लोकसंख्या दोन अब्जांनी वाढून ती सात कोटींपर्यंत पोहचली याचाच अर्थ जगाची लोकसंख्या तुफान वेगाने वाढत आहे. भारतात तर लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक आहे. दोन वर्षापूर्वीच भारताने चीनला मागे सारून जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशात अव्वल स्थान प्राप्त केले आहे. दोन वर्षापूर्वीच तज्ज्ञांनी २०२३ साली भारत चीनला मागे सारून सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनेल असा अंदाज वर्तवला होता. दोन वर्षापूर्वी म्हणजे २०२३ च्या एप्रिल महिन्यात युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंट या जागतिक लोकसंख्येचा अभ्यास करणाऱ्या संयुक्त राष्ट्र संघाच्या संस्थेने त्याची पुष्टी केली आहे. युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंटने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार भारताची लोकसंख्या चिनपेक्षा जास्त असून भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेली आहे. भारताची लोकसंख्या १,४२८.६ दशलक्ष आहे तर चीनची लोकसंख्या १,४२५.७ दशलक्ष इतकी आहे म्हणजेच दोन्ही देशांच्या लोकसंख्येमध्ये २.९ दशलक्ष इतका फरक आहे. या अहवालात चीनच्या लोकसंख्या वाढीचा वेग घटत आहे तर भारताचा लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक आहे असेही नमूद करण्यात आले आहे. आज भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेली आहे. देश स्वातंत्र्य झाला तेंव्हा आपली लोकसंख्या तीस कोटी होती याचाच अर्थ मागील पंच्याहत्तर वर्षात आपल्या देशातील लोकसंख्या ११० कोटींनी वाढली. आज आपण लोकसंख्येत जगात पहिल्या क्रमांकावर पोहचलो आहोत अर्थात ही काही भूषणावह बाब नाही. देशाच्या सर्व समस्यांचे मूळ हे वाढत्या लोकसंख्येतच आहे. झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे देशात अन्न, वस्त्र, निवारा, रोगराई आणि दारिद्रय असे अनेक प्रश्न उदभवू लागले आहेत.

विशेष म्हणजे देशाच्या प्रगतीत वाढती लोकसंख्या ही मोठा अडसर ठरत आहे. लोकसंख्या वाढीचा सर्व बाबींवर परिणाम होत असून विकासालाही खीळ बसत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशातील सर्व नागरिकांच्या मूलभूत गरजा भागवणेही सरकारला शक्य होत नाही. ही लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी शासनस्तरावरून पुरेसे प्रयत्नही केले जात आहेत. पण समाजातून अजूनही त्या प्रयत्नांना म्हणावी तशी साथ मिळत नाही. कुटुंब नियोजनाची मोहीम सरकारी पातळीवर प्रभावीपणे राबवली जात आहे ही दिलासा देणारी बाब असली तरी मुलगा व्हावा या हट्टापायी तीन ते चार अपत्यांना जन्म देणारे महाभागही समाजात आहेत. या आणि अशा लोकांमुळेच ही मोहीम वेग धरत नाही. लोकसंख्या नियंत्रणात आणायची असेल तर नव्या पिडीमध्ये लोकसंख्येविषयी योग्य दृष्टिकोन आणि जाणीव निर्माण करण्याची आवश्यकता आहे त्यासाठी नव्या पीडिला लोकसंख्या शिक्षण दिले पाहिजे. अवघ्या २४ वर्षात जगाची लोकसंख्या पाच अब्जानी वाढली तर देशाची लोकसंख्या पंच्याहत्तर वर्षात ११० कोटींनी वाढली या वेगाने जर लोकसंख्या वाढत राहिली तर लोकसंख्येचा हा भार वसुंधरा पेलू शकणार नाही त्याचा परिणाम एकूणच मानवी जीवनावर काय होईल हे नव्या पीडिला समजावून सांगावे लागेल. देशातील लोकसंख्या जर नियंत्रणात आली नाही तर सर्वानाच अडचणींचा सामना करावा लागेल. आपण जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहत आहोत. हे स्वप्न साकार करायचे असेल तर वाढत्या लोकसंख्येला आळा घालावाच लागेल हे नवीन पीडिला पटवून द्यावे लागेल. वाढत्या लोकसंख्येमुळे होणारे दुष्परिणाम, निर्माण होणाऱ्या समस्या याची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी यासाठी शाळा, महाविद्यालयांमध्ये चर्चासत्रांचे आयोजन करून विद्यार्थ्यांचे प्रबोधन करायला हवे. लोकसंख्या शिक्षण अप्रत्यक्ष सामाजिक शिक्षण आहे त्यामुळे केवळ तरुणांनाच नव्हे तर समाजालाही या शिक्षणाची गरज आहे. लोकसंख्या शिक्षण ही काळाची गरज आहे. लोकसंख्या वाढ रोखायची असेल, देशाला विकासाच्या मार्गावर न्यायचे असेल आणि देशाला महासत्ता बनवायचे असेल तर लोकसंख्या शिक्षणाला पर्याय नाही.

**श्याम बसप्पा ठाणेदार**

## राज्यातील बालमृत्यूंचे भीषण वास्तव

एप्रिल २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या ११ महिन्यांच्या कालावधीत महाराष्ट्रात १२ हजार ४३८ बालकांचा मृत्यू झाल्याची तसेच कोल्हापूर जिल्ह्यात ११ नवजात बालकांसह एक हजार ७३६ बालकांचा मृत्यू झाल्याची माहिती नुकतीच विधीमंडळ कामकाजात प्रश्नोत्तराच्या तासात देण्यात आली. म्हणजेच राज्यात या कालावधीत दररोज सरासरी ३७ हून अधिक बालकांचा मृत्यू झाला. वास्तविक बालमृत्यू रोखण्यासाठी राज्य शासनाकडून कोट्यवधी रुपयांची तरतूद करून नवजात शिशु काळजी आणि स्थिरीकरण कक्ष, राष्ट्रीय बाल आरोग्य योजना, नवसंजीवनी योजना, जननी शिशु सुरक्षा योजना, सुरक्षित मातृत्व अभियान यासारख्या अनेक उपाययोजना राबविण्यात यतात. मात्र बालकांच्या आरोग्यविषयक अशा विविध उपाययोजना राबवूनही राज्यातील बालमृत्यूंच्या समस्येचे समाधानकारक निराकरण अद्याप झालेले नाही हे या आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. उलट बालकांच्या कुपोषणाचे आणि बालमृत्यूंचे प्रमाण आटोक्यात न येता वर्षागणिक वाढत चालले आहे ही चिंतेची बाब आहे. राज्यातील बालमृत्यूंच्या या भीषण वास्तवाच्या पार्श्वभूमीवर, राज्य शासनाने बालमृत्यूच्या समस्येकडे अधिक गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.

**-प्रदीप मोरे**

## कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या दुर्दशा

**आदरणीय श्री. शिवराज सिंह चौहान,**
**कृषी मंत्री, भारत सरकार,नवी दिल्ली.**
**विषय :- कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या दुर्दशेची कहाणी.**
**विनम्र अभिवादन**

कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पादन वाढवणे, खर्च कमी करणे, नफा वाढवणे या उद्देशाने, तुम्ही ११ जुलै २०२५ रोजी तामिळनाडूतील कोइम्बतूर येथे एक बैठक बोलावली आहे.आम्ही तुम्हाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि कृषीमंत्री यांच्या साक्षीने पत्र दिले होते.या पत्राचे उत्तर मिळालेले नाही. त्यानंतर बियाणे कंपन्यांबददल बातम्या इकॉनॉमिक टाईम्समध्ये होत्या. त्यावरही एक पत्र दिले होते. त्याचेही उत्तर नाही.

पण तुम्ही व्हिडिओमध्ये म्हणालात की,'बीटी कापसावरील विषाणूमुळे उत्पादन कमी होते', तुम्ही पुढे म्हणालात की,आम्हाला शेतकऱ्यांना अशी माहिती द्यायची आहे की, ते कापसाच्या विषाणूशी लढू शकतील. आम्ही शेतकऱ्यांना या संदर्भात त्यांचे विचार आणि सूचना पाठवण्याचे आवाहन केले आहे आणि १८००१८०१५५१ हा क्रमांक देखील दिला आहे. मी या नंबरवर फोन केला आणि त्यांना आमची मागणी तुम्हाला पाठवण्याची विनंती केली. मला उत्तर मिळाले की, आम्ही ती पाठवू शकत नाही. हे काय नाटक आहे.

वर्तमानपत्रात बातम्या येत आहेत की, बियाणांच्या कंपन्या दबावाखाली येवून एचटीबीटी ला परवानगी देण्यासाठी हा एक भयानक करार केला जात आहे. आम्ही विचारत आहोत की फक्त हायब्रिड का? ते सरळ जातीत का नाही? दुसरे म्हणजे, तुम्ही ज्या विषाणूबद्दल बोलत आहात. आम्हाला माहित आहे की,हे एचटी जनुक किटक रोखण्यासाठी देखील नाही, ते फक्त तणनाशक म्हणून वापरण्याच्या सोयीसाठी आहे. कृपया ही दुःखाची कहाणी तुमच्यासमोर आणि अधिकाऱ्यांसमोर मांडण्यासाठी आम्हाला वेळ द्या..

**धन्यवाद!**

आपले विनम्र,
**विजय जावंधिया**
शेतकरी संघटना पाईक

## वेकोली प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी

# कोलेरा(पिं) गावात शिरले नाल्याचे पाणी, अनेक घरे पाण्याखाली



### गावाचे पुनर्वसन तातडीने करण्याची मागणी

कोलेरा (पिंपरी) हे गाव समस्यांचा विळख्यात सापडले आहेत मात्र शासन, प्रशासन व मुख्य म्हणजे वेकोली प्रशासनाचे गावाकडे दुर्लक्ष होत आहे त्या मुळे संबंधितांनी आमच्या गावाचे तात्काळ पुनर्वसन करावे अशी मागणी येथील ग्रामपंचायत सदस्या सौ काजल जितेंद्र बोंडे यांनी केली आहे. यावेळी ग्रा.पं.सदस्या, काजल जितेंद्र बोंडे, गोवर्धन पीदुरकर, प्रवीण मांढवकर, विशाल आस्टुटकर, देविदास वाघमारे, नितीन कुरेकर, बबनराव आस्टुटकर, नंदू झाडे, अंबादास अतकर, प्रकाश झाडे, सुरज लोढे, नितीन बोंडे, बापुजी ढोके, यांच्यासह गावकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

जनमाध्यम प्रतिनिधी

वणी - तालुक्यातील कोलेरा (पिंपरी) येथे सतत सुरू असलेल्या पावसामुळे गावात पाणी शिरले असून सात ते आठ घरे बाधित झाली आहे. तर पाण्याने संपुर्ण गावाला वेढा घातला आहे. वेकोली प्रशासनाच्या चुकीच्या धोरणामुळे गावकऱ्यांना चांगलाच फटका बसला असून वीज अन्न आणि पिण्याचे पाणी सुद्धा गावकऱ्यांना उपलब्ध नसल्याने गावकऱ्यांनी संताप व्यक्त केला असून वेकोली प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

गावाजवळून जाणारा नैसर्गिक नाला वे.को.ली.ने बंद केला आहे. गावशेजारीच वे को ली ने मातीची मोठी डंपिंग उभी केली आहे. त्यामुळे शेतातील गावातील आणि वे को लीचे पाणी वे को ली ने नाल्याची दिशा बदलविल्याने संपूर्ण पाणी गावाजवळ जमा झाले आहे. काहींच्या घरात तर कमरेपर्यंत पाणी साचले आहे अन्न वस्त्र निवारा पाण्याखाली असल्याने आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे गावात विजेचे तार तुटलेले आहे पिण्याच्या पाण्याची टाकी बुडाली आणि पाणी गावात साचल्याने रोगराई होण्याची भीती निर्माण झाली आहे याला सर्वस्वी जबाबदार हे वे को ली प्रशासन असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे.

## अपंग विद्यार्थ्याला शिक्षणापासून मुख्याध्यापकाने ठेवले वंचित

जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - बालकाचे शिक्षणाचा अधिकार तसेच अपंग कायद्याअंतर्गत आदिवासी आश्रम शाळा इंग्रजी माध्यम गोविंद नगर, पुसद येथील मुख्याध्यापक यांनी अपंग बालकाला शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे कटकारस्थान रचून शिक्षणा पासून वंचित ठेवले याकरता प्रवेश अर्ज घेण्यापासून बालकाच्या पालकांनी प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय पुसद यांच्याकडे तक्रार केली आहे.

**पालकाने मुख्याध्यापकाची केली तक्रार; शाळेत प्रवेश न दिल्यास उपोषण करू**

तालुक्यातील माळ पठारावरील कुंभारी येथील रहिवासी असलेले दिलीप वसंता राठोड जात पारधी अनुसूचित जमाती यांचा अपंग मुलगा शुभम दिलीप राठोड इयत्ता पाचवी मध्ये प्रवेश घेण्याकरिता आदिवासी प्रकल्प अधिकारी यांचे पत्र घेऊन शाळेत गेले असता आदिवासी आश्रम शाळा इंग्रजी माध्यमिक गोविंद नगर येथील मुख्याध्यापक यांनी शुभम याला प्रवेश न देता उलट त्यांचे वडिलांना उद्धटपणे व पायाला अपंगत्व असलेल्या ला काहीच येत नाही फक्त याला खाण्यासाठीच प्रवेश देऊ का असे म्हणून त्यांचा अपमान केला व शुभम यास प्रवेश देण्यास नकार दिला. त्यामुळे आपल्या पाल्याचा व आपला अपमान झाल्याने दिलीप राठोड यांनी संबंधित मुख्याध्यापक खडकीकर यांच्यावर कायदेशीर कारवाई करून शुभम यास त्वरित शाळेमध्ये प्रवेश देण्याबाबत आदिवासी प्रकल्प अधिकारी यांच्याकडे दिनांक 9 जुलै 2025 रोजी तक्रार दाखल केली आहे त्यामध्ये सदर मुख्याध्यापक यांच्यावर कडक कारवाई करून शुभम यास त्वरित शाळेत मध्ये प्रवेश द्यावा, व प्रवेश न मिळाल्यास आम्हाला नाईलाजाने आपल्या कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने अवलंब करून उपोषणास बसावे लागेल असाही इशारा पालकांनी दिलेल्या निवेदनातून दिला केली आहे.

## पुसद शहर डी. बी. पथकाची प्रशंसनीय कामगीरी

### पशुखाद्या व ट्रकसह एकुण 25,85,000 रुपयेचा मुद्देमाल घेउन पसार होणारे गुन्हेगार मुद्देमालासह जेरबंद



जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - पोलीस स्टेशन धनज जि.वाशिम येथे फीर्यादी नामे पवन रोहीदास मोरे वय 21 वर्ष रा. अहीरवाडी ता.पुर्णा जि.परभणी हे दि. 08/07/22025 रोजी रात्री अमरावती येथुन त्यांचे ट्रक आयचर वाहन क्र.MH-14-LX-2280 यामध्ये पशुखाद्या भरुन कारंजा रोडने येत असताना म्हसला फाट्याजवळ गतीरोधक असल्याने वाहनाची स्पीड कमी केली असता पांढऱ्या रंगाची फोरव्हीलर गाडी MH-26-नंबरचे वाहन आले आयचर वाहनाचे समोर आडवे लावुन त्यामधुन पाच अनोळखी उतरुण त्यांनी चालकास चाकुचा धाक दाखवुन चालकाला खाली उतरुण त्यांचे ताब्यातील आयचर वाहन अशोक लीलँड क्र.MH-14-LX-2280 पशुखाद्यासह एकुण 25,85,000/- (पंचविस लाख पंच्याऐशीहजार रुपयेचा) मुद्देमाल घेउन पसार झाले असे रीपोर्ट वरुण पो.स्टे. धनज बु जि. वाशिम येथे कलम 310 भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल होवु आरोपी पसार झाले असताना सदर आरोपी आयचर वाहनासह वाशिम मार्ग माहूर कडे जात असल्याची खबर मिळाल्याने पुसद शहर डी. बी. पथक सापळा लावुन माहूर रोड येथे थांबले असताना मोठ्या शिताफीने गुन्हातील आयचर वाहन पशुखाद्यासह व चार आरोपी पकडुन पो.स्टे. धनज जि. वाशिम यांचे ताब्यात पुढील कारवाई करीता देण्यात आले आहे.

पुसद शहर डी. बी. पथकांनी केलेल्या उत्कृष्ट कामगीरीचे वाशिम जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी कौतुक केले आहे. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक, श्री, कुमार चिंता, उपविभागीय पोलीस अधिकारी पुसद श्री, हर्षवर्धन बी.जे. साहेब यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे यांचे सुचनाप्रमाणे डी. बी. प्रमुख सपोनि प्रेमकुमार केदार, पो.हवा. मनोज कदम, पो.ना. अतुल दातीर पो, कॉ, शुद्धोधन भगत, पो.कॉ. आकाश बाभुळकर यांनी केली आहे.

## शिवणी सर्कलच्या समस्या सोडविण्यासाठी बाळूभाऊ जाधव मुंबई येथे आमदाराच्या भेटीला !

जनमाध्यम प्रतिनिधी



मुंबई - आर्णी-केळापूर विधानसभेचे लोकप्रिय आमदार प्रा. राजूभाऊ तोडसाम पावसाळी अधिवेशन काळात मुंबईला असल्याने यांच्या मुंबई येथील निवासस्थानी भाजपचे सक्रिय कार्यकर्ते व आगामी जिल्हा परिषद निवडणुकीचे इच्छुक उमेदवार बाळूभाऊ जाधव यांनी मुंबई तेथे थेट भेट घेऊन शिवणी सर्कलमधील स्थानिक जनतेच्या विविध समस्या मांडल्या. या बैठकीत रस्ते, नाल्या, पांदनरस्ते, पिण्याच्या पाण्याची टंचाई अशा अनेक मूलभूत प्रश्नांवर सखोल चर्चा झाली.

शिवणी सर्कलमधील ग्रामीण भागात रस्त्यांची झालेली दुरवस्था, पावसात रस्ते वाहून जाणे, तसेच नाल्यांची सफाई न झाल्यामुळे निर्माण होणारे आरोग्याचे प्रश्न या मुद्द्यांवर बाळूभाऊ जाधव यांनी आमदार साहेबांचे लक्ष वेधले. शिवाय अनेक गावे अजूनही पांदन रस्त्यांपासून वंचित असून शेतकऱ्यांना शेतीसाठी जाण्यास मोठा अडथळा निर्माण होत आहे. बाळूभाऊंनी या सर्व तक्रारी नागरिकांपासून ऐकून घेतल्या होत्या आणि त्या मुद्द्यांची मांडणी आमदार साहेबांसमोर केली. आमदार प्रा. राजूभाऊ तोडसाम यांनी अत्यंत सकारात्मक प्रतिसाद देत या सर्व समस्यांचा लवकरात लवकर पाठपुरावा करून योग्य निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. त्यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील मूलभूत गरजा पूर्ण करणे हीच खरी लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे आणि बाळूभाऊ जाधव हे सातत्याने जनतेसाठी झटणारे कार्यकर्ते असल्याने त्यांच्या मागण्यांना निश्चितच योग्य तो न्याय दिला जाईल. या बैठकीदरम्यान बाळूभाऊ जाधव यांनी सांगितले की, "शिवणी सर्कलमधील जनतेने माझ्यावर जो विश्वास ठेवला आहे, त्याला पात्र ठरण्यासाठी मी सतत प्रयत्नशील आहे. आज आमदार साहेबांशी झालेल्या बैठकीतून अनेक समस्यांचे निराकरण लवकरच होईल, असा विश्वास वाटतो." या भेटीच्या वेळी बाळूभाऊ जाधव यांच्यासोबत काही स्थानिक कार्यकर्तेही उपस्थित होते. बैठक अत्यंत सकारात्मक आणि जनहितासाठी उपयुक्त ठरली. लवकरच या बैठकीचे फलित दिसून येईल, अशी अपेक्षा सर्व ग्रामस्थांनी व्यक्त केली.

## जिल्हेवार विद्यालयात विद्यार्थिनींना मानव विकास योजनेअंतर्गत सायकल वाटप

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - श्रीरामपूर येथील मातोश्री सुभद्राबाई जिल्हेवार माध्यमिक विद्यालय श्रीरामपूरच्या प्रांगणात वर्ग आठवी नववी व दहावीच्या विद्यार्थिनींना मानव विकास योजने अंतर्गत मोफत सायकल वाटप करण्यात आले.

सुनियोजित झालेल्या कार्यक्रमात अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सुभाषभाऊ कोसलगे प्रमुख अतिथी संस्थेचे उपाध्यक्ष विनोदभाऊ जिल्हेवार विशेष अतिथी विस्तार अधिकारी उमेश वाघमारे, अमित बोजेवार, बळीराम राठोड, ग्रामपंचायत सदस्य दिनेश राठोड, राहुल सहारे, मुख्याध्यापक गणेश धर्माळे उपस्थीत होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. चंचल वकील राठोड हिने सुरेल स्वागतगीत सादर केले. प्रमुख अतिथी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विस्तार अधिकारी उमेश वाघमारे म्हणाले की महाराष्ट्र शासनाने विद्यार्थी हिताकरिता अनेक योजना राबविल्या त्यापैकी मानव विकास योजने अंतर्गत विद्यार्थिनींना मोफत सायकल योजना आणली त्यामुळे मुलींचे गळतीचे प्रमाण वाढेल त्या दररोज विद्यालयात येतील तसेच अध्यक्षीय भाषणात सुभाष कोसलगे यांनी बऱ्याच पालकांची आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे ते सायकल विकत घेऊ शकत नाही हे शासनाने हेरले व सायकल दिली त्यामुळे विद्यार्थ्यांना अत्यानंद झाला असुन विद्यालयात येण्याचे प्रमाण निश्चित वाढेल सांगून शासनाच्या योजनेची प्रशंसा करून शिस्तबध्द कार्यक्रम केल्याबद्दल आयोजकांचे कौतुक केले. यावेळी काकडदाती,बोरी, धनसळ, मुलतानवाडी, कवडीपुर येथील सतरा मुलींना संस्था कार्यकारिणी, विस्तार अधिकारी व ग्राम पंचायत सदस्य यांच्या हस्ते विद्यार्थिनींना सायकल वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळकृष्ण मंदाडे यांनी केले तर आभारप्रदर्शन छाया वाघमारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विनोद पखधने, सुनीता चव्हाण, आतिष कोसलगे, सदानंद खिल्लारे अनिल अस्वार, विष्णू मंदाडे यांनी पुढाकार घेतला.

## वेचक

### साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन



यवतमाळ : साहित्यरत्न कला, संस्कृती व विकास फाउंडेशन यवतमाळच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या १८ जुलै २०२५ (शुक्रवार) रोजी दुपारी १२.०० वाजता संविधान चौक येथील लॉर्ड बुद्धा कार्यालयात हा कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमात यवतमाळ जिल्ह्यातील मातंग समाजातील इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेत ६० टक्के व त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव व सत्कार करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक पुढील वाटचालीसाठी योग्य मार्गदर्शनही दिले जाणार असून, प्रसिद्ध व्याख्याते प्रवीण देशमुख यांच्या ज्वलंत भाषणातून समाज प्रबोधनाचा संदेश दिला जाईल. गुणवत्ताप्रविष्ट सत्कारासाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी आपली मार्कलिस्ट, आधार कार्ड, संपूर्ण पत्ता आणि मोबाईल क्रमांक, फोटो सह या व्हाट्सअप नंबरवर 9518973337, 9767725304, 9975300665 १५ जुलै २०२५ पर्यंत पाठवावा, असे आवाहन फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

### ग्रामीण रुग्णालय महागाव येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून डॉ. सत्यम गंगाधर राऊत रुजू



महागाव - सार्वजनिक आरोग्य विभाग महागाव येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये डॉ सत्यम गंगाधर राऊत यांची महागाव येथील सरकारी दवाखान्यात वैद्यकिय अधिकारी पदावर नियुक्ती झाली. आणि डॉक्टर सत्यम गंगाधर राऊत यांनी आपल्या पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर सेवेच्या त्यांच्या पहिल्या दिवसाचे औचित्य साधत महागाव येथील अनेक सामाजिक संघटना तसेच पत्रकार संघाचे प्रतिनिधी तथा गाव पातळीवरून त्यांचा सत्कार व शुभेच्छा देऊन गौरविले जात आहे याप्रसंगी महागाव नगरपंचायत चे माजी उपनगराध्यक्ष उदय उत्तमराव नरवाडे, अतुलजी सुभाषराव शिंदे, प्रतिक अडकिने, महादेव नारायण वाकोडे, विठ्ठल सखाराम वाघमारे, गणेश सब्बळे हे आणि इतर ही अनेक सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

### राज्य शासनाच्या उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कारासाठी प्रवेशिका पाठविण्यास मुदतवाढ

यवतमाळ : माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत. प्रवेशिका पाठविण्याचा अंतिम दि. ३१ जानेवारी असा होता. आता या पुरस्कारासाठी प्रवेशिका मागविण्याकरिता दि. १९ जुलै पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करून घ्यावयाचे आहेत. अर्जाचे नमुने http://dgipr.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

### दुचाकी पळविली

यवतमाळ : एका तरुणाची दुचाकी कोणीतरी अज्ञात चोरट्याने पळविली. ही घटना ६ जुलै रोजी पुसद येथे घडली. शेख सोहेल शेख जावेद (२१) रा. पार्वती नगर पुसद असे फिर्यादींचे नाव आहे. घटनेनंतर त्याने पुसद शहर पोलीस ठाणे गाठून दुचाकी क्रमांक एम एच २९ बी एन ६७७८ अंदाजे ५५ हजार रुपयांचे वाहन चोरी केल्याची तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## बाभुळगाव व मिटनापूर येथे संदल मिरवणूक

जनमाध्यम प्रतिनिधी



बाभुळगाव : बाभुळगावपासून दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या हजरत फकीर शहा उर्फ ढोल वाले बाबा व बाभुळगाव शहरातील हजरत हुसेन शाह वली बाबा या दोन्ही ठिकाणचा संदल कार्यक्रम एक दिवसाच्या फरकाने संपन्न झाला.

मिटनापूर येथे ढोल बाबा यांची संदल मिरवणूक ढोल ताशाच्या निनादात मोठ्या उत्साहात काढण्यात आली या मिरवणुकीत सर्व धर्मीयांचा सहभाग होता.

येथे कव्वालीचा कार्यक्रम पार पडला यानंतर आयोजित केलेल्या महाप्रसादाचा लाभ शेकडो भाविकांनी घेतला. मोठ्या संख्येने आलेल्या भाविक भक्तांमध्ये प्रामुख्याने दर्याचे खादीम कयूम भाई, रहूफ बेग मिर्झा, मोबीन अली कोपरेकर, अफसर बेग, सय्यद जहिर, सय्यद मुन्नाभाई, शेख शब्बीर, नदीम भाई, अवसाफ अली प्रामुख्याने हजर होते. बाभुळगाव येथील हुसेन शहा बाबा यांचा संदल कार्यक्रम पार पडला. दर्गेवर फुलांच्या व कापडी चादरी चढविण्यात आल्या. यावेळी जामा मशीदचे मौलाना मोहम्मद सलाउद्दीन यांनी देशाच्या शांतते व एकात्मते करिता प्रार्थना केली. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. या नंतर येथील प्रांगणात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. आयोजित महाप्रसादाचा लाभ मोठ्या संख्येने उपस्थित नागरिकांनी घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी जामा मस्जिद ट्रस्टचे अध्यक्ष, सर्व संचालक व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## अखेर खंडाळा पो.स्टे.ठाणेदार यांच्यावर कारवाईच्या लेखी आश्वासनामुळे उपोषण ९ व्या दिवशी तात्पुरते स्थगित

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - तालुक्यातील माळ पठारावरील पोलीस स्टेशन खंडाळा येथील ठाणेदारांच्या विरोधातील उपोषणास आयपीएस वरिष्ठ अधिकारी हर्षवर्धन बीजे यांनी कारवाईच्या लेखी आश्वासनानंतर दोन महिलांनी केलेल्या उपोषणास तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे.

सविस्तर असे की तालुक्यातील मांजर जवळा येथील अनिताबाई बन्सी कांबळे ह्या आपल्या शेती प्रकरणाचा तक्रारी अर्ज घेऊन खंडाळा पोलीस स्टेशनला 27 जून 2025 ला गेल्या होत्या. तेव्हा ठाणेदार देविदास पाटील पोस्ट खंडाळा यांनी बाईचा अर्ज घेण्यास चार ते पाच दिवसापासून नकार दिल्यामुळे बाईने वरिष्ठाकडे तक्रार केली होती त्यानुसार 27 जून2025 ला ठाणेदार देविदास पाटील यांनी बाईला अश्लील भाषेत शिवीगाळ करीत सकाळी 11 वाजता पासून ते तीन वाजेपर्यंत बिना अण्ण पाण्याचे व बिना बाथरूमचे दाबून त्यांनी पोलीस स्टेशनला ठेवले होते व एका पोलीस शिपायास सांगितले की या बाईला मोटरसायकलवर फरफटत तहसील कार्यालय पुसद येथे घेऊन जा त्यावरून अनिता बाई कांबळे यांनी पोलीस स्टेशन ला जो अपमानकारक कोणताही गुन्हा दाखल नसताना वागणूक दिली व अश्लिल भाषेत शिवी गाळकेली ह्या कारवाई करिता दि १ जुलै नऊ दिवसापासून आमरण उपोषणास सुरुवात केली होती.

त्यानंतर दि ९जुलै रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी हर्षवर्धन बिजे यांनी कारवाईचे लेखीपत्र उपोषणकर्त्या बाईस दिल्यामुळे समाजसेवक शिलानंद कांबळे यांच्या मध्यस्थीमुळे शेवटी उपोषण काही दिवसापर्यंत स्थगित करण्यात आले आहे. यावेळी देवेंद्र खडसे, मालती मिश्रा, हिराबाई कान्हेकर हे उपस्थित होते.

## स्व. डालूरामजी बोरेले स्मृती प्रित्यर्थ विद्यार्थ्यांना चांदीचे शिक्के व शैक्षणिक साहित्य वाटप



जनमाध्यम प्रतिनिधी

पांढरकवडा : छत्रपती शिवाजी महाराज नगर परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा क्र. २ येथे स्व. डालूरामजी सुखलालजी बोरेले यांच्या स्मृतीप्रित्यर्थ विद्यार्थ्यांना चांदीचे शिक्के व नोटबुक संच वाटप करण्यात आले.

रजनीकांत बोरेले व नीतावाई मडावी (बोरेले) यांचे सुपुत्र सार्थक बोरेले यांच्या हस्ते हा उपक्रम पार पडला. इयत्ता १ ते ७ च्या सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्यात आले. सातवीत प्रथम आलेल्या सबा खान, द्वितीय वेदांत दारसवार व तृतीय निकिता थोरात यांना चांदीचे शिक्के गौरव स्वरूप देण्यात आले. रजनीकांत बोरेले हे गेली २२ वर्षे सामाजिक सेवा करत असून शिक्षण, आरोग्य, आपत्ती मदत, वृद्ध-सहाय्य, भ्रष्टाचार विरोधी चळवळीत सक्रिय आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी दरवर्षी विविध स्वरूपातील मदत व प्रोत्साहन ते देतात. कार्यक्रमात मुख्याध्यापक सातुरवार सर, माजी मुख्याध्यापक गंगशेट्टीवार सर, राधिका अयलेनिवार मॅडम यांच्यासह शिक्षकवृंद व पालक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी बोरेले दाम्पत्याचा लग्न वाढदिवस विद्यार्थ्यांसोबत केक आणि केशरी वाटून साजरा करण्यात आला.

## बच्चू कडू यांची पदयात्रा ११ जुलैला तूप टाकळी नगरीत मुक्काम



जनमाध्यम प्रतिनिधी

दिग्रस - प्रहार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष व महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री बच्चुभाऊ कडू यांचा व शेतकरी .शेतमजूर .दिव्यांग बांधव यांची पायदळ वारी शेतकऱ्याचा सातबारा कोरा कोरा कोरा कर्जमाफी व विविध मागण्या घेऊन डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जन्म गाव पापळ. जिल्हा अमरावती ते साहेबराव करपे पाटील यांचे चिलगव्हाण तालुका महागाव जिल्हा यवतमाळ या गावापर्यंत निघालेली आहे. ७ जुलैपासून सुरू झालेली या पायदळ वारी चे मुक्काम दिग्रस तालुक्यातील तूप टाकळी या गावामध्ये दिनांक 11 जुलै २०२५ रोजी शुक्रवार श्रीराम मंदिर संस्थान तूप टाकळी. येथे आगमन व मुक्काम असणार आहे.

दिग्रस तालुक्यातील शेतकरी. शेतमजूर. दिव्यांग बांधव. व मच्छीमार या बांधवांनी उपस्थित रहावे. असे आव्हान प्रहार दिव्यांग संघटना दिग्रस तालुका व श्रीराम मंदिर संस्थान तूप टाकळी व गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा झालाच पाहिजे !

### '७/१२ कोरा' पदयात्रेला मनसेचा ठाम पाठिंबा : बाळा नांदगावकर यांची हजेरी



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - राज्यातील शेतकऱ्यांच्या हक्काच्या '७/१२ कोरा' मागणीसाठी सुरू असलेल्या पदयात्रेला आता राजकीय बळही मिळू लागले आहे. याच पार्श्वभूमीवर मुंबईहून खास येऊन मनसेचे ज्येष्ठ नेते बाळा साहेब नांदगावकर यांनी यवतमाळ जिल्ह्यात सुरू असलेल्या बच्चू कडू यांच्या '७/१२ कोरा' पदयात्रेत सहभागी होत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा पाठिंबा जाहीर केला.

यावेळी बोलताना नांदगावकर म्हणाले, "शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करणे ही केवळ राजकीय भूमिका नसून ती शेतकऱ्यांच्या आत्मसन्मानाशी जोडलेली लढाई आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनीही या लढ्याला ठाम पाठिंबा दर्शविला आहे." या आंदोलनाला वेगवेगळ्या पक्षांतील नेत्यांनी पाठिंबा दर्शविला असला तरी प्रत्यक्ष मैदानात उतरून पाठिंबा देणारा पहिला मोठा नेता म्हणजे बाळा नांदगावकर. त्यामुळे पदयात्रेला नवचैतन्य लाभले असून राज्य सरकारवरील दबाव अधिक वाढण्याची शक्यता आहे. बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या पदयात्रेमुळे राज्यात पुन्हा एकदा शेतकरी प्रश्न ऐरणीवर आला आहे. शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर कर्जमुक्तीचा ठसा नसावा, ही या आंदोलनाची मुख्य मागणी आहे.

# कुऱ्हा परिसरात अतिवृष्टीचा फटका

**कुऱ्हा/ वार्ताहर**

गेल्या पाच दिवसापासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांना पाण्याचा मोठा प्रमाणात फटका बसला असून शेतकऱ्यांच्या शेतात अक्षरशः जलाशयाचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

गेल्या चार दिवसांपासून पावसाने रिपरिपीने शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होताना दिसत आहे.

जूनमध्ये पावसाने खंत दिल्याने मात्र जुलैत पहिल्या सप्ताहातही त्याची हजेरी फारशी नव्हती रविवार पासून मात्र संततधार धरल्याने जीवनमान विस्कळीत होऊन लागले आहे.



शेतीला आले जलाशयाचे स्वरूप

मुसळधार स्वरूपाचा पाऊस नसला तरी सतत आलेल्या रिपरिपीने पावसाची तीव्रता वाढू लागली. हा पाऊस पिकांसाठी पोषक मानला जात असला तरी मात्र शेतामध्ये मोठ्या प्रमाणात पाणीच पाणी दिसत आहे.

त्यामुळे पिकांची सड होते कि काय याची शेतकऱ्यांना शंका आहे.या पावसाने वित्तहानी झाल्याची नोंद नसली तरी काही भागांत शेतात पाणी थांबल्याने पिकांना बाधा पोहोचण्याची शक्यता आहे.

# तिवसा तालुक्यात अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान

## शेंदूरजना बाजार येथील शेती पाण्याखाली



**तिवसा/ वार्ताहर**

तिवसा तालुक्यात तीन दिवसापासून सुरू असलेल्या सततधार पावसामुळे सोयाबीन,कापूस, तूर या पिकाचे नुकसान झाले असून तालुक्यातील शेंदुर्जना बाजार मौजातील पाच एकर शेत पाण्याखाली आल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. तर अनेक भागात तलावाचे स्वरूप आल्याने शेतकऱ्यांकडून नुकसानभरपाईची मागणी होत आहे.

शेंदूरजना बाजार येथील जितेंद्र चौधरी यांचे गावाला तीन एकर शेत आहे. ज्यामध्ये त्यांनी पराटीची लागवड केली होती तसेच गोपाल देवळे यांचे दोन एकर शेत असून त्यांनी सोयाबीन पिकाची लागवड केली परंतु या दोन्ही शेती सततधार पावसामुळे पाण्याखाली आल्याने शेताताला तलावाचे स्वरूप आले आहे.तीन दिवसापासून सुरु असलेल्या सततधार पावसामुळे तालुक्यातील लहान मोठ्या नाल्याना पूर आल्याने पुराचे पाणी शेतात शिरून नुकसान झाले आहे.अश्या अनेक ठिकाणी पिके पाण्याखाली आली असून तालुक्यातील शेतकऱ्यांकडून नुकसानभरपाईची मागणी होत आहे. तालुक्यातील नमस्कारी हे ३५०लोक संख्या असलेल गाव गेल्या तीन वर्षापासून सातत्याने शासनाच्या संपर्काच्या बाहेर जात असल्यामुळे आज तिवसा तहसीलदार डॉ. मुयर कळसे व नायब तहसीलदार आशिष नागरे यांनी या गावाची पाहणी करून पर्जन्य परिस्थितीचा आढावा घेतला.

# संक्षिप्त

## पियुष मेश्राम याला पुरस्कार



**टाकरखेडा संभू-** अमरावती जिल्ह्यातिल टाकरखेड़ा संभु येथील सुपुत्र पियुष अरुण मेश्राम याने सौंदर्य उद्योग क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्यामुळे 'India Beauty We Industry Trendsetter of the Year' हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळवला आहे. मुंबईत नुकत्याच पार पडलेल्या भव्य सोहळ्यात मराठीतील प्रसिद्ध अभिनेत्री प्राजक्ता माळी यांच्या हस्ते त्याचा गौरव करण्यात आला.सौंदर्य आणि फॅशन क्षेत्रात नावीन्यपूर्ण कामगिरी, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि तरुणांना प्रेरणा देणाऱ्या उपक्रमांमुळे पियुष मेश्राम यांची निवड या पुरस्कारासाठी करण्यात आली.हा पुरस्कार मिळाल्याने संपूर्ण अमरावती जिल्ह्याचा नावलौकिक वाढला असून, तरुण उद्योजकांसाठी तो एक प्रेरणास्थान ठरत आहे.

## जन्म प्रमाणपत्रासाठी शनिवार-रविवार शिबीर

**अमरावती-** महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या आदेशानुसार, शनिवार व रविवार या सुटीच्या दिवशी झोननिहाय शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिरे झोन क्र. १ ते ५ अंतर्गत येणाऱ्या विभागांमध्ये पार पडणार असून, ० ते ६ वर्ष वयोगटातील मुलांचे जन्म प्रमाणपत्र मिळवण्यासाठी ही सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.शिबिरांचा लाभ त्याच लाभार्थींना मिळणार आहे, ज्यांची नोंद मनपा जन्ममृत्यू नोंदणी विभागात आधीपासून झालेली आहे. पालकांनी आपल्या मुलांचे जन्म प्रमाणपत्र लवकरात लवकर घेण्यासाठी या शिबिरांना भेट द्यावी, असे आवाहन आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले आहे.महानगरपालिकेच्या या उपक्रमामुळे नागरिकांना आपले आवश्यक कागदपत्रे मिळवणे अधिक सुलभ होणार असून, वेळ व श्रम वाचणार आहेत.

## क्रांती ज्योती ब्रिगेडची सदिच्छा भेट

**अमरावती-** किसान ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष प्रकाशभाऊ पोहरे यांनी क्रांती ज्योती ब्रिगेड सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. नंदेश अंबाडकर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.भेटी दरम्यान शेतकरी, कष्टकरी यांच्या विविध समस्या बाबत राष्ट्रीय अधिवेशन घेणे, युवा शेतकरी यांचे करिता कार्यशाळा आयोजित करणे आदी मुद्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. याप्रसंगी किसान ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष दिवाकर गावंडे, कार्याध्यक्ष शरद वानखेडे, कोषाध्यक्ष बी. डी. पाटील, क्रांती ज्योती ब्रिगेड कृषक आघाडीचे जिल्हाध्यक्ष ॲड. प्रभाकर वानखडे उपस्थित होते.

## सीए सेजल चंदाराणाचे चांदूर रेल्वे शहराते आगमन



**चांदूर रेल्वे-** शहरातील प्रतिष्ठीत नागरिक सचिन चंदाराणा व स्नेहा चंदाराणा ह्या दाम्पत्यांची लहान कन्या कुमारी सेजल सचिन चंदाराणा हिने नुकतेच चार्टर्ड अकाउंटन्सी परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण करून शहराचे व परीवाराचे नावलौकिक केले केला.सेजल हीने १ रे मिळालेल्या नैत्रदीपक यशानंतर सेजलचे शहरात आगमन झाले यावेळी वडील सचिन आई स्नेहा व काका निलेश, काकू जयश्री , आजी निर्मला वसाणी व चंदाराणा ह्यांच्या मित्र पारस राय, मेघा राय व इतर नातेवाईकांनी रेल्वे स्टेशनवर उत्साहात स्वागत करून केले.सेजल ने प्राप्त केलेल्या यशामुळे सर्वच स्तरावरून तीचे कौतुक होत आहे.

## उमादेवी बजाज यांच्या नेत्रदानातून दोघांना मिळणार दृष्टी

**अमरावती-** श्रीकृष्ण पेठ येथील रहिवासी उमादेवी भवरलाल बजाजा कुटुंबाने उमादेवी यांचे मरणोपरांत नेत्रदान करण्याचा निर्णय घेतला व संकल्प पूर्ण केला. हरिना फाऊडेशनच्या माध्यमातून उमादेवी बजाज यांच्या नेत्रदानाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. उमादेवी यांच्या नेत्रदानामुळे आता दोन अंध व्यक्तीना दृष्टी मिळणार असून त्यांना अंधकारमय जीवनात प्रकाशवाट गवसणार आहे.उमादेवी बजाज या अमरावतीच्या श्रीकृष्ण पेठ येथे राहणा-या आनंद श्रीगोपाल बजाज यांच्या आजी आणि गोपाल सेल्सचे संचालक गोपाल बजाज आणि दामोदर बजाज यांच्या मातोश्री होत्या. वयाच्या ८० व्या वर्षी ५ जुलै रोजी उमादेवी यांचे हदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यानंतर बजाज परिवाराने उमादेवी यांचे नेत्रदान करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी आपला हा संकल्प डॉ. श्रीगोपाल राठी यांना कळविला आणि त्यांच्या माध्यमातून नेत्रदानासाठी हरिना फाउंडेशनचे डॉ. नंदकिशोर लोहाना यांच्याशी संपर्क साधण्यात आला. जिल्हा सामान्य रुग्णालयातील डॉ. अंकुश गोळंबे आणि नीलेश डेगळे यांनी ही नेत्रदानाची प्रक्रीया पूर्ण केली. यावेळी दिवंगत उमादेवी बजाज यांच्या परिवारातील सदस्य उपस्थीत होते.

## विभागीय आयुक्तालयात सोमवारी लोकशाही दिन

**अमरावती-** विभागीय लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. त्यानुसार येत्या सोमवारी (दि. १४ जुलै २०२५ रोजी) सकाळी ११ वाजता विभागीय लोकशाही दिन व महिला लोकशाही दिनाचे आयोजन विभागीय आयुक्त कार्यालयात करण्यात आले आहे, असे अपर आयुक्त रामदास सिध्दभट्टी यांनी पत्रकाव्दारे कळविले आहे. विभागीय लोकशाही दिनासाठी यापूर्वी प्राप्त तक्रारीचे निराकरण करण्यात येईल. विभागीय लोकशाही दिनात तक्रार नोंदविण्यासाठी नागरिकांनी तसेच महिलांनी त्यांचे तक्रार अर्ज (तालुका, जिल्हा किंवा महापालिका लोकशाही दिनानंतर) विहित नमुन्यात १५ दिवस अगोदर दोन प्रतीत पाठविणे आवश्यक राहील. नागरिकांनी तक्रार अर्ज dcgamravati@gmail.com किंवा dcg_amravati@rediffmail.com या ई-मेलवर विहित नमून्यात पाठविण्याचे आवाहन आयुक्तालयाच्यावतीने करण्यात आले आहे.

## डॉ. राजीव बोरकर रविवारी आकाशवाणीवर

**अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग अंतर्गत सत्र २०२५-२६ करिता विद्यार्थी हितार्थ विविध योजनांची सुरुवात ऑगस्ट महिन्यापासून होणार आहे. यासंदर्भातच विभागाचे संचालक डॉ. राजीव बोरकर रविवार १३ जुलै रोजी सकाळी १० वा. अमरावती आकाशवाणीच्या युवावाणी या लोकप्रिय कार्यक्रमातून डॉ. बोरकर श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने विद्यार्थी हितार्थ चालविल्या जाणा-या कमवा आणि शिका, शुध्द पेयजल योजना, विद्याधन योजना, विद्यार्थी दायित्व निधी योजना, शिक्षण संरक्षण योजना, बस पास सवलत योजना, विद्यार्थी विकास निधी शिष्यवृत्ती, कौशल्य विकास योजना, विमा आणि विद्यापीठाच्यावतीने विद्यार्थ्यांना विधायक कार्यासाठी दिले जाणारे विविध पुरस्कार, विद्यार्थ्यांना तक्रारी असल्यास विद्यापीठातील तक्रार निवारण केंद्राच्या कार्यपध्दतीविषयी व युवा महोत्सव अशा विविध विषयांवर या मुलाखतीतून डॉ. बोरकर बोलणार आहेत.

# वझ्झर धरणाची दोन दारे उघडली



**अमरावती/ का.प्र.**

अचलपूर तालुक्यातील वझ्झर धरणात येणा-या पाण्याचे प्रमाण वाढल्याने धरणाचा पाणीसाठी ७५ टक्क्यांच्या पुढे गेला आहे. त्यामुळे धरणाची दोन दारे पाच सेटीमीटरने बुधवारी सायंकाळी उघडण्यात आलेली आहे.

वझ्झर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या दोन दिवसापासून पावसाचा चांगला जोर आहे. पंधरा दिवसापासून सुरु असलेला पाऊस आता थांबेल असे वाटत असतानाच चार दिवसापासून पुन्हा पावसाने कमी जास्त प्रमाणात जोर धरला आहे.

गत २४ तासात सततच्या पावसामुळे सपन मध्यम प्रकल्प धरणातील पाणीसाठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. पर्यटकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे तसेच सपन नदीवरील वझ्झर धरण ७०.५० टक्के भरले असून सपन नदीपात्रातील पाण्याची पातळी वाढत आहे. सपन नदी भरुन वाहत आहे आणि वझ्झर धरणात चांगला पाणीसाठा जमा होत आहे.

# भुयारी मार्ग जलमय झाल्याने रुग्णवाहिका चिखलात अडकली



**अंजनगाव बारी/ वार्ताहर**

पार्डी (देवी) येथील रेल्वे गेट बंद झाल्याने भुयारी अंडरपास मार्गात पुलाखाली भरपूर प्रमाणात पाणी साचल्याने पार्डी सह अनेक गावांचा संपर्क तुटला आहे.

पार्डी-उदखेड पर्यायी मार्गाने आज सकाळी दहा वाजता सुमारास एका रुग्णवाहीका चिखलात फसली एकप्रकारे तारांबळ उडाली. कसेतरी करून गावकऱ्यांच्या मदतीने रुग्णवाहिका चिखलातून बाहेर काढण्यात आली. अशाप्रकारे बिकट परिस्थिती सध्या पार्डी येथे पहायला मिळत असुन नागरिकांनी जिल्हा प्रशासनाला संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे. पार्डी येथील सरपंच अक्षय मेश्राम यांनी निवेदनाद्वारे वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासन जागे होत असुन सर्वसामान्यसह वाहतुकीस अडथळा निर्माण झाल्याने जनजीवन विस्कळित झाले आहे.

# शहानुर धरणाचा जलसाठा केवळ ३९.५० टक्के

**अंजनगाव सुर्जी / वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी, दर्यापूर या दोन शहरासह अंजनगाव दर्यापूर तालुक्यातील २३५ ग्रामीण भागातील गावांना तसेच अचलपूर तालुक्यातील पथरोट (ग्रामपंचायत) गावाला पाणीपुरवठा करणारा शहानुर धरणाचा जलसाठा केवळ ३९.५० असल्याची माहिती अंजनगाव सूर्जी शहानुर कार्यालयाचे अभियंता एस जे.आडे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

शहानुर धरणात वाहत येणाऱ्या नदीला अजून पर्यंत पाणी सुरू न झाल्याने शहानुर नदीच्या जलसाठ्यात वाढ झाली नाही ८ जुलै २०२५ पर्यंत शहानुर धरणात सध्या ३९.५० केवळ एवढा जलसाठा आहे.



शहानुर महत्तम लेवल एफआरएल ४४९. ५० मिटर तर धरणाची वॉटर लेवल ४३७.०९ मीटर असून शहानुरच्या गीरगोटी कॅशमेंट क्षेत्रात ७ जुलै ते ८ जुलै २०२५ सकाळी सात वाजेपर्यंत ४६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली असल्याचे शहानुर कार्यालयाचे शाखा अभियंता एस.जे.आडे यांनी सांगितले.शहानुर धरणात पाण्याची पाहिजे तशी आवक नसल्याने शहानुर धरणाची जल साठ्याची सध्याची टक्केवारी केवळ ३९.५० आहे.

# उद्या पाणीपुरवठा बंद



**अमरावती-** पाणी पुरवठा योजनेच्या सिंभोरा हेडवर्क्स येथे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मार्फत १३२ के.व्ही. व ३३ के.व्ही. मोर्शी सबस्टेशन येथे देखभाल व दुरुस्तीचे काम नियोजित असल्यामुळे सिंभोरा येथील विद्युत पुरवठा व पंपीग बंद असल्याने १२ जुलै रोजी अमरावती व बडनेरा शहरातील नागपुरी गेट, सातुर्णा, साई नगर, राठी नगर, पार्वती नगर, म्हाडा कॉलनी, बडनेरा (नवीन) लालखेडी, मालटेकडी अप्पर / लोअर टाकीवरुन सकाळी ८.०० वाजता नंतरचा होणारा पाणी पुरवठा प्रभावित होईल. करीता नागरीकांनी पाण्याचा साठा करुन ठेवावा व पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे मजीप्रा मार्फत आवाहन करण्यात येत आहे.

# समीर देशमुख व इरफान खान यांचा एन आय एस कोर्स यशस्वी





**अमरावती/ का.प्र.**

नुकताच भारत सरकारच्या द्वारा संचालित भारतीय खेल प्राधिकरण यांच्यावतीने नेताजी सुभाष नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स पटियाला ( पंजाब ) द्वारा कुस्ती कोर्स साठी श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे जेष्ठ पैलवान समीर दीपक देशमुख व इरफान खान या दोघांचा प्रवेश घेतला होता. त्यांनी एन आय एस कुस्तीमध्ये आपला कोर्स पूर्ण करून यशस्वीरित्या संपन्न केला.

पटियाला येथे त्यांनी आधुनिक कुस्ती तंत्रज्ञान अवगत करून प्रमाणपत्र मिळवले. ज्ञानाच्या भरोशावर अमरावती जिल्ह्यातील व विदर्भातील पैलवानांचा कुस्तीमध्ये विकास व्हावा, युवकांनी कुस्तीमध्ये भाग घ्यावा, राज्य-राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांनी प्रतिनिधित्व करता यावे म्हणून समीर देशमुख व इरफान खान हे प्रयत्नशील आहे. महाराष्ट्रातील फार कमी युवक हा कोर्स करतात.श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, डॉ माधुरी चेंडके, डॉ संजय तिरथकर नेहमी प्रयत्नशील असतात. विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील संपूर्ण खेळाचा विकास झाला पाहिजे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर युगांनी भाग घेतला पाहिजे म्हणून सगळ्यांना प्रोत्साहित करत असतात.समीर देशमुख आणि इरफान खान यांनी एनआय कोर्स पूर्ण केल्याबद्दल संपूर्ण अमरावती जिल्ह्यातील कुस्ती क्षेत्रामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झालेला आहे. पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांनी या दोघांचे सुद्धा अभिनंदन केले व पुढील कार्य करिता शुभेच्छा दिल्या.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा नेत्रदान संकल्पात उच्चांक

## दिलेल्या उद्दिष्टांपेक्षा ४२६ जणांचा नेत्रदानाचा संकल्प



**अमरावती/ वार्ताहर**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या मार्गदर्शन व नेतृत्वात नेत्रदान संकल्पामध्ये उच्चांक गाठला असून, राज्यपाल तथा कुलपति कार्यालयाने दिलेल्या उद्दिष्टांपेक्षा अधिक जणांनी आपला नेत्रदानाचा संकल्प केला आहे.

भारताचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्ताने महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपति यांच्या कार्यालयाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला तीनशे दात्यांचे नेत्रदान संकल्पपत्र भरुन देण्याबाबत कळविले होते. त्यानुसार कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या मार्गदर्शन आणि नेतृत्वामध्ये विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी, शिक्षक यांनी ४२६ अर्थात दिलेल्या उद्दिष्टांपेक्षा अधिक नेत्रदानाचे संकल्पपत्र भरून विद्यापीठाच्या आरोग्य केंद्राकडे दिले व आरोग्य केंद्राने सर्व ४२६ जणांचे नेत्रदानाचे संकल्पपत्र राज्यपाल कार्यालयाला पाठविले आहे. यासाठी विद्यापीठ आरोग्य केंद्राच्या आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात व त्यांच्या चमूंनी अथक परिश्रम घेतले. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी नेत्रदानाचे संकल्पपत्र भरून देणा-या सर्वांचे अभिनंदन केले आहे.

# गट साधन केंद्रात शालेय परिवहन समिती सभा



ए.पी.आय.शरद अहिरे यांनी दिले मुख्याध्यपकांना निर्देश

**चांदूर रेल्वे/ वार्ताहर**

शालेय स्तरावर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अतिसंवेदनशील मानल्या जाणाऱ्या 'शालेय परिवहन समिती' ह्या खास विषयासाठी चांदूर रेल्वे पोलीस स्टेशन आणि गटशिक्षणाधिकारी कार्यालय, पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमानाने गटसाधन केंद्र पं.स. चांदूर रेल्वे येथे तालुक्यातील सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमांच्या खाजगी, अनुदानित व स्वयंअर्थशासित शाळांच्या मुख्याध्यापकांची सभा नुकतीच आयोजित करण्यात आली होती.

सभेला सबोधित करताना .ए.पी.आय.शरद अहिरे यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षततेच्या दृष्टीने स्कुल बस चालकांनी घ्यावयाची काळजी व आवश्यक कागदपत्राची पूर्तता करण्यासाठी स्कुल बस चालकांना सूचना देण्यासाठी शालेय स्तरावर परिवहन समिती स्थापन करून उचित कार्यवाही करावयाचे निर्देश मुख्याद्यापकांना दिले.यावेळी गटशिक्षणाधिकारी संदीप बोडखे यांनी सुद्धा परिवहन समिती बाबत प्रत्येक मुख्याध्यापकांनी जागृत राहण्याचे आवाहन केले.न.प.प्रशासन अधिकारी उमेश बेहरे यांनी परिवहन समिती बाबत १४ सप्टेंबर २०११ च्या शासन निर्णयाचे वाचन करून शालेय परिवहन समिती ची आवश्यकता व महत्व स्पष्ट केले.

सभेला ए.पी.आय. शरद अहिरे , गटशिक्षणाधिकारी संदीप बोडखे ,न.प. प्रशासन उमेश बेहरे, हे.कॉ.योगेश नेवारे ,हे.कॉ. विशाल रंगारी, तसेच मुख्याद्यापक संघाचे अध्यक्ष प्रदीप तळोकर, यांच्यासाह सर्व शाळांचे मुख्याध्यापक व मुख्याध्यापिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेचे सूत्रसंचालन विशेष शिक्षक अनिल गोंडसे तर आभार विषय तज्ञ श्रीनाथ वानखडे यांनी व्यक्त केले.

# शिक्षकांच्या भविष्याचा प्रश्न अनुत्तरित : शासन जागे होणार?

राज्य शासनाने दि. १४ ऑक्टोबर २०२४ रोजी घेतलेल्या मंत्रिमंडळ निर्णयात विना-अनुदानित, अंशतः अनुदानित शाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती, अनुदान टप्पा, अतिरिक्त तुकड्यांना अनुदान देणे, नव्याने सुरू झालेल्या शाळांना मदत इ. संदर्भात महत्त्वपूर्ण आणि आश्वासक निर्णय जाहीर केले. या निर्णयामुळे सुमारे ४९ हजार ५६२ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दिलासा मिळणार होता, शिक्षणाचा दर्जाही वाढणार होता. पण आज नऊ महिने उलटले तरी हा निर्णय केवळ कागदावरच आहे; अंमलबजावणीचा पत्ता नाही! शेवटी शाळा बंद आंदोलन करावे लागते ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे.

**आंदोलन सुरु, पण सरकारचे मौन?**

८ आणि ९ जुलै २०२५ रोजी राज्यभरातील शिक्षक संघटनांनी विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकण अशा सर्व भागांत एकत्रितपणे आंदोलनाला सुरुवात केली. विविध जिल्ह्यांमध्ये निदर्शने, निवेदने, घंटानाद, ठिय्या आंदोलन, काळ्या फिती अशा मार्गांनी आंदोलन तीव्र केले जात आहे. शैक्षणिक वर्ष सुरु असतानाही शिक्षकांना आंदोलनाचा मार्ग का स्वीकारावा लागतो आहे, हे शासनाने आत्मपरीक्षण करायला हवे. विरोधी पक्षाचे नेते आंदोलक शिक्षकांच्या भेटी घेत आहेत, व्यासपीठावर उभे राहत आहेत. त्यांचे समर्थन जाहीर करत आहेत. पण सत्ताधारी मात्र अद्याप मौन. राजकीय इच्छाशक्तीचा अभावच का? या आंदोलनामागे आहे, असा प्रश्न उपस्थित होतो.

**४९ हजार ५६२ कर्मचाऱ्यांच्या जीवनमरणाचा प्रश्न**



शासनाच्या वागणुकीवरून एक गोष्ट स्पष्ट होते. शिक्षकांच्या जीवनाशी संबंधित निर्णयांना शासन दुय्यम महत्त्व देते. आज राज्यभरातील शेकडो शिक्षकांना अर्धवट वेतनावर, अस्थिर सेवाशर्तीमध्ये काम करावं लागतं आहे. काहींना १०–१५ वर्षे सेवा करूनही वेतनाची नियमितता नाही, तर काहींच्या बाबतीत सेवाश्रेयच नाकारले जाते. दि. १४ ऑक्टोबरच्या निर्णयानुसार हे सारे प्रश्न मार्गी लागणार होते, पण मंत्रिमंडळ निर्णय जाहीर करूनही शासनाने अंमलबजावणीत दिरंगाई केली. ही केवळ प्रशासकीय विलंबाची गोष्ट नाही, तर मानवी हक्कांच्या पायमल्लीची बाब आहे.

**शिक्षक म्हणजे राष्ट्रनिर्माते, की संघर्ष करणारे मजूर नव्हे?**

या सर्व प्रकरणात महत्त्वाचा मुद्दा असा की, एकीकडे 'गुणवत्तापूर्ण शिक्षण', राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० यासारख्या धोरणांची गर्जना केली जाते, तर दुसरीकडे शिक्षण क्षेत्रात कार्यरत शिक्षकांना न्याय मिळवण्यासाठी रस्त्यावर उतरावं लागतं. हे कुठल्या शिक्षणदृष्टीचं लक्षण आहे? शासनाला शिक्षकांची 'नौकरी' हवी आहे, पण त्यांना 'मानवी अधिकार', 'समानता', 'स्थैर्य' हे देण्याची तयारी नाही. हा दृष्टिकोन बदलला नाही, तर नवीन पिढीवर परिणाम होणार हे सरकारने लक्षात घ्यायला हवे.

**विरोधी पक्षांच्या भेटी सहानुभूती की पुढील राजकारणाची तयारी?**

आझाद मैदानवरील आंदोलन स्थळी येणारे विरोधी पक्षाचे नेते आंदोलकांच्या भावना जाणून घेत आहेत, हे स्वागतार्ह आहे. मात्र प्रश्न असा आहे, या भेटींमागे फक्त सहानुभूती आहे की आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतांसाठीचा हिशेब? कारण सत्ताधारी असताना हेच नेते अशाच शिक्षक आंदोलनांना डावलत होते. त्यामुळे शिक्षकांनीही या पाठिंब्याच्या राजकारणाची चिकित्सा करायला हवी.

**मागणी नाही, किमान न्याय देणार?**

शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी आज काही अतिरिक्त लाभ किंवा नवीन सवलती मागत नाहीत. त्यांची मागणी आहे. शासनानेच घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करा! ही फक्त मागणी नाही, तर किमान न्यायाची अपेक्षा आहे. आणि या अपेक्षेची पूर्तता न झाल्यास शिक्षण व्यवस्थेवर आणि सरकारच्या कार्यक्षमतेवर विश्वास उरलेला नाही, असे म्हणायला भाग पडेल.

**कोण झोपले आहे?**

सध्याची परिस्थिती पाहता प्रश्न असा आहे की, शिक्षक झोपले आहेत का, की सरकार? शिक्षक तर जागे आहेत,रस्त्यावर उतरले आहेत. पण शासन अजूनही निद्रिस्त अवस्थेत आहे. या निद्रिस्ततेचे परिणाम फक्त शिक्षकांवर नव्हे, तर संपूर्ण शिक्षणव्यवस्थेवर होतील, हे शासनाने विसरू नये. तेव्हा शासनाने आमच्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा, एवढेच नव्हे तर नैसर्गिक न्यायानुसार शंभर टक्के अनुदानाची तरतूद करावी एवढेच मागणे या निमित्ताने आम्ही करतो आहे.

एकंदरीत १४ ऑक्टोबर २०२४ च्या मंत्रिमंडळ निर्णयानुसार अनुदान प्राप्त होणाऱ्या संस्थांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना टप्प्याटप्प्याने नियमित अनुदानाचा लाभ मिळणार होता. परंतु, हा निर्णय कार्यान्वित करण्यात शासनाचे अपयश आणि उदासीनता दिसून येते. ४९ हजार ५६२ कर्मचारी अनेक वर्षांपासून सेवा देत असूनही त्यांना वेतन, सेवा-सुरक्षा, भविष्यनिर्वाह निधी यासारख्या मूलभूत हक्कांपासून वंचित ठेवले जात आहे. ८ व ९ जुलै २०२५ रोजीचे आंदोलन हे त्यांच्या असंतोषाचे प्रतिक असून शासनाच्या अनुत्तरदायित्वावर एक कठोर प्रश्नचिन्ह आहे. विरोधी पक्षांनी या आंदोलनाला पाठिंबा दिला असला, तरी अंतिम जबाबदारी सत्ताधाऱ्यांचीच आहे. शिक्षण क्षेत्राचे भवितव्य या निर्णयाच्या अंमलबजावणीवर अवलंबून आहे. शासनाने तत्काळ सकारात्मक पाऊले उचलून हा निर्णय अंमलात आणला नाही, तर हा केवळ कर्मचारी वर्गासाठीच नव्हे, तर संपूर्ण शैक्षणिक व्यवस्थेसाठी एक गंभीर धोका ठरू शकतो. त्यामुळे शासनाने जागे होऊन शिक्षण क्षेत्राशी न्याय करणे अत्यावश्यक आहे.

**डॉ. प्रशांत विघे**
**प्राध्यापक तथा राज्यशास्त्र, विभागप्रमुख,**
**भारतीय महाविद्यालय, अमरावती**
**मो.९३२६८७७७४९**

## थोडासा पाऊस पडला तरी लाईन का जाते?

अनेकांना पडलेल्या प्रश्नाच आजवर अनेकांनी उत्तरही दिलं.
अनेकांनी रिल्स,विनोदी चुटकुले असे नाना प्रकार करून
हा प्रश्न नेहमीचा झालाय अस आता वाटतं आहे..
थोडासा पाऊस पडला तरी लाईन का जाते?

चिनी मातीच्या असलेल्या डिस्क किंवा इन्सुलेटर ह्या उन्हात गरम होत असतात.त्यात विजेच्या तारांमुळे तापमान अधिक असते अश्यातच पावसाच्या वातावरणात सुरवातीच्या पावसाळ्यात पाऊस पडला की ह्या गरम झालेल्या डिस्क अथवा पिन असलेले इन्सुलेटरवर पावसाच्या पाण्याचा थेंब पडून त्या जागी छोटेसे छिद्र निर्माण होऊन लाईन अर्थ होते.

झालेल्या छिद्रामुळे सुरू असलेल्या विद्युत वाहिनीतील विद्युत पुरवठा पडलेल्या छिद्रातून जमिनीसोबत संपर्कात येतो..त्याचमुळे लाईन फॉल्ट होते...सुईच्या टोकाएवढे असलेले छिद्र आवाज करत नसल्याने असे फॉल्ट काढणे कठीण होत असते..त्यामुळे लाईन सुरू होण्यासाठी वेळ लागत असतो...छिद्र पडलेले डिस्क किंवा इन्सुलेटर पाऊस आल्यानंतर त्या छिद्रात पाणी साचून लाईन बंद होत असते.पाऊस बंद झाला की पुन्हा लाईन आपोआप सुरू होते..

अशा परिस्थितीत लाईनवर फॉल्ट काढण्यासाठी अधिक वेळ..
वाया जातो.यावर संशोधन करून येणाऱ्या काळात अशा होणाऱ्या फॉल्टवर पर्यायी व्यवस्था किंवा असे होऊ नये.. यासाठी मार्ग काढणे आवश्यक आहे...

पावसाळ्यात होणाऱ्या अशा फॉल्ट दरम्यान ग्राहकांनी...
लाईनमन,अधिकारी बांधवांना सहकार्य करावे,हीच अपेक्षा...

**एक लाईनमन**

# बाल कुपोषणावर नियंत्रण काळाची गरज...!

राज्यातील मेळघाट आणि गडचिरोली जिल्ह्याच्या दुर्गम भागातील बालकुपोषणाची तीव्रता गेल्या अनेक वर्षांपासून कायम आहे. त्यात शहरी भागात आढळणाऱ्या बाल कुपोषणाने त्यात भर घातली आहे. राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात राज्यातील कुपोषण कमी करण्याच्या उपाययोजनेबाबत सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्यावरील लेखी उत्तरात महिला व बालविकास विभागाच्या वतीने कुपोषित बालकांची आकडेवारी उघडीस आली. त्यानुसार राज्यात सर्वाधिक तीव्र कुपोषित बालके मुंबई उपनगरात असल्याचे धक्कादायक माहिती उघड झाली.या आकडेवारीनुसार राज्यात एक लाख अठ्ठयाशी हजार चारशे त्रेचाळीस कुपोषित बालके आहेत.त्यापैकी तीस हजार आठशे बालके तीव्र कुपोषित श्रेणीत आहे. तर एक लाख एक्कावन हजार सहाशे त्रेचाळीस बालके मध्यम कुपोषण श्रेणीत आहे. तीव्र व मध्यम कुपोषित बालकांच्या संख्येत राज्याच्या मानाने मुंबई उपनगर,नाशिक, पुणे,नागपूर आणि धुळे जिल्ह्यातील बालकांचे प्रमाण अधिक आढळून आले आहे.

ग्रामीण भागातील वाढत्या कुपोषणाच्या संदर्भात सामाजिक व आर्थिक विषमता, पोषण आहाराचा अभाव आणि अपुरी आरोग्य व्यवस्था हे घटक कारणीभूत आहे. तर शहरी भागातील कुपोषणाच्या प्रमुख कारणांमध्ये ग्रामीण भागातून शहरांकडे होण्याऱ्या स्थलांतरित मजुरांची वाढती संख्या होय. तसेच त्यांचे अत्यंत निकृष्ट जीवनमान मानले पाहिजे. खेड्यातून रोजगारासाठी महानगरांकडे स्थलांतरित होणाऱ्या या कुटुंबीयांना ना पुरेशी आरोग्य सुविधा असते, ना सकस पोषण आहार, ना शुद्ध पिण्याचे पाणी. हात मजुरीवर काम करणाऱ्या लाखो कुटुंबावर दोन वेळेचे पोटभर अन्न मिळण्याची क्षमता नाही. त्यात निरक्षरता, आर्थिक चणचण, महिला व बालकांच्या आरोग्याची होणारी हेळसांड,वाढती महागाई, ढासळती आर्थिक परिस्थिती अशा अगणित समस्यांच्या गर्तेत मुलांना सकस आहाराचा पुरवठा पाल्यांच्या आवाक्या बाहेरचा ठरतो. आज सकस पोषण आहाराच्या अभावामुळे कुपोषणाची तीव्रता वाढत आहे. बाल कुपोषण कमी करण्याच्या संदर्भात राज्य शासनाच्या अनेक योजना कार्यान्वित आहेत. लाखो आरोग्य कर्मचारी, विविध टास्क फोर्स, शिबिरे सुद्धा उभारली जातात. आर्थिक बजेटमध्ये तरतुद केली जाते. तरीसुद्धा



बाल कुपोषणाची तीव्रता दिवसेंदिवस वाढताना दृष्टीस पडते. शासन पातळीवर 'इंटिग्रेटेड चाइल्ड डेव्हलपमेंट सर्व्हिसेस', 'मिशन पोषण २.०','सुपोषण अभियान' अशा योजनांची आखणी आहे. परंतु याही योजना नेहमीप्रमाणे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही. शहरी भागातील बालकुपोषण हे स्थलांतरित कुटुंबीयांच्या बालकांची संबंधित आहे.यातील बालके शाळाबाह्य आहेत. त्यामुळे शालेय पोषण आहाराचा कुठलाही लाभ यांना मिळत नाही.कुपोषणाच्या बाबतीत पोषण शिक्षण हे महत्त्वाची बाब आहे.मात्र त्याची पूर्तता सुलभ होणे जरुरीचे आहे. राज्यात एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महिला व बालकल्याण विकास विभागाच्या माध्यमातून अंगणवाडी योजना राबविण्यात येते.ही योजना मुख्यत्वे शून्य ते सहा वर्षे वयोगटातील बालकांच्या भौतिक, शारीरिक आणि सर्वांगीण विकासासाठी आहे.पोषणयुक्त आहार, लसीकरण,आरोग्य तपासणी, आरोग्य शिक्षण, औपचारिक शालेय शिक्षण केंद्रातून देण्याचा व्यापक प्रयत्न व्हायला हवा.राज्यातील कुपोषण मुक्तीसाठी काम करणाऱ्या ग्रामीण भागातील अंगणवाड्या आज स्वतःच्या इमारतीविना आहेत. समाज मंदिरात, पत्रांच्या शेडमध्ये, भाड्याच्या जागेत, तर कुठे उघड्या झाडाखाली सुद्धा भरतात. त्यात मोठी सुधारणा आज अपेक्षित आहे बाल कुपोषणाच्या समस्येवर मात करीत असताना कुपोषित बालकांच्या पालकांचे स्थलांतर थांबवले पाहिजे. कुपोषित बालकांच्या कुटुंबांचे विशेष सर्वेक्षण करून पुनर्वसन होणेही गरजेचे ठरते. कुपोषणाची समस्या ही निव्वळआरोग्याशी संबंधित नव्हे तर विकासाची आणि आर्थिक प्रगतीची समस्या आहे. त्यामुळे बाल कुपोषण नियंत्रणासाठी प्रामाणिक प्रयत्न होणे आवश्यक आहे.

**शशिकांत मधुकर तोटे**
**दारव्हा, जि. यवतमाळ**
**मो:९१३०८३५४५८**

## जागतिक लोकसंख्या दिन : शाश्वत भविष्यासाठी कृतीचे आवाहन

आज (११ जुलै रोजी), जग जागतिक लोकसंख्या दिन साजरा करत आहे, लोकसंख्येच्या गतिशीलतेमुळे निर्माण होणाऱ्या वाढत्या आव्हानांवर आणि परिवर्तनीय संधींवर खोलवर चिंतन करण्याचा हा दिवस. १९८९ मध्ये संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाने स्थापन केलेला हा दिवस अर्थव्यवस्थेपासून पर्यावरणापर्यंत जागतिक लोकसंख्या ट्रेंड आपल्या जीवनाच्या प्रत्येक पैलूला कसा आकार देतो याची एक महत्त्वाची आठवण करून देतो. २०२५ च्या जागतिक लोकसंख्या दिनाची कल्पना, 'तरुणांना निष्पक्ष आणि आशादायक जगात त्यांना हवे असलेले कुटुंब निर्माण करण्यासाठी सक्षम करणे', ही सर्व व्यक्तींना विशेषतः तरुणांना शिक्षण, आरोग्यसेवा आणि पुनरुत्पादक अधिकारांची उपलब्धता सुनिश्चित करण्याची निकड अधोरेखित करते. लोकसंख्येच्या दबावामुळे आपल्याला जटिल आव्हानांचा सामना करावा लागत असल्याने, ही कल्पना सरकारे, समुदायांना आणि व्यक्तींना न्याय्य आणि शाश्वत भविष्यासाठी अर्थपूर्ण कृती करण्याचे आवाहन करते.


जुलै २०२५ पर्यंत, जागतिक लोकसंख्या अंदाजे ८.२३ अब्ज इतकी असून , जी वार्षिक ०.८४३ दराने वाढत आहे. दररोज अंदाजे ३६२,७३७ जन्म आणि १७२,९७५ मृत्यू जगत होतात. भारताची लोकसंख्या सुमारे १.४६ अब्ज असून , जी जगाच्या एकूण लोकसंख्याच्या १७.७८३ आहे. भारताचा सध्याचा लोकसंख्या वाढीचा दर ०.८९३ आहे, जो या वर्षाच्या अखेरीस किंचित कमी होऊन ०.८८३ पर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. तज्ञांचा अंदाज आहे की २०६२ पर्यंत भारताची लोकसंख्या १.७० अब्ज पर्यंत पोहोचेल आणि त्यानंतर २१०० पर्यंत हळूहळू कमी होऊन १.५१ अब्ज होईल. यामध्ये २८.८ वर्षांच्या सरासरी वयासह, भारताची तरुण लोकसंख्या एक आव्हान आणि संधी दोन्ही सादर करते.

जागतिक लोकसंख्या दिन हा केवळ संख्येबद्दल नसून तो लोकांच्या आशा, आरोग्य, हक्क आणि भविष्याबद्दल बद्दल आहे .२१ व्या शतकातील आव्हानांना तोंड देत असताना, आपण प्रत्येक व्यक्तीला, विशेषतः तरुणांना त्यांचे जीवन घडवण्यासाठी स्वातंत्र्य आणि संसाधने मिळतील याची खात्री करणाऱ्या धोरणे आणि पद्धतींबद्दल आपली वचनबद्धता निश्चित करूया.

- प्रा. विजय कोष्टी,

# भारतातील लोकसंख्येचा विस्फोट आणि आव्हाने

**आज ११ जुलै. हा दिवस 'जागतिक लोकसंख्या दिन' म्हणून ओळखला जातो. त्यानिमित्ताने लोकसंख्येच्या बाबतीत जगात पहिल्या क्रमांकावर असणाऱ्या भारतातील लोकसंख्येचा विस्फोट, त्याचे आर्थिक-सामाजिक परिणाम आणि त्यावरील उपाययोजना यांचा आढावा...**



भारत हा जगातील सर्वाधिक तरुण लोकसंख्योचा देश असून, आपल्या देशाची लोकसंख्या ही क्षेत्रफळापेक्षा खूप जास्त वाढली आहे. त्यामुळे विकासाचे चक्र मंदावून समाजातील प्रत्येक नागरिकाला, घटकाला सुविधा देणे साहजिकच कठीण होते. विविध परिस्थितीमुळे प्रत्येकाला पुढे जाण्याची संधी मिळत नाही किंवा आवश्यक विकास साधणे शक्य होत नाही. त्यामुळे देशात संसाधनांचा अत्याधिक वापर, झोपडपट्टी, अस्वच्छ वातावरण, प्रदूषण, अशुद्ध हवा-पाणी, खालावलेले राहणीमान यांसारख्या समस्या निर्माण होतात आणि पुढे या समस्या इतर समस्यांना म्हणजे आर्थिक विषमता, भूक, कुपोषण, बेरोजगारी, महागाई, अमली पदार्थांचे व्यसन, गुन्हेगारी, भेसळ, भ्रष्टाचार यांसारख्या समस्यांना झपाट्याने वाढतात. लोक आपल्या स्वार्थानुसार जगू लागतात. नैतिकता, नीतिनियम, सामूहिक जबाबदारी, देशाप्रति कर्तव्याची भावना फक्त नावापुरतीच उरते. अन्नदाता शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबत नाहीत. प्रत्येक वर्गाच्या सर्वांगीण विकासासाठी सरकारी योजना, आयोग, कायदे, धोरणे, मंत्रालये, विभाग, संस्था असूनही लोक समस्यांशी झुंज देत आहेत. कारण, त्यांना आवश्यकतेनुसार योग्य सुविधा मिळत नाहीत. म्हणजे हेच बघा की, आपल्या देशाच्या अनेक राज्यांची लोकसंख्या ही जगातील अनेक विकसित देशांच्या लोकसंख्येपेक्षाही जास्त आहे.

देशात संपत्ती आणि उत्पन्नात बरीच असमानता आहे, जी सतत वाढत आहे. भारतातील संपत्ती असमानता दर्शवते की शीर्ष दहा टक्के लोकसंख्येकडे एकूण राष्ट्रीय संपत्तीपैकी ७७ टक्के हिस्सा आहे, देशातील ५३ टक्के संपत्ती सर्वात श्रीमंत एक टक्के लोकांकडे आहे. सर्वात गरिबीतील अर्ध्या लोकांकडे राष्ट्रीय संपत्तीचा फक्त ४.१ टक्के आहे. 'जागतिक विषमता अहवाल, २०२२' नुसार, शीर्ष दहा टक्के लोकांमध्ये एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५७ टक्के आहे आणि वरच्या एक टक्क्यांकडे राष्ट्रीय उत्पन्नाच्या २२ टक्के आहे. सर्वात खालचे ५० टक्केवाल्यांचा वाटा १३ टक्के राहिला. देशाच्या एकूण वस्तू आणि सेवाकराच्या जीएसटी रकमेपैकी सुमारे ६४ टक्के पैसा तळाच्या ५० टक्के लोकांकडून आला आहे, तर फक्त चार टक्के हा वरच्या दहा टक्के लोकांकडून आला आहे. 'एफएओ', 'आयएफएडी', 'यूनिसेफ', 'डब्ल्यूएफपी' आणि 'डब्ल्यूएचओ' यांच्या संयुक्त अहवालानुसार, जगातील ४२.१ टक्के लोकसंख्येला सकस पौष्टिक अन्न उपलब्ध नाही, तर भारतीय लोकसंख्येसाठी हा आकडा ७४.१ टक्के आहे. जगातील ९.२ टक्के लोकसंख्येच्या तुलनेत १६.६ टक्के भारतीय कुपोषित आहेत. जागतिक भूक निर्देशांकात १२५ देशांपैकी भारत १११व्या क्रमांकावर आहे, जे भूक तीव्रतेची गंभीर पातळी दर्शवते.

'ब्लूमबर्ग'चा 'नैटिक्सिस एसए'च्या अहवालानुसार, भारताला २०३० पर्यंत ११.५ कोटी नोकऱ्या निर्माण करण्याची गरज आहे, म्हणजेच दरवर्षी १.६५ कोटी रोजगार. २०३० पर्यंत जगात प्रत्येक पाचवा काम करणारा भारतीय असेल. अलीकडेच 'इन्स्टिट्यूट ऑफ ह्युमन डेव्हलपमेंट आणि इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन'ने 'इंडिया एम्प्लॉयमेंट रिपोर्ट २०२४' नावाचा अहवाल प्रसिद्ध केला, ज्यामध्ये असे म्हटले आहे की, भारत तरुणांच्या वाढत्या बेरोजगारीला झुंजत आहे. भारतातील बेरोजगार कर्मचाऱ्यांपैकी सुमारे ८३ टक्के तरुणांचा समावेश आहे आणि एकूण बेरोजगारीमध्ये माध्यमिक किंवा उच्च शिक्षण घेतलेल्या तरुणांचा वाटा २००० मधील ३५.२ टक्क्यांवरून २०२२ मध्ये ६५.७ टक्क्यांपर्यंत जवळपास दुप्पट झाला, असा अंदाज आहे. देशातील बेरोजगारीची स्थिती सर्वांनाच माहीत आहे. शिपाईपदासाठीही मोठ्या संख्येने उच्चशिक्षित आणि पीएचडी पदवीधारकदेखील अर्ज करतात. सरकारी उपाययोजना आणि धोरणे असूनही सामाजिक विषमता कायम आहे. 'डब्ल्यूएचओ' दर एक हजार लोकसंख्येमागे एक डॉक्टर आणि तीन परिचारिका असण्याची शिफारस करते, तर देशात दर एक हजार लोकसंख्येमागे ०.७३ डॉक्टर आणि १.७४ परिचारिका आहेत.

शासकीय विभागातील मोठ्या प्रमाणात पदे वर्षानुवर्षे रिक्त असल्याने बहुतांश विभागांमध्ये अनेक वेळा शासकीय आदेश व कामाचा बोजा पडतो आणि याचा फटका सर्वसामान्यांना सहन करावा लागत आहे. उदाहरणार्थ, वाहतूक पोलिसांच्या कमतरतेमुळे अनेक शहरांमध्ये सिग्नलवर वाहतूककोंडीची समस्या उद्भवते, म्हणजेच प्रत्येक सिग्नलवर वाहतूक पोलीस दिसत नाहीत, त्यामुळे बहुतांश वाहने सिग्नल तोडूनच जातात. अपघात झाल्यास वेळेवर मदत मिळत नाही. वाहतूककोंडीत रुग्णवाहिकांनाही निघायला जागा मिळत नाही, अशी काही ठिकाणी परिस्थिती.

काही ठिकाणी रस्ते खोदून सोडले असते, तर काही ठिकाणी रस्त्यावर कचऱ्याचे ढीग पडले असते. काही ठिकाणी गटारे उघडी असतोत, तर काही ठिकाणी पिण्याच्या पाण्याची नासाडी अव्याहत सुरु असते. काही ठिकाणी पथदिवे दिवसाही सुरूच असतात. कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे शिक्षण, आरोग्य, पोलीस, न्याय सर्वच क्षेत्रांत समस्या दिसून येत आहेत, त्यामुळे कामे प्रलंबित असतात. कामाचा दर्जा खालावतो आणि सर्वसामान्यांचे जीवन संघर्षमय बनते. अशा परिस्थितीत सत्तेतील लोक, अधिकारी, कर्मचारी स्वतःच्या स्वार्थासाठी पदाचा दुरुपयोग करण्याची शक्यता बळावते.

लोकसंख्येच्या तुलनेत सुविधा कमी आहेत आणि मागणीपेक्षा पुरवठा कमी झाला की दर्जा घसरतो, ही वस्तुस्थिती. शहरे आणि महानगरांतील लोकसंख्या दहा वर्षांत दुपटीने वाढली आहे. जर ग्रामीण भागाचा विकास झाला आणि तेथील लोकांना उत्तम शिक्षण, आरोग्य सुविधा आणि रोजगाराच्या चांगल्या संधी दिल्या, तर त्यांचे शहरांकडे होणारे स्थलांतर कमी होईल. वाढत्या लोकसंख्येमुळे सरकारी यंत्रणा, तंत्रज्ञान आणि नैसर्गिक संसाधनांवर दबाव येतो. लोकसंख्या नियंत्रण आणि कार्यक्षम प्रशासन असेल तरच प्रत्येकाला उत्तम शिक्षण, आरोग्य, रोजगाराच्या सुविधा मिळू शकतील, सर्व मुलांचे उत्तम संगोपन होईल, तरच प्रत्येकाचे जीवनमान सुधारेल. शासनाने निर्धारित वेळेत कामे पूर्ण करावीत, सर्वांना शिक्षणाप्रमाणे रोजगार मिळावा. प्रत्येक विभाग आणि क्षेत्र मजबूत करण्यासाठी दरवर्षी नोकरभरती व्हायला हवी. प्रत्येक घरात शिक्षणानुसार सरकारी नोकरी योजनेवर भर द्यावा. सर्व मोफत सरकारी योजना बंद कराव्या लागल्या तरी चालेल.

कारण, प्रत्येक कुटुंब स्वावलंबी होऊन आपल्या कुटुंबासाठी चांगले जीवनमान मिळवू शकते. जर शिपायापासून ते कलेक्टरपर्यंत, प्रत्येक सरकारी कर्मचारी, लोकप्रतिनिधी, नगरसेवक, आमदार, खासदार आणि सरकारमध्ये काम करणाऱ्या प्रत्येकाने सरकारी शाळा, कॉलेज, रेल्वे, बस, सरकारी हॉस्पिटल अशा सरकारी सेवांचा लाभ स्वत:साठी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी घेतला, तर त्यामुळे या विभागांचा आणि क्षेत्राचा झपाट्याने विकास होऊन गुणवत्ता वाढेल.

उदाहरणार्थ, मोठ्या नेत्यांच्या दौऱ्याच्या वेळी रस्ते रात्रभरात दुरुस्त होतात, सगळीकडे स्वच्छता दिसते. या विचाराने देशाला लवकरच नवसंजीवनी मिळू शकते. सरकारी यंत्रणा मजबूत, दर्जेदार, पारदर्शक आणि विकसित असावी. प्रत्येक नागरिकाच्या मूलभूत गरजा सहज पूर्ण झाल्या पाहिजेत. सरकारला पूर्ण सहकार्य करणे आणि धोरणात्मक नियमांचे पालन करणे ही जनतेची जबाबदारी आहे.

**डॉ. प्रितम गेडाम**
**मो.८२३७४१७०४१**

# ११ घरफोड्यांचे गुन्हे उघड दोन ताब्यात

■ प्रतिनिधी | अकोला ■

**अकोला शहरातील खदान पोलीस ठाणे हद्दीत झालेल्या ११ घरफोडी चोरीच्या गुन्ह्यांचा पर्दाफाश करण्यात खदान पोलिसांना यश आले असून, या प्रकरणात २ चोरट्यांना अटक करून एकूण १४,३२,५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. यात ११३ ग्रॅम सोने, २.९१० किलो चांदी, दोन मोटारसायकली आणि गुन्ह्यात वापरलेले हत्यारे यांचा समावेश आहे.**



✔ १४.३२ लाखांचा मुद्देमाल जप्त
✔ खदान पोलीसांची कारवाई

**हा मुद्देमाल करण्यात आला जप्त**

**११३ ग्रॅम सोने**
**– किंमत अंदाजे १०,१७,०००**
**२.९१० किलो चांदी**
**– किंमत २,६१,०००**
**दोन मोटारसायकली**
**– किंमत १,५०,०००**
**इतर साहित्य – ५००**

सविस्तर वृत्त असे की, २४ जून २०२५ रोजी फिर्यादी यज्ञेश माहेन जोशी (वय ३२, रा. केशवनगर, अकोला) यांनी खदान पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती की, ते काही कामानिमित्त बाहेरगावी गेले असता त्यांच्या अनुपस्थितीत अज्ञात चोरट्याने त्यांच्या घरातून ४७,२०० रुपयांचा ऐवज चोरीला नेल्याची माहिती दिली. यावरून खदान पोलीस ठाण्यात अप.क्र. ४३४/२०२५, कलम ३११(४), ३०५ बी.एन.एस अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचा तपास करत असताना पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे आरोपी शेख अहमद उर्फ आरिफ शेख (वय ४६, रा. भगतवाडी, डाबकी रोड, अकोला) आणि तेजस कैलास खोब्रागडे (वय ३२, रा. जुना तारफाईल, लेबर कॉलनी, अकोला) यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्यांनी खदान हद्दीतील एकूण ११ घरफोड्यांची कबुली दिली.ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मनोज केदारे, पोहेकॉ अमित दुबे, पोहेकॉ निलेश खंडारे, पोकॉ अभिमन्यू सदांशिव, आणि पोकॉ वैभव कस्तुरे यांच्या पथकाने केली आहे.

# अंगणवाडी सेविकेची नियुक्ती आर्थिक व्यवहार करून केल्याचा आरोप

## पिंपळखुटा येथील प्रकार : जिल्हाधिकाऱ्याकडे तक्रार

■ नासीर शेख ■




**पातूर :** पिंपळखुटा येथील अंगणवाडी क्रमांक १ मध्ये मदतनीस पदासाठी आर्थिक व्यवहार करून नियुक्ती करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. गावातील जया विठ्ठल तायडे, ज्योती राहुल देशमुख आणि ज्योती राजेश माडोकार यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि पातूर तालुक्याचे बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे ७ जुलै रोजी तक्रार सादर केली.

पिंपळखुटा येथील अंगणवाडी क्रमांक १ साठी मदतनीस पदाची जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर, गावातील एकूण ११ महिलांनी आपले अर्ज बाल विकास प्रकल्प अधिकारी समाधान राठोड यांच्याकडे सादर केले होते. या पदासाठी अर्जदार महिलांची शैक्षणिक पात्रता पाहून पारदर्शकपणे निवड होणे अपेक्षित होते. मात्र, तक्रारदार महिलांच्या मते, समाधान राठोड यांनी पात्रता न पाहता आर्थिक देवाणघेवाण करून निवड केली आहे.

यापूर्वी सुद्धा अशाच प्रकारे आर्थिक व्यवहार करूनच मदतनीसाची नियुक्ती झाली होती, असा गंभीर आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. त्यामुळे यावेळी सर्व अर्जदारांच्या अर्जाची योग्य प्रकारे छाननी करून, तक्रारदारांच्या समक्ष चौकशी व्हावी अशी मागणी करण्यात आली आहे. या प्रकारामुळे गावात संताप व्यक्त होत असून, संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**समिती गठीत करून चौकशी करा!**

पातुरचे बाल विकास प्रकल्प अधिकारी समाधान राठोड यांनी शिक्षणाची अट डावलून आर्थिक व्यवहार केल्याचा आरोप गंभीर स्वरूपाचा आहे. त्यामुळे याप्रकरणी तात्काळ उच्चस्तरीय समिती गठीत करून सखोल चौकशी करावी व दोषींवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी तक्रारदारांनी केली आहे.

**बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांचा नो रिस्पॉन्स**

या प्रकरणी समाधान राठोड यांची प्रतिक्रिया घेण्याचा वारंवार प्रयत्न करण्यात आला. मात्र, त्यांच्या मोबाईलवर संपर्क साधूनही त्यांनी फोन उचलण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे त्यांनी या गंभीर प्रकरणात त्यांच्याकडून नो रिस्पॉन्स असल्याचे समजते.

# टिळक पार्क योग परिवारातर्फे गुरुपौर्णिमा महोत्सव उत्साहात साजरा



■ प्रतिनिधी | अकोला ■

पतंजली योग समितीच्या वतीने टिळक पार्क, रामदास पेठ येथे गुरुपौर्णिमा महोत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिभावात साजरा करण्यात आला. यावेळी विशेष रूपाने गायत्री महायज्ञ व होमहवन देखील आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. दीपप्रज्वलन डॉ. सुहास काटे, हरीशभाई माखीजा, हरीशभाई पारवानी, आणि प्रदीप खाडे यांच्या हस्ते संपन्न झाले. सकाळी ६.०० ते ६.३० या वेळेत योग प्राणायाम सत्र घेण्यात आले. त्यानंतर पारंपरिक पद्धतीने गायत्री महायज्ञ, होमहवन व गुरुपूजन पार पडले.

यानंतर गुरुजनांचा सन्मान करण्यात आला. डॉ. सुहास काटे, हरीशभाई माखीजा, हरीशभाई पारवानी, डॉ. सुनिता कावळे, सुरेश दरेकर, श्रीकांत चाळीसगावकर, डॉ. राजेश भोंडे, डॉ. सुरेश राठी, डॉ. ऋषिता मुनोत, अशोक राऊत, प्रदीप बांधवकर, नलिनी वानखेडे, क्षितिजा वडी यांचा शाल, श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन गौरव करण्यात आला.

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जिल्ह्यात पतंजलीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या १२५ योग शिबिरात सहभागी झालेल्या योग साधकांना प्रमाणपत्र देऊन प्रोत्साहित करण्यात आले. या कार्यक्रमाला जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष नारायण अंधारे, ना. मा. मोहोळ, राम बिरकड, चंद्रकांत कुलकर्णी, संध्याताई संगवई आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी त्यांनी डॉ. सुहास काटे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. कार्यक्रमानंतर गुरुपूजन, गुरुदक्षिणा व प्रसाद वितरणाचा कार्यक्रम संपन्न झाला. शांतीपाठाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन नलिनी वानखेडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. सुहास काटे (पतंजली जिल्हा प्रभारी), हरीश पारवानी (जिल्हा सहप्रभारी), हरीश माखीजा (भारत स्वाभिमान जिल्हा प्रभारी), डॉ. सुनिता कावळे, प्रदीप खाडे, श्रीकांत चाळीसगावकर, अशोक राऊत, क्षितिजा वडी, तसेच टिळक पार्क योग ग्रुपचे सर्व सदस्य आणि महिलांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे छायाचित्रण किशोर बांधवकर यांनी केले. डॉ. सुहास काटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले तर अशोक राऊत यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रमात सहभागी झालेल्या महिलांमध्ये नलिनी वानखेडे, क्षितिजा वडी, डॉ. ऋषिता मुनोत, सीमा फडणवीस, रुपल दोशी, रेणुका मेश्राम, विशाखा राजे, समृद्धी शिरवळकर, वैशाली मावळे, ममता जेरपोतवार, वनिता गवई, साधना मुक्कावार, मीना पहारिया यांच्यासह अनेक महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

# ब्रिलियंट चेस अकादमीचा खेळाडु शर्व कोलवाडकर याचा सन्मान

**अकोला :** स्थानीय ब्रिलियंट चेस अकादमीचा खेळाडु शर्व कोलवाडकर याचा संत गाडगे बाबा अमरावती विद्यपीठचे कुलगुर डॉ बाराहाते यांनी नुकताच सन्मान केला.

शर्व शंशाक कोलवाडकर याने आपल्या उत्कृष्ट बुध्दिबळ खेळाचे प्रदर्शन करीत संत गाडगेबाबा अमरावती विधापीठाच्या संघात आपले स्थान निश्चित केले. त्याची निवड भोपाळ येथे होणाऱ्या वेस्ट झोन आंतर विद्यापीठ बुद्धिबळ चैम्पियनशिप साठी झाली.भोपाळ येथे झालेल्या स्पर्धेत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संघाने आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करुन वेस्ट झोन मधुन प्रथम क्रमांक मिळविला.

# बांधकाम विभागाच्या काम वाटप समितीची सभा रद्द ?

## वंचितचा गोंधळ : कामे वाटपात अनियमिततेचा आरोप

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या काम वाटप समितीची सभा गुरुवारी सकाळी आयोजित करण्यात आली होती, मात्र सदर सभा सुरू होण्यापूर्वीच रद्द करण्यात आल्याने जिल्हा परिषद वर्तुळात खळबळ उडाली. विशेष म्हणजे कामे वाटपात प्रशासक राज मध्ये अनियमितता होत असल्याच्या आरोप वंचित बहुजन आघाडीने करीत संविधान सभागृह ( सभास्थळी ) परिसरात गोंधळ घातला होता.

गेल्या अनेक दिवसांपासून जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागात अधिकारी - कर्मचारी वर्गाचा मनमानी कारभार सुरू असल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे. या प्रकरणी यापूर्वीही जिल्हा परिषदेच्या नवनिर्वाचित मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांच्या दालनात बांधकाम विभागाच्या बेताल कारभारावर प्रकाश टाकत तक्रारींचा पाढा वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच कंत्राटदार वर्गाने वाचला होता. त्यानंतर ही मात्र बांधकाम विभागाच्या निगरगट्ट अधिकारी वर्गाची मनमानी सुरूच राहिली. गुरुवारी बांधकाम विभागाचे काम वाटप समितीची सभा संविधान सभागृह येथे आयोजित करण्यात आली होती. मात्र सदर सभा सुरू होण्यापूर्वीच स्थगित करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. या सभास्थळी वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी गोंधळ घालत काम वाटप समितीच्या सुरू असलेल्या गैरकारभारावर ताशेरे ओढले. तर यानंतर संपूर्ण प्रकार अतिरिक मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके यांच्या दालनात कामे वाटप समिती कश्याप्रकारे अनियमितता करीत आहे याचा संपूर्ण पाढाच वाचण्यात आला. यावेळी समिती सदस्यांची अर्थात अधिकारी कर्मचारी वर्गाची चांगलीच कोंडी झाली होती. या गंभीर प्रकरणी कार्यकारी अभियंता प्रकाश इंगळे यांना प्रतिक्रिया घेण्यासाठी संपर्क साधला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

**अती. मुकाअ ठमके यांनी प्रकाश इंगळे यांना खडसावले**

या कामे वाटप समितीची सभा स्थगित झाल्याने मोठी खळबळ उडाली असून याप्रकरणी वंचितच्या पदाधिकाऱ्यांनी बांधकाम विभागाच्या गैर कारभारावर ताशेरे ओढताच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके यांनी चांगलेच खडसावत धारेवर धरले. यावेळी अधिकारी - कर्मचारी यांना आता तरी सिरियस व्हा असा सल्ला देत यापुढे थेट निलंबनाची कारवाई करण्याचा इशारा सुद्धा दिला असल्याची चर्चा आहे.

**मलाईची कामे टेबलाखाली लपली**

बांधकाम विभागाच्या काम वाटप समितीने वाटप करण्यात येणारे कामांची यादी सादर करताच त्यामध्ये अत्यल्प कामांचा समावेश होता. विशेष म्हणजे ही सर्व कामे अंदाजित दोन लक्ष रुपयांच्या आतमधील होती. तर यावेळी कुठल्याही प्रकारची मोठ्या कामांचा यामध्ये समावेश करण्यात आला नाही. परिणामी ही कामे बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी टेबलाखाली लपविली असल्याची मिश्किल टीका यावेळी उपस्थितांनी केली होती.

# कावड यात्रा शांततेत पार पडण्यासाठी मंडळांनी सहकार्य करावे - जिल्हाधिकारी

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यातील कावड पालखी यात्रेला थोर वैभवशाली परंपरा आहे. या पवित्र यात्रेसाठी भाविकांना आवश्यक सर्व सुविधा प्रशासनाकडून देण्यात येतील. या उत्सवाचे पावित्र्य टिकविण्यासाठी आणि तो शांततेत पार पाडण्यासाठी आवश्यक शिस्तीचे पालन करून मंडळांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे केले.

श्रावण महिन्यातील कावड यात्रेच्या नियोजनाबाबत विविध कावड मंडळांच्या प्रतिनिधींची बैठक जिल्हाधिकारी श्री. कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली नियोजनभवनात झाली, त्यावेळी ते बोलत होते. पोलीस अधिक्षक अर्जित चांडक, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, महापालिका आयुक्त सुनील लहाने, निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील, विविध विभागाचे अधिकारी व मंडळांचे पदाधिकारी, प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. कुंभार म्हणाले की, कावड यात्रेच्या मार्गाची पाहणी करण्यात आली आहे. यात्रेत भाविकांची कुठलीही गैरसोय होणार नाही याची दक्षता प्रशासनाकडून घेतली जाईल. पथदिवे, ठिकठिकाणी पेयजल, मोबाईल, स्वच्छतागृहे, रूग्णवाहिकेसह वैद्यकीय पथके, घाटाच्या ठिकाणी आवश्यक सोयी, रस्त्यांची दुरूस्ती, वाहनतळ आदी सुविधा निर्माण केल्या जातील. यात्रेत कुठलाही अनुचित प्रकार घडता कामा नये. हा वैभवशाली उत्सव अधिक उंचीवर नेण्यासाठी व सामाजिक सलोखा राखण्यासाठी मंडळ व शिवभक्तांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

पोलीस अधिक्षक श्री. चांडक म्हणाले की, यात्रेचा मंदिर परिसरातील प्रवेशाचा व बाहेर पडण्याचा मार्ग वेगवेगळा असावा, ही बाब विचाराधीन आहे. जेणेकरून एकाच वेळी गर्दी न होता भाविकांना वेळेत जलाभिषेक, दर्शन घेणे शक्य होईल. याबाबत सविस्तर चर्चा करूनच निर्णय घेतला जाईल.

सर्व मंडळांनी नियमांचे पालन करावे. कुठलीही अनुचित घटना घडू नये म्हणून पोलीसांकडून मार्गावर चोख बंदोबस्त ठेवण्यात येईल. भाविकांसाठी आवश्यक सुविधा निर्माण केल्या जातील. घाटासह सर्व प्रमुख ठिकाणी पुरेशा प्रकाशासाठी हॅलोजन दिवे, वॉच टॉवर, सुरक्षिततेसाठी मार्गावर सीसीटीव्ही यंत्रणा, आवश्यक तिथे ड्रोनचा वापर आदी बाबींची पूर्तता केली जाईल.

सर्वांनी यात्रेचे पावित्र्य राखणे गरजेचे आहे. व्यसनींवर, तसेच शस्त्र बाळगणा-यांवर कडक कारवाई करण्यात येईल.

# खिस्ती समाजाकडून आमदार पडळकरांचा तीव्र निषेध

■ प्रतिनिधी | अकोला ■



✔ पडळकरांना अटक करून राजीनाम्याची मागणी
✔ जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांना निवेदन सादर

सांगलीत १५ जून रोजी हिंदू जन आक्रोश मोर्चात आमदार गोपीचंद पडळकर यांनी ख्रिस्ती धर्मगुरूंना मारहाण करण्याचे व जिवे मारण्याचे खुले आवाहन करीत ११ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्रभर संतापाची लाट उसळली आहे. त्यांच्या या बेताल वक्तव्याचा निषेध करीत गुरुवार, दिनांक १० जुलै रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास अकोला जिल्ह्यातील समस्त ख्रिस्ती समाजाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना व पोलिस अधीक्षक यांना निवेदन सादर करण्यात आले. यामध्ये पडळकर यांनी ख्रिस्ती धर्मियांच्या भावना दुखावल्यामुळे त्यांना अटक करून त्यांचा राजीनामा घेण्याची मागणी जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

ख्रिस्ती समाज शांततेचा पुरस्कार करणारा असून, संविधानाने दिलेल्या धार्मिक स्वातंत्र्याच्या अधिकाराचे पालन करणारा आहे. मात्र आमदार पडळकर यांच्या द्वेषमूलक वक्तव्यामुळे ख्रिस्ती धर्मगुरुंच्या जीविताला आणि प्रार्थनास्थळांच्या सुरक्षिततेला गंभीर धोका निर्माण झाला आहे, अशी चिंता ख्रिस्ती शिष्टमंडळाने प्रसार माध्यमांसोबत बोलताना व्यक्त केली. निवेदनात पुढे म्हटले आहे की, भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र असून, संविधानाच्या कलम १४, १५, २५, २६ नुसार प्रत्येक नागरिकाला समानता व धर्मस्वातंत्र्याचे हक्क आहेत. मात्र पडळकर यांचे विधान संविधानाची पायमल्ली करणारे असून, ते समाजात तेढ व हिंसाचाराला चिथावणी देणारे आहे. त्यामुळे आमदार पडळकर यांच्यावर तातडीने गुन्हा दाखल करून अटक करावी, तसेच त्यांची आमदारकीही रद्द करावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्यपाल, मुख्यमंत्री, गृहमंत्री, विधानसभा अध्यक्ष, पोलीस अधीक्षक अकोला खासदार, आमदार आदींना पाठविण्यात आलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी डॉ. प्रमोद इंगळे, रेव्ह. राहुल हिवरे, रेव्ह. देवदत्त गायकवाड, रेव्ह. सतिश नंदा, पास्टर दिलीप सरदार, ब्रदर देवानंद साळवे, पास्टर उनिल लोणारे, अ?डव्होकेट नहशोन बिरपाल, प्राचार्य अर्पणा डोंगरे, रेव्ह. मोजेस वानखडे, पास्टर संतोष डोंगरे, पास्टर विनोद हातोले, ब्रदर स्टनली जॉन, ब्रदर स्वरूप घाडगे, प्रिन्सिपल अनुल मनवर, ब्रदर अशोक जामनिक, ब्रदर बेदन सावडा, रेव्हरंड निलेश अघमकर, जेम्स स्वामी, तुषार मडामे, रूबेन वाळके, सुवर्णा प्रधान, सरला वरघट यांच्यासह शेकडो ख्रिस्ती बंधू भगिनी उपस्थित होते.

**Change In Name**

I Have Change My Name
----From----
**HIMANSHI MANOJKUMAR VASTANI**
------TO------
**HIMANSHI PURVESH SANGANI**
My Passport No Is - B8106111 My Residential Address is - At. Ashirwad Bombay dying Main road Murtizapur Akola 444107.

**Change In Name**

I HAVE CHANGE MY NAME SUM SPELLING MISTEK MY OLD NAME **(MOHAMMED AJAZ GULAM JEELANI)** AND MY CORRECT NAME SPELLING **(MOHAMMAD AIJAZ GULAM JEELANI)**
ADDRESS CORRECTION
I HAVE CHANGE MY ADDRESS FROM (MASTAN HOUSE INDIRA NAGAR MASTAN BOMBAY WALE HOUSE AKOT FILE AKOL 444003) AND MY NEW ADDRESS (INDRA NAGAR NEAR HUSENIYA MASJID AKOT FILE AKOLA 444003)
PASSPORT NUMBER: L2583478
FILE NUMBER : NG1070994471613

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक २२६**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

**जाहीर नोटीस**

**विदयमान सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) बाळापूर यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०८/२०२५ प्रोसेस नं.७४७/२०२५
चौ.ता. ०२/०९/२०२५

**अर्जदार :** १.शांताराम उकर्डा भाकरे वय अं. ६६ वर्ष धंदा मजुरी २ . गजानन उकर्डा भाकरे - मयत २अ.वनिता गजानन भाकरे वय अं. ५७ वर्ष धंदा गृहिणी २ ब . प्रविण गजानन भाकरे वय अं. ३३ वर्ष धंदा मजुरी २क.अरूण गजानन भाकरे वय अं. ३७ वर्ष धंदा मजुरी रा.गट कं.१०१ सांगुर्डी फाटा येलवाडी पुणे ता. जि. पुणे. ३. विष्णु उकर्डा भाकरे वय अं. ५८ वर्ष धंदा शेती ४. संजय उकर्डा भाकरे वय अं. ५३ वर्ष धंदा शेती अर्जदार कं.१,२अ,२ब, ३ व ४ रा. देगाव ता. बाळापुर जि. अकोला ५. मिरा शिवाजी ठाकरे वय अं.४९ वर्ष धंदा गृहिणी रा. देउळगाव ता. पातुर जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. मयत तुळसाबाई काशिराम फाळके हया दिनांक ०१.०१.२००२ रोजी मौजे वाडेगाव ता. बाळापुर जि. अकोला येथे मरण पावले. वरील नमुद सर्व अर्जदार यांना मयत तुळसाबाई काशिराम फाळके यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय व ईतर लाभाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वत: अथवा वकीलामार्फत दिनांक ०२.०९.२०२५ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक १६.०४.२०२५ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का

**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय, क स्तर, बाळापुर

**जाहीर नोटीस**

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११७९/२०२५ प्रोसेस नं.१०७१८/२०२५
चौ.ता. २०/०८/२०२५ दिनांक : ०७/०७/२०२५

**अर्जदार :** १. रामकृष्ण शिवराम ताले रा. व्दारा गोपाल खंडेलवाल, गीताई, खदान चौक, आळशी प्लॉट, एन. सी. सी. ऑफिस समोर, अकोला. २. अनुराधा सुधाकर कानकिरड रा. व्दारा सुधाकर कानकिरड, गायगांव अकोला. ३. बाळकृष्ण शिवराम ताले रा. मु. निंबी. पो. निंबी मालोकार, ता. जि. अकोला. ४. अलका निळकंठ काकड रा. व्दारा. निळकंठ काकड, मु. मांगुळ ता. बार्शीटाकळी, दगडपार्वा, अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. शिवराम सदाशिव ताले २. गीताबाई शिवराम ताले
**पत्ता :-** रा. दोघेही रा. लाखनवाडा, ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शिवराम सदाशिव ताले यांचे दि. २१/०७/२०२० रोजी लाखनवाडा ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत गीताबाई शिवराम ताले यांचे दि.१५/११/२०२४ रोजी लाखनवाडा ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २०/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०९८/२०२५ प्रोसेस नं.१०४१०/२०२५
चौ.ता. ०६/०८/२०२५ दिनांक : ०४/०७/२०२५

**अर्जदार :** १.श्रीमती कांता बळीराम खंडारे रा. वरोडी अंबादेवी बु. सांगळूद ता. जि. अकोला २. श्रीमती प्रतिभा गंगाधर खंडारे रा. समृद्धी रो हाउस, शारदा नगर, मलकापूर, अकोला. ता. जि. अकोला ३. सौ. दिपाली प्रतिक जाधव रा. श्रीकृपा बिल्डींग, हाउस नं १०१ / ए, मु. मंथा पो. खोपोली, जि. रायगड ४. ऋषिकेश गंगाधर खंडारे रा. वरोडी. ता. जि. अकोला ५. संस्कृती गंगाधर खंडारे रा. समृद्धी रो हाउस, शारदा नगर, मलकापूर, अकोला. ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : गंगाधर बळीराम खंडारे
**पत्ता :-** रा. समृद्धी रो हाउस, शारदा नगर, मलकापूर, अकोला. ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत गंगाधर बळीराम खंडारे यांचे दि. ०९/०७/२०२२ रोजी मेडिकल हॉस्पिटल इंदौर ता. जि. इंदौर येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०६/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०४/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# शासकीय यंत्रणेच्या नावावर वहिवाटीचा रस्ता बंद करण्याचा घाट

## नायब तहसीलदारांनी चुकीचा आदेश काढल्याचा`आरोप

**सिंदी/जनमाध्यम**

लगतच्या मौजा दिग्रज शिवारातील एकाच परिवारातील एकाच शेतजमीनीत एका भावाच्या समोरील शेतातुन दुसऱ्या भावाच्या शेतात जाण्यासाठी असलेल्या पुर्वा पार रस्ता भावाचा हिस्सा विकत घेणाऱ्या श्रीमंत शेतकऱ्यांने शासकीय यंत्रणेला हाताशी धरून बंद करण्याचा घाट घातला आहे.तसा मनाई हुकुमाचा आदेशच नायब तहसीलदार ठाकरे यांनी हात ओले करुन काढल्याचा गंभीर आरोपच अन्यायग्रस्त शेतकरी साठोने यांनी केला आहे.



सविस्तर वृत्त असे की,लगतच्या दिग्रज शिवारात साटोने परिवाराची शेत सर्वे क्रमांक १४८ ही शेती आहे. या वडीलोपार्जीत शेताची दोन भावात वाटणी झाल्याने आनंदराव साटोने १४८/१ आणि विनायक साटोने १४८/२ असे दोन सातबारे तयार झाले. इ.स. २००४ घ्या वाटणीपत्रानुसार आनंदराव साटोने यांनी पाव एकर जमीन जास्त घेत आपल्या शेतातुन आपला भाऊ विनायक साटोने यांचा गोव्यावर आणि विहीरीवर जाण्याचा पुर्वापार पासुन असलेला रस्ता नेहमीसाठी कायम ठेवण्याचे वाटणी पत्रात नमुद केले आहे मात्र आनंदराव साटोने यांनी आता आपले शेत नागपुर निवासी श्रीमंत शेतकरी अग्रवाल यांना विकल्याने अग्रवाल यांनी शासकीय यंत्रणेला हाताशी धरून विनायक साटोने यांचा वडीलोपार्जीत शेतात जाण्याचा कायमस्वरूपी रस्ता बंद करण्याचा घाट घातला आहे.

विभागाचे नायब तहसीलदार मधुकर ठाकरे यांनी याबाबतचे सर्व पुरावे नाकारीत हात ओले करीत श्रीमंत शेतमालकाची बाजु घेत एकतर्फी वहीवाटीच्या रस्त्याचा वापर करण्याचा मनाई हुकुमचा आदेशच काढल्याचा अन्यायग्रस्त शेतकरी विनायक साटोने यांनी गंभीर आरोप केला आहे.एकीकडे महसूल मंत्री बावनकुळे साहेब शेतवहीवाटीचा रस्ता अडविणाऱ्यावर सरळ गुन्हे दाखल करण्याचे महसुल विभागाला आदेश दिले आहेत आणि येथे मंत्री महोदयांच्या आदेशाला पादळीतुडवित शेतकऱ्यांचा कायमस्वरूपी रस्ता बंद करण्याचा घाट घालीत आहे.कुंपनच शेत खाण्याचा काहीसा प्रकार येथे पाहायला मिळत आहे.याबाबत अन्यायग्रस्त शेतकरी विनायक साटोने यांनी उपविभागीय अधिकारी वर्धा यांच्याकडे प्रकरण दाखल केले असुन नायब तहसीलदार यांच्या रस्ता बंद करण्याच्या आदेशाला स्थंगनादेश मिळाल्याचे विनायक साटोने यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.


---

## खासदार आमदार साहेब..लक्ष देणार का?

### ग्रामस्थांना जीव मुठीत धरून रस्त्याने करावे लागते मार्गक्रमण

**साहूर/जनमाध्यम**

गेल्या अनेक वर्षापासून बोरगाव झाडगाव टूमनी या रस्त्याचे खस्ता हाल झाले असून हा चार ते पाच किलोमीटरचा रस्ता मातीचा असल्याने पाऊस येताच हा रस्ता ‘मौत का कुवा’ बनतो. परिणामतः पावसाळ्यात येथील नागरिकांना जीव मुठीत धरून या रस्त्याने मार्गक्रमण करावे लागते. मात्र, निगरगट्ट लोकप्रतिनिधी व बांधकाम विभागाचे वरिष्ठ अधिकारी कुंभकर्णी झोपेत असून त्यांना नागरिकांच्या हाल अपेष्टांचे काहीच देणे घेणे नसल्याचे दिसून येते हा रस्ता पाऊस येताच अजिबातही चालण्याजोगा नसल्याने या रस्त्याचे बांधकाम ताबडतोब करून आमच्या समस्या निकाली काढाव्या अशी मागणी येथील नागरिकांनी केली आहे.



झाडगाव टूमनी ही गावे दुर्गम भागात जंगलालगत असून इथे शिक्षण आरोग्य सेवेसह इतर कुठलीही सुविधा नसल्याने त्यांना सर्व कामासाठी दररोज साहूर येथेच यावे लागते परंतु हा रस्ता मातीचा असल्याने पाऊस येताच या रस्त्यावर दलदल निर्माण होऊन पाण्याचे भले मोठे डबके साचते पादचाऱ्यासह वाहनधारकांना जीव मुठीत घेऊन साचलेल्या पाण्यातून व चिखलातून वाट काढावी लागते.

`या चिखलमय रस्त्यावरून अनेक वाहनधारक गाडी स्लिप होऊन पडत असून जखमी झाले आहेत. मोटर सायकल चालविताना कीचड दोन्ही टायरच्या मरगाळमध्ये जाऊन फसतात त्यामुळे टू व्हीलर वाहने मातीमुळे जाम होऊन पुढे सरकत नसल्याने अनेक वाहनधारकांनी आपल्या वाहनाचे चाकावरील मरगाड (कव्हर) काढून ठेवल्याचे सांगण्यात येते. मात्र अजूनही बांधकाम विभागाने या रस्त्यावर मुरूम टाकून रस्त्याची दुरुस्त केलेली नाही येथील नागरिकांनी अनेक वेळा या रस्त्याबाबत लोकप्रतिनिधी सह बांधकाम विभागाकडे तक्रारी दिल्या मात्र त्याकडे हेतू पुरस्कर सर्वांचे दुर्लक्ष होत आहे. झाडगाव टूमनी हे दुर्गम भागात गावे असून येथे आदिवासी बांधव जास्त राहतात येथील सर्व नागरिक अत्यंत गरीब असून त्यांचा शेती व मोलमजुरी हाच व्यवसाय आहे. गावात शिक्षणाची आरोग्याची सुविधा नसल्याने तेथील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी बोरगाव व साहूर येथे यावे लागते तर अनेक वृद्ध नागरिक आजारी पडल्यावर त्यांना उपचारासाठी साहुरला यावे लागते. मात्र, या रस्त्याने वाहन जात नसल्याने आजारी अवस्थेत सुद्धा तेथील नागरिकांना या रस्त्याने चिखल तुडवत पायी प्रवास करावा लागतो एवढी भयावह परिस्थिती या रस्त्याची झाली आहे. केवळ या रस्त्यामुळे अनेक रुग्णांना वेळेवर दवाखान्यात पोहोचता आले नसल्याने उपचार व औषधाअभावी आपला जीव गमवावा लागला तरी या निगरगठ्ठ व माणुसकी हिन लोकप्रतिनिधींना व अधिकाऱ्यांना त्याचे काहीच सोयसतूक नसून ते नागरिकांच्या जीवितासी खेळत असल्याच्या प्रतिक्रिया येथील नागरिक व्यक्त करीत असून निवडणूक येताच आम्हाला मताची भीक मागणाऱ्या खासदार, आमदार साहेब या रस्त्याकडे लक्ष देणार का? असा प्रश्न ग्रामस्थांनी केला आहे.

---

## बोरखेडी येथे पुलाच्या अपुर्ण बांधकामामुळे वाहतुकीचा खोळंबा

### रस्त्यावर पाणीच पाणी असल्याने चार तास वाहतूक प्रभावीत

**आष्टी (शहीद) जनमाध्यम**

तालुक्यातील आष्टी ते पार्टी-कारंजा (घा.) मार्गावर रस्त्यावर खडीकरणचे काम पूर्ण झाले असून, काही ठिकाणी पुलाचे काम अजूनही पुर्ण झाले नाही. दोन दिवसापासून सुरु असलेल्या पावसात बोरखेडी गावाजवळ असलेल्या पुलाच्या अपुर्ण कामामुळे शेतातील वाहून जाणारे पाणी अडून शेती सोबत पूल ही पाण्याखाली होता. त्यामुळे वाहतूक चार तास खोळंबून, नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागला.

आष्टी ते बोटोना - पार्डी - कारंजा मार्गावर काही भागात गिट्टी टाकण्यात आली आहे तर काही ठिकाणी दबाई न केल्याने रस्त्यावर चिखल निर्माण होऊन दुचाकी रस्त्यावर रुतून किरकोळ



अपघात होणे सुरु झाले आहे. गेल्या दोन तीन दिवसापासून पाऊस सुरु असल्यामुळे या मार्गावर काम करण्यात सततच्या पावसामुळे खोळंबा निर्माण झाला होता.अर्धवट सुरु असलेल्या पुलाच्या बांधकामत पोहोच मार्ग पाईप न टाकता काढला त्यामुळे शेतात साचणारे पाणी पुलाजवळ जमा होऊन तलावाची स्तिती निर्माण झाली. पोहोच मार्ग हा पाण्याखाली जातात वाहतूक ठप्प झाली.

या घटनेची माहिती आष्टी येथील सार्वजनिक बांधकाम विभागातील उपविभागीय अभियंता पठाण व शाखा अभियंता नासरे यांना तहसिलदार महोदया यांनी देताच दोन्ही अभियंत्यांनी बोरखेडी गाव गाठले आणि रस्ता मोकळा करण्यासाठी दोन जेसीबी यंत्र लावून पोहोच मार्ग खोदून त्या ठिकाणी पाईप टाकले व खोळंबलेली वाहतूक सुरळीत सुरु केली. या मार्गावर चिखल असल्यामुळे दुचाकी स्लिप होऊन घसरत आहे. अपघात होऊ नये यासाठी या मार्गावर बारीक चुरी टाकावी अशी मागणी यावेळी लोकांनी केली. इतकेच नव्हे तर टाकलेल्या गिट्टीवर रोलर सुध्दा फिरवावा अशी मागणी यावेळी नागरिकांनी केली. पुलाच्या कामाला पाणी अडून पाणी शेतात घुसून शेत पिकाचे नुकसान झाले. शेतात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांनी तहसीलदार आष्टी यांच्या कडे नुकसान भरपाई मिळावी अशी लेखी तक्रार देऊन अपेक्षा केली आहे.

---

## तथागत बुद्धांनी प्रथम धम्म उपदेश आषाढी पौर्णिमेला केला-भजंत डॉ. राजरत्न

### धम्मप्रिय बुद्ध विहारात वर्षावास प्रारंभ

**वर्धा/जनमाध्यम**

धम्मप्रिय अशोक सम्राट नगरी परिसर अंबानगर येथील धम्म प्रिय बुद्ध विहारात आषाढ पौर्णिनिमे पासून वर्षावास सुरू झाला. बुद्ध धम्मात आषाढी पौर्णिमेला विशेष महत्त्व आहे. तथागत बुद्धांना आषाढ पौर्णिमेला संबोधी प्राप्त झाली.त्यांनी प्रथम धम्म उपदेश आषाढी पौर्णिमेला केला जगातील प्रथम गुरु तथागत गौतम बुद्ध आहेत. कारण त्यांनी अखिल मानव जातीला दुःख मुक्तीचा मार्ग दाखविला. तथागत बुद्धाच्या काळात तीन महिने एकाच विहारात थांबून तथागत बुद्ध तथा भंतेजी धम्म उपदेश कराचे तेव्हापासून आषाढी पौर्णिमा असून वर्षावास सुरू होतो. आषाढी पौर्णिमेला तथागत बुद्धाने प्रथम धम्म उपदेश केला. हा वर्षावास तीन महिने विहारात चालणार आहे असे विचार भदंत डॉ. राजरत्न यांनी व्यक्त केले.



यावेळी प्रसंगी विशाल मानकर, सुहास थुल, मिरज ताकसांडे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर, डी.के.पाटील, चरण हरले, मुकुंद नाखले, सुनील ढाले, प्रा. शैलेंद्र निकोसे, एड.विकास साठे वंदना पाटील, एड. वर्षा थुल, ॲड. ज्योती कोमलकर , पंचशीला बोरकर, अर्चना पाटील, सुजाता लोहोकरे, हरीका ढाले, माधुरी सोनटक्के, प्रणोज बनकर विपिन नगराळे अंबा नगर मधील बौद्ध उपासक उपासिका उपस्थित होते.

---

## विरुळ येथील प्रवासी निवाऱ्याची दुर्दशा

### विद्यार्थ्यांना व नागरिकांना उभे राहावे लागते भर पावसात

**विरूळ (आ)/जनमाध्यम**

जिल्ह्यातील शहरी भागातील बसस्थानक करोडो रुपये खर्च करून चकचकीत बनविण्यात आले परंतु ग्रामीण भागातील उभे असलेले प्रवाशी निवारे मात्र शेवटची घटका मोजतांना दिसत आहे. वर्धा जिल्ह्यातील अनेक गावात प्रवाशांना बस



येण्याची वाट रस्त्याच्या कडेला उभे राहून बघावी लागते.यासाठी प्रवाशांची सोय व्हावी यासाठी जिथे बस जाईल तिथे प्रवाशी निवाऱ्याची सोय केली परंतु हे निवारे काही दिवसात कोसळुन पडल्याने प्रवास करताना प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. विरुळ बसस्टॉपच्या निवाऱ्याच्या भिंती कोसळल्या तर वरचे छप्पर उडाले खिडक्या दारे तुटले तसेच आजूबाजूला घाणीचे साम्राज्य दिसून येत आहे, त्यामुळे हे बांधलेले निवारे धुळखात पडून असल्याने प्रवाशांना व विद्यार्थ्यांना बसची वाट भर पावसाळ्यात रोडवर उभे राहावे लागत आहे.या जिर्ण झालेल्या निवाऱ्यात आता मोकाट कुत्र्यांचा वावर असतो. शासनाने लाखो रुपये खर्च करून हे निवारे बांधले परंतु संबंधित कंत्राटदाराने या कामात गैरप्रकार केल्याने हे निवारे काही दीवसातच मोडकळीस आले आहे.एकीकडे शहरातील बसस्थानकाचा कायापालट झाला तर ग्रामीण भागातील निवारे शेवटच्या घटका मोजत असताना मात्र शासनाचे लोकप्रतिनिधी यांचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने. या गंभीर बाबीकडे मंत्री महोदय आमदार खासदार यांनी लक्ष देण्याची मागणी केली आहे,

---

## स्कूलमध्ये आषाढी एकादशी निमित्त दिंडी सोहळा

### भर पावसात लहान विद्यार्थ्यांनी लेझीम च्या तालावर धरला ठेका

**समुद्रपूर/जनमाध्यम :**

ब्रिलियंट सीबीएसई स्कूल,येथे आषाढी एकादशी निमित्त हरिपाठ व भजनांनी सजलेली पवित्र आणि भक्तिमय दिंडी मोठ्या उत्साहात व पारंपरिक पद्धतीने काढण्यात आली. भर पावसात विद्यार्थ्यांनी लेझीम च्या तालावर ठेका धरला.

दिंडी च्या सुरुवातीला भगवान विठ्ठल-रुखमाईंच्या मूर्तीचे पूजन व आरती करण्यात आली आणि त्यानंतर दहेगाव येथील गणेश खोंडे, लक्ष्मण पालेवार, सचिन धोपेकर, प्रवीण लढी, गणेश खडसे, सतीश बाभुळकर, चव्हाण या भजन मंडळींनी उत्कृष्ट भजनाच्या तालावर. या सोहळ्याने शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये भक्तीभाव व सांस्कृतिक मूल्यांची जाणीव निर्माण केली. या दिंडीमध्ये शाळेच्या नर्सरी, केजी-१, केजी-२ वर्गातील तसेच वर्ग १ ते ६ चे विद्यार्थी पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले होते. काही विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांचे वेष परिधान केले होते, तर काहींनी टाळ- मृदंग वाजवत अभंग गायनाद्वारे वातावरण भक्तिमय केले. विद्यार्थ्यांनी लेझीम वर सुंदर असे नृत्य सुद्धा सादर केले. पालखी सजवून त्यामध्ये भगवान विठ्ठल-रुखमाईंची मूर्ती ठेवण्यात आली होती. मुख्याध्यापक अजय बुल्हे आणि



उपमुख्याध्यापिका सारिका पर्बत यांच्या मार्गदर्शनाखाली व सर्व शिक्षकवृंदाच्या सहकार्याने कार्यक्रम सुरळीत पार पडला. यावेळी विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट च्या सचिव डॉ. नयना तुळसकर, विद्या विकास महाविद्यालयाचे उपप्राचार्य मेघश्याम ढाकरे, शिक्षक व पालक यांनीही दिंडीमध्ये सहभाग घेतला. कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट विद्यार्थ्यांना आपल्या सांस्कृतिक परंपरांशी जोडणे आणि त्यांच्यात भक्ती व एकात्मतेची भावना रुजवणे हे होते. शाळेच्या परिसरातून निघालेली ही दिंडी विद्या विकास महाविद्यालयाच्या मुख्य रस्त्याने फिरून पुन्हा शाळेत आली आणि तेथे काला व खाऊ वाटप करून समारोप करण्यात आला.

या भावनिक आणि अध्यात्मिक वातावरणामुळे विद्यार्थ्यांसह उपस्थित सर्वांच्याच मनात चिरकालीन आठवणी कोरल्या गेल्या. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले. या कार्यक्रमांमध्ये शिक्षिका मयुरी घुमडे, कविता आंबुलकर, सुरेखा पाटील, नेहा बोधे, अस्मिता तिजारे, सुचिता मांगरूळकर, वैशाली भक्ता, स्विटी ढाकरे, पूनम पेंदाम, राजश्री चंदनखेडे, सृष्टी वनकर, तसेच शिक्षकेतर कर्मचारी सपना धुळे, अमित हजारे, सुनंदा गिरोले , प्रवीना हीवंज, मंजुषा कोळसे आणि अपर्णा धोटे तसेच पालकांनी सहभाग दर्शविला.

---

## संक्षिप्त

### वर्ध्यात कपड्याच्या दुकानात कपड्यासह १५ लाख अज्ञाताकडून लंपास

**वर्धा-** शहरातील मुख्य बाजारपेठेत असलेल्या पंचशील या कपड्याच्या दुकानात चोरी झाल्याची घटना घडली. चोरट्यांनी ११ लाख रोख, महागड्या साड्या, सुट, शेरवाणी लंपास केली. ही घटना बुधवार ९ जुलै रोजी सकाळी उघडकीस आली. मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील कपड्याचे पंचशील दुकानातील कर्मचाऱ्यांना वेतन देण्यासाठी मालकांनी १० लाख रुपये दुकानात आणून ठेवले होते. ८ रोजी दुकानातील कर्मचाऱ्यांना वेतन देण्यात येणार होते. मात्र, पाऊस असल्याने कर्मचाऱ्यांनाही घरी जाण्याची घाई असल्याने वेतन देण्यात आले नाही. त्या वेतनाचे १० ते ११ लाख तसेच प्रती साडी १० ते १५ हजार रुपये किमतीच्या १२ साड्या, सुट, शेरवाणी व अन्य कपडे असे साडे चार ते पाच लाख रुपयांचे कपडेही लंपास केले. पावसाळ्यात ग्राहकी नसल्याने विक्री कमी होते. गुरुवार ते सोमवारपर्यंत झालेल्या विक्रीचे पैसे घरी ठेऊन होते. कर्मचाऱ्यांचे वेतन असल्याने घरी ठेवलेले १० ते ११ लाख दुकानात आणले होते. रात्री दुकानाच्या मागच्या भाग फोडून दुकानात प्रवेश करून चोरट्यांनी ही धाडसी चोरी केली. या प्रकरणी शहर पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली.

### वृद्ध महिलेला वीट मारून जखमी केले

**हिंगणघाट-**जेवणानंतर रात्रीला शतपावली करत असलेल्या वृद्ध महिलेला शिवीगाळ करून मारहाण करण्यात आली. ही घटना साईनगर, संत तुकडोजी वॉर्ड नंदोरी रोड, हिंगणघाट येथे घडली. याप्रकरणी हिंगणघाट पोलीस ठाण्यात जखमी महिलेच्या तक्रारीवरून भास्कर येनूरकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिजाबाई चौधरी (६५) या जेवण आटोपून शतपावली करीत होत्या. दरम्यान भास्कर येनूरकर यांनी त्यांना शिवीगाळ केली. महिलेने शिवीगाळ करण्यास विरोध केला. तेव्हा आरोपीने रस्त्यावर पडून असलेली वीट उचलून महिलेच्या कपाळावर मारून जखमी केल्याचे तक्रारीत सांगितल्याने पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्ह्याची नोंद केली आहे.



### विद्युत प्रवाह संचारल्याने गायीचा मृत्यू

**वर्धा-**जिल्ह्यात नव्हे, तर संपूर्ण राज्यभरात एका कंपनीच्या ऑप्टिकल फायबरचे जाळे पसरले आहे. फायबर तार लावताना नियमाला बगल देत अनेक ठिकाणी विद्युत वितरणच्या पोलजवळच फायबर तार लावण्यासाठी पोल उभे करून इतरत्र वायरची कनेक्टिव्हिटी देण्यात आली. अशातच विद्युत तारेखाली देण्यात आलेल्या या फायबर पोलमध्ये विद्युत प्रवाह संचारल्याने त्याला स्पर्श करणाऱ्या गायीचा जागीच मृत्यू झाला. ही घटना पिपरी मेघे परिसरातील गिरीपेठ येथील वॉर्ड क्रमांक २ मध्ये घडली. बापूराव शंकर आत्राम यांची गाय दगावल्याने मोठे नुकसान झाले. याप्रकरणी नागरिकांनी रामनगर पोलिसांत तक्रार दाखल केली असता, पोलिस उपनिरीक्षक रामेश्वर रॉय, मिथुन कुमार राठोड यांनी घटनास्थळ गाठले. यावेळी लाइनमन राकेश ठाकरे यांनी परिसरातील विद्युतपुरवठा बंद केला. परिसरातील वाढता तणाव लक्षात घेता, फायबर कंपनीचे इंजिनिअर चैतन्य लेंडे तसेच संकेत श्रीगोंडे यांना बोलावले. त्यांनी विद्युत प्रवाह आलेले फायबर केबल हटविले. या फायबर कंपनीवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

### भोवळ आल्याने कामगाराचा मृत्यू

**वर्धा-**भोवळ येत खाली पडून डोक्याला गंभीर मार लागल्याने कामगाराचा मृत्यू झाला. ही घटना कॉलनी परिसर भूगाव येथे घडली. बिष्टू उर्फ विष्णू महतो (५६) रा. भूगाव असे मृतकाचे नाव आहे. बिष्टू महतो हे गत १३ वर्षांपासून भूगाव येथील एवोनिथ कंपनीत कामगार म्हणून काम करत होते. रात्री रुममध्ये हजर असताना त्यांना भोवळ आली. ते जमिनीवर कोसळले. यात त्यांच्या डोक्याला जबर मार लागल्याने त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी सावंगी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

### युवकाचा आत्महत्येचा प्रयत्न

**पुलगाव-** येथे वर्धा नदीवर बांधलेल्या रेल्वे पुलावर एक तरुण रेल्वे ट्रॅकवर झोपला. झोपलेल्या तरुणाला पाहून तिथे काम करणाऱ्या गँगमन रविकुमार पासवानने त्याला तात्काळ रुळावरून बाहेर काढले. ललित शर्मा रा. वल्लभनगर असे तरुणाचे नाव आहे.` बुधवार ९ जुलै रोजी सायंकाळी ५.३० वाजताच्या सुमारास दारू पिऊन तरुण रेल्वे पुलावर चढला. काही वेळातच हा तरुण रेल्वे ट्रॅकवर झोपला. रुळावर झोपलेल्या तरुणाला पाहून तिथे काम करणाऱ्या गँगमन रविकुमार पासवानने त्याला उठवण्याचा प्रयत्न केला. पण, तो तरुण उठण्यास तयार नव्हता. समोरून रेल्वे येत असल्याचे पाहून गँगमनने त्याला तेथून उचलण्यासाठी सर्व शक्ती वापरली. गँगमनने वरिष्ठ अधिकारी आणि रेल्वे पोलिसांना या घटनेची माहिती दिली. रेल्वे पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत त्याला ताब्यात घेतले. तरुणाच्या नातेवाईकांना माहिती दिल्यानंतर त्याला त्यांच्या स्वाधीन करण्यात आले. गँगमनने वेळीच माहिती दिल्यामुळे तरुणाचा जीव वाचला.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक २२६
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३


मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# कृषीआधारीत प्रशिक्षणावर भर द्या -जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यात कृषी प्रक्रियावर आधारीत प्रशिक्षणाला वाव आहे. त्यामुळे जिल्हा कौशल्य विकास विभागाने प्रशिक्षणाचे कार्य राबविताना युवकांना रोजगार मिळेल, असे कृषी आधारीत प्रशिक्षणावर भर द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात कौशल्य विकास विभागाच्या विविध प्रशिक्षण योजनांचा आढावा घेण्यात आला. तसेच जिल्हा कौशल्य विकासाचा आराखडा आज सादर करण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, परिविक्षाधिन अधिकारी कौशल्य, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे, प्रकल्प संचालक प्रिती देशमुख, माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख, आत्मा प्रकल्प संचालक अर्चना निस्ताने, जिल्हा कौशल्य विकासच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी येरेकर म्हणाले, राज्य शासनाची महत्वाची असलेली मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात आली. सध्या ११ महिन्यांसाठी नेमलेले युवक कार्यरत आहेत. त्यांना त्यांचे विद्यावेतन नियमित मिळतील, याची दक्षता घ्यावी. यासोबतच विविध रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून युवकांना रोजगार प्राप्त करून देण्यात येत आहे. हे युवक कामावर असल्याचा नियमित आढावा घेण्यात यावा. प्रशिक्षणाच्या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रत्येक तालुक्यात एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. यातून चांगला कायमस्वरूपी रोजगार मिळेल, अशी प्रशिक्षण व्यवस्था निर्माण करण्यात यावी.



प्रशिक्षणातून रोजगाराच्या संधी मिळणे महत्वाचे आहे. यासाठी कृषी क्षेत्रासोबतच सध्या सौरऊर्जेवर आधारीत सोलार रूफटॉप, सोलार पंप आदी सामुग्री दुरूस्तीचे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करावी. तसेच इलेक्ट्रीक वाहनांचाही वापर वाढलेल्या असल्याने या वाहनांच्या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यासंदर्भात पुढाकार घ्यावा. यासोबत जिल्ह्यातील चिखलदरा आणि धारणीं या मेळघाट भागातील युवकांना प्रशिक्षित करण्यासाठी संस्थांची नोंदणी करावी. जिल्ह्याच्या गरजेनुसार प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन करण्याच्या सुचना यावेळी त्यांनी दिल्या.

शासनाच्या १०० दिवसांच्या कृती कार्यक्रमात जिल्हा कौशल्य विभागाच्या अमरावती कार्यालयाने राज्यात दुसरा क्रमांक पटकाविला. यात योगदान देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकारी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

# शासकीय आयटीआय येथे शिकाऊ उमेदवारी भरती मेळावा सोमवारी

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील येथील एनएसएस हॉल मध्ये दि. १४ जुलै रोजी, सकाळी १० वाजता प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या भरती मेळाव्यामध्ये (L & T Ltd., CSTI) तसेच अमरावती जिल्ह्यातील स्थानिक नामांकित कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहे. आय टी आय उत्तीर्ण नोकरी, इच्छुक विद्यार्थ्यांनी या मेळाव्यात उपस्थित रहावे, असे आवाहन सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार अपर्णा आगरकर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

भरती मेळाव्यात फिटर, वायरमन टर्नर, मशिनिस्ट, वेल्डर, इलेक्ट्रिशियन, कारपेन्टर, इलेक्ट्रॉनिक्स, सुइंग टेक्नॉलाजी, ड्रेस मेकिंग, फॅशन टेक्नॉलाजी, कोपा, ट्रॅक्टर मेकॅनिक, डिझेल मेकॅनिक, आणि मोटर मेकॅनिक, आय टी आय व्यवसाय उत्तीर्ण तसेच १० वी, १२ वी उत्तीर्ण उमेदवार, प्रशिक्षणार्थीनी बायोडाटा व मूळ कागदपत्राच्या छायांकीत प्रतीसह सहभागी व्हावे.या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अमरावती यांनी केले आहे.

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, अमरावती विभाग, शिवाजी नगर, अमरावती
## ई-निविदा सुचना क्र. -०१/२०२५-२६

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, अमरावती विभाग, अमरावती हे खालील बस स्थानकावरील रिक्त वाणिज्य आस्थापना मासिक परवाना शुल्कावर (फीवर) लिव्ह ॲण्ड लायसेन्स पध्दतीने चालविण्यास देणेसाठी ई-निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | बसस्थानक | आस्थापना प्रकार | बांधीव/ मोकळी | जागेचे क्षेत्रफळ (चौ.फुट) | जागा वापरणावळ रक्कम व अपेक्षित भाडे रक्कम रु. | बयाणा रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | मोझरी (तळमजला) | उपहारगृह | बांधीव | १०२२ | ७३८६ | ८८६३२ |
| २. | चांदूर रेल्वे | उपहारगृह | बांधीव | १६१९ | ७५११ | ९०१३२ |

अधिक माहितीसाठी ई-निविदा प्रणालीच्या portal-http://mahatenders.gov.in साईटवर भेट द्यावी.

बयाणा रक्कम व जी.एस.टी.सहीत निविदा फॉर्म रक्कम ही ऑनलाईन पेमेंट गेट-वे-पध्दतीने भरावयाची आहे. शासनमान्य पंजीकृत बेरोजगार सेवा सहकारी संस्था/लोकसेवा केंद्र यांना सदर अट लागू नाही. बयाणा रकमेतून सूट असल्यास प्रमाणपत्राची स्कॅन प्रत तांत्रिक निविदेत अपलोड करावयाची आहे. अन्यथा ऑनलाईन निविदा उघडण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी. निविदा भरणे, सादर करणे व स्विकारणे हे खालील वेळापत्रकाप्रमाणे राहील.

| Sr.No. | Details | Start Date | Hrs. | End Date | Hrs. |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Publication of Tender | 11.07.2025 | 11.00 | -- | -- |
| 2. | Document Download Start | 11.07.2025 | 11.00 | 21.07.2025 | 15.00 |
| 3. | Bid Submission Start | 11.07.2025 | 11.00 | 21.07.2025 | 15.00 |
| 4. | Opening of Technical Cover | 21.07.2025 | 16.00 | -- | -- |

निविदा फॉर्म **अ** पूर्णतः भरुन त्यावर फोटो लाऊन, स्वाक्षरी घेऊन, फॉर्म स्कॅन करुन अपलोड करावा व त्यासोबत पुढील कागदपत्रे स्कॅन करुन जोडावी.

१. वर्तणुकीचा दाखला
२. दोन लायक जामीनदारांचे निविदा फॉर्म (रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर नमुन्यातील) सोबत संमतीपत्र त्यांचे स्वतःचे घर, शेती व ईतर स्थावर जंगम मालमत्ता असल्याचे चालू उतारे.
३. स्वतःचे नावावर स्थावर प्लॉट, घर, शेत असल्याचा चालू उतारा
४. आयकर दाखला व पॅनकार्डची झेरॉक्स
५. पुर्वानुभवाचा दाखला
६. उत्पन्नाचा दाखला (सक्षम प्राधिकाऱ्याकडून मिळविलेला)
७. पोलीस दाखला (पोलीस आयुक्त किंवा ग्रामीण पोलीस अधीक्षक यांचेकडून मिळविलेला)
८. आर्थिक स्थैर्याचे पुरावे, रोख रक्कम शिलकीचे दाखले
९. संबंधित व्यवसायाकरीता आवश्यक असणारे परवाने घेण्याची जबाबदारी निविदाकारांची राहील, वरील मूळ कागदपत्रे व त्यांचा १ साक्षांकित केलेला संच मुलाखतीच्या वेळेस सादर करण्यात यावा, न केल्यास सदर निविदा रद्द समजण्यात येईल.
१०. करारातील अटी व शर्ती शासनाकडून वेळोवेळी जे आदेश किंवा बदल होतील ते आस्थापनधारकावर बंधनकारक राहील.
११. बसस्थानकावर चालविण्यात येणाऱ्या वाणिज्य आस्थापनधारकांना दिवाणी न्यायालयात परवानाधिकृत जागेसंबंधी खटला दाखल करता येणार नाही. तसेच परवाना खंडीत केल्यानंतर महामंडळास कोणत्याही कायदेशीर प्रकियेद्वारे परवानाधिकृत जागेचा ताबा देणे पासून परावृत्त करता येणार नाही.
१२. आस्थापनधारकास विक्री करण्यास परवानगी दिलेल्या वस्तू, पदार्थ, सेवा यांचीच विक्री करावयाची आहे. कोणत्याही परिस्थितीत तांत्रिक निविदेच्या पाकीटामध्ये निविदाकाराने आर्थिक निविदा सादर करावयाचे नाही तसे केल्यास सदरची तांत्रिक निविदा अपात्र ठरविण्यात येईल.
१३. कोणतीही निविदा/अर्ज कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार रा.प.महामंडळ राखून ठेवत आहे. रा.प.महामंडळाचे नियम/अटी यामध्ये वेळोवेळी होणारे बदल परवानाधारकावर बंधनकारक राहतील. निविदा रद्द करण्याचे किंवा त्यामध्ये दुरुस्ती करण्याचे अधिकार रा.प.महामंडळ राखून ठेवित आहे.

**टिप -**
१. शासकीय किंवा निमशासकीय महामंडळ तसेच खाजगी कंपनीतील कायम स्वरुपी नोकरी असलेले कर्मचारी यांना निविदा भरता येणार नाही.
२. एका व्यक्तिला/महिला बचत गटाला महानगरपालिका/नगरपालिका किंवा जिल्हा हद्दीतील बसस्थानकावर जास्तीत जास्त दोन स्टॉल/उपहारगृह/सेवा केंद्र (दुरध्वनीकक्ष सोडून) यांचे परवाने घेता येतील.
३. एकाच बसस्थानकावर एकाच प्रकारच्या दोन वाणिज्य आस्थापना चालविण्यास देण्याचे अधिकार रा.प.महामंडळास राहतील.
४. निविदा अर्जावर निविदाकाराचा फोटो लावणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे निविदा अर्जाची किंमत अदा केल्याशिवाय निविदा फॉर्म ग्राह्य धरणार नाही. **उपहारगृह स्कॅन बारकरीता रु.११८०/- (जीएसटी १८ टक्के करासह)** व ईतर **वाणिज्य आस्थापनेकरीता रु.५९०/- (जीएसटी १८ टक्के करासह)** फॉर्म फी भरणे आवश्यक आहे. अथवा शासनाच्या बदलणाऱ्या नियमाच्या कर धोरणास अधिन राहून निविदा फॉर्म भरावा लागेल.
५. बस स्थानकावर चालविण्यास देण्यात येणाऱ्या वाणिज्य आस्थापनेच्या जागेवर बांधा, वापरा, हस्तांतर करा तत्वावर बसस्थानक अथवा परिसर बांधावयाचा झाल्यास रा.प.महामंडळ सदर वाणिज्य आस्थापनाची जागा मागणी करेल त्यावेळी निविदाच्या वेळी जाहीर केली असेल त्याप्रमाणे त्या स्थितीत महामंडळास परत त्वरित ताब्यात देणे वाणिज्य आस्थापनधारकावर बंधनकारक आहे. त्यापोटी रा.प.महामंडळ कोणतीही नुकसानी अथवा मोबदला देणार नाही तसेच त्या वाणिज्य आस्थापनाच्या बदली अन्य पर्यायी जागा देता येणार नाही. तसा कोणताही वाणिज्य आस्थापना धारकांचा हक्क राहणार नाही, याबाबतचे सर्व हक्क रा.प.महामंडळास राहील.
६. वाणिज्य आस्थापनेमधून विक्री करावयाच्या पदार्थाची यादी विभागीय कार्यालय अमरावती येथे कार्यालयीन वेळेत पाहायला मिळेल.
७. रा.प.महामंडळाने निश्चित केलेल्या क्षेत्रफळा इतकीच जागा वापरण्यास बंधनकारक राहील. तसेच स्टॉलची ऊंची जास्तीत जास्त १० फुटापेक्षा जास्त असणार नाही.
८. निविदाच्या छाननीअंती रा.प.महामंडळ पात्र निविदाकारांना समक्ष मुलाखतीसाठी सूचना देईल या मुलाखतीतल्या निविदाकारांची उपस्थिती राहणे बंधनकारक राहील.

**निविदा सादर करण्यासाठी काही प्रश्न उपस्थित झाल्यास विभागीय कार्यालयातील दुरध्वनी क्र.०७२१-२६६०३०० संपर्क साधावा.**

विभाग नियंत्रक
राज्य परिवहन, अमरावती

**एस.टी.चा प्रवास राज्याचा विकास**

---

**(Jt. C.J.J.D.) मा.सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

किरकोळ (RMJC) अर्ज क्र.१२७/२०२५ ने.ता.३१.०७.२०२५

**दामोधर आणि इतर --वि--निरंक**

अर्जदार ः
१. **दामोधर वसंत भोयर** - रा.वार्ड नं.२,सातरगांव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. **मालूबाई प्रभाकरराव धोटे** - देशी दारु दुकानाजवळ, जुनी वस्ती, बडनेरा ता.जि.अमरावती
३. **बेबीताई राजाभाऊ मते** - रा.टाकरखेडा संभू, ता.भातकुली, जि.अमरावती
४. **शोभा ज्ञानेश्वर मते** - रा.कवळा बहाळे, ता.भातकुली, जि.अमरावती

// वि// निरंक

ज्याअर्थी **मयत वसंतराव नथ्थुजी भोयर यांचा मृत्यू दि.२७.११.२०२१ रोजी आणि मयत कौसल्या वसंतराव भोयर यांचा मृत्यू दि.२२/०३/२०१२ रोजी सातरगांव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला आहे. अर्जदार क्र.१ मुलगा तसेच अर्जदार क्र.२ ते ०४ मुली आहेत आणि अर्जदार हेच मयत** यांचे कायदेशिर वारस आहेत.करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक २१ जून २०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
**प्रभारी सहायक अधीक्षक**
**मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

---

**(Jt. C.J.J.D.) मा.सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

किरकोळ (RMJC) अर्ज क्र.१७१/२०२५ ने.ता.१२.०८.२०२५

**देवेंद्र--वि--निरंक**

अर्जदार ः
१. **देवेंद्र लक्ष्मणराव रामटेके**
२. **सुरेंद्र लक्ष्मणराव रामटेके**
३. **चंद्रमणी लक्ष्मण रामटेके**
**अ.क्र.१ ते ०३** रा.वार्ड नं.०२ सातरगाव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
४. **संध्या विजय उके**
रा.वेणी गणेशपुर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

// वि// निरंक

ज्याअर्थी, **मयत लक्ष्मण धनुजी रामटेके यांचा मृत्यू दि.०२.०१.२०२३ रोजी सातरगाव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला आहे. मयत यांची अर्जदार क्र.१ व ०३ मुले तर अर्जदार क्र.०४ मुलगी आहे. अर्जदार हेच मयत** यांचे कायदेशिर वारस आहेत.करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक ०८ जुलै २०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
**मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

---

प्रो.क्र..../२०२५

**वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस**
**विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्रमांक २७७/२०२५ ने.ता.११.०८.२०२५

अर्जदार ः
1. Narendra Balasaheb @ Balkrushna Bhatkar, Aged 47 Yrs. Occu.: Agriculturist R/o.Khalkoni, Tq.Bhatkuli, Dist. Amravati.
2. Ajay Balkrushna Bhatkar, Aged 55 Yrs. Occu.: Agriculturist R/o.Antapur, Po.Khalkoni, Tq.Bhatkuli, Dist. Amravati.
3. Atul Balkrushna Bhatkar, Aged 44 Yrs. Occu.: Agriculturist R/o.Khalkoni, Tq.Bhatkuli, Dist. Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदारः निरंक

ज्यापेक्षा Balkrushna Gulabrao Bhatkar हे दि.**१०.०८.२०२२** रोजी मयत झाले. अर्जदार Narendra Balasaheb @ Balkrushna Bhatkar, Aged 47 Yrs. Occu.: Agriculturist, R/o.Khalkoni, Tq.Bhatkuli, Dist. Amravati व इतर यांनी **बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २** प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता या न्यायालयामध्ये दि.**०७.०७.२०२५** रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत Balkrushna Gulabrao Bhatkar यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत Balkrushna Gulabrao Bhatkar यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक ०९.०७.२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर
भातकुली

---

**सृजन हॉस्पीटल ड्रायव्हर पाहिजे**

**पत्ता -** रघुवीर सोसायटी, साईनगर, मेन रोड, अमरावती
फोन नं.०७२१-२५११५२२
मो.नं.९११२०५४१५
भेटण्याची वेळ
स.११ ते १२
सायं.६ ते ७

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**श्री.एस.बी.कळदाते, ३ रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज - १३११/२०२५**
**दिलीप व इतर वि निरंक**
**पुढील तारीख २६.०८.२०२५**

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार ः-
१. **दिलीप शंकरराव बिजवे,** वय ६९ वर्षे, धंदा - निवृत्त
रा.हरिगंगा ऑईल मिल अमरावती, संताजी नगर रुख्मीणी नगर एसओ ता.आणि जि. अमरावती
२. **प्रदीप शंकरराव बिजवे,** वय ६७ वर्षे, धंदा - निवृत्त
रा.प्लॉट नं.२९ एमबी इस्टेट,काटोल रोड, आकार नगर जवळ पीओ नागपूर, जि.नागपूर
३. **सुनंदा पांडुरंग गुल्हाने,** वय ६४ वर्षे, धंदा - घरकाम
रा.ग्रीन पार्क कॉलनी संताजी मंदिर, संताजी नगर, रुख्मिणी नगर एसओ अमरावती
४. **छाया वसंत शिरभाते,** वय ५९ वर्षे, धंदा - घरकाम
रा.प्लॉट नं.८७, रिंग रोड एम्प्रेस मिल सोसायटी, श्री हनुमान नगर जवळ, नागपूर

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः- निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत शंकरराव मांगुसा बिजवे हे दि.०१/०१/२०१३ रोजी नागपूर येथे मयत झाल्या. अर्जदार दिलीप शंकरराव बिजवे व इतर** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **दिलीप शंकरराव बिजवे व इतर** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०९.०७.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

**PUBLICATION NOTICE**

**IN THE COURT OF HON'BLE DISTRICT JUDGE-1, AMRAVATI - 444602 (MAHARASHTRA STATE)**

**Civil M.A. No. 297/2023** **F.F.21.04.2025**

**Applicant :-** **Jai Sewalal Krushi Kednra**
**// Versus//**
**Non-applicant :-** **Shri Pestiside And Chemicals**

Banam :- **Shri Pestiside And Chemicals Through Partner Shri Vinit Arun Shrirao R/o. Jafarjing Compound, Near Agrawal Dharamkata, Juna Cotton Market, Road, Amravati.**

**APPLICATION FOR CONDONATION OF DELAY U/S 5 OF LIMITATION ACT**

That the above named Applicant **Jai Sewalal Krushi Kendra, Through Pro. Pra. Ganesh Subhashrao Jadhav,** Age 30 yes., Occu- business, R/o. Sukali, Tq. Arni, Dist. Yavatmal has filed an appeal before the Hon'ble District Judge-1, Amravati.

Therefore, the notice issued by way of Paper Publication on **Respondent Shri. Pestiside And Chemicals Through Partner Shri. Vinit Arun Shrirao,** Age 45 yrs, Occu-Business, R/o Jafarjing Compound, Near Agrawal Dharamkata, Juna Cotton Market Road, Amravati that you may be appear/present personally or through your Counsel before the Hon'ble District Judge-1, Amravati (Maharashtra) on **21-04-2025 at 11.00 a.m.** and if you will be unable to present /appear before the Hon'ble Court on fixed date, then the appearl will be heard and determined in your absence.

Given under my hand and seal of the Court this on **25.02.2025**

**BY ORDER**

**Amravati**
**Date :- 25.02.2025**

Stamp

**Asstt. Supd. (Judl. Branch)**
**District & Sessions Court, Amravati**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**श्री.एस.बी.कळदाते, ३ रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज - १२९५/२०२५**
**रुक्मीणी व इतर वि निरंक**
**पुढील तारीख २५.०८.२०२५**

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार ः-
१. **रुक्मीणी पंडीत लोखंडे,** वय ५७ वर्षे, धंदा - घरकाम
२. **धनश्री पंडीत लोखंडे,** वय ३१ वर्षे, धंदा - डॉक्टर
क्र.१ व २ रा.देशपांडे वाडी, राजापेठ, अमरावती, ता.जि.अमरावती
३. **वंदना गजाननराव ठाकरे,** वय ५६ वर्षे, धंदा - घरकाम
रा.पन्नालाल नगर, राजापेठ, अमरावती, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः- निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत सुशिलाबाई अंबादास लोखंडे हया दि.२६/०८/२०१२ रोजी अमरावती येथे मयत झाल्या. अर्जदार रुक्मीणी पंडीत लोखंडे व इतर** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रुक्मीणी पंडीत लोखंडे व इतर** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०९.०७.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

# नगर परिषद कार्यालय, अचलपूर
## जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **रुखसानाबानो फिरोजखान,** पत्ता- नौबागपुरा, अचलपूर, जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या **वार्ड नं.२९** संगणक मालमत्ता क्र.**ACHA00025353** जुना मालमत्ता **क्र.२९०००२४९** नझूल शिट नं.नझुल जागा,प्लॉट नं.नझुल जागा ही कर आकारणी नोंदवहीनुसार **नझुल जागा भोगवटदार आफतरबी नुरखा** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या **नझुल जागा भोगवटदार रुखसानाबानो फिरोजखान** नावाने फेरफार घेण्याकरीता **नझुल इमला ताबा विक्री नोटरी** अन्वये या कार्यालयामध्ये दिनांक **१०.०७.२०२५** रोजी अर्ज सादर केलेला आहे. या विषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. अन्यथा या मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा-
पुर्व - अकीलखान मोहम्मद खान यांचे घर
पश्चिम - शे बशीर शे घूलू यांचे घर
उत्तर - रस्ता व शे.हुसेन शे.अमीन यांचे घर
दक्षिण - सै. हबीब सै.करिम यांचे घर

शिक्का

स्वाक्षरी/-
मुख्याधिकारी
नगर परिषद, अचलपूर

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
वि.श्रीमती एस.एस.बिंगरदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अमरावती

किरकोळ अर्ज क्र.१२६४/२०२५
श्रीमती मिरा अधिक दोन -वि- निरंक
पुढील ता.११.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार ः
1. Meera Namdevrao Bhurke, Age 62 Yrs. Occu.: Household R/o.Near Hanuman Mandir, Vrundavan Colony, Camp, Dist. Amravati.
2. Pranita Namdeorao Bhurke, Age 40 Yrs. Occu.: Household R/o.House No.85, Darvha Road, Near TVS Showroom Mahavir Nagar No.2, Lohara, Yavatmal, Tq.Dist.Yavatmal
3. Kavita Tushar Dhotre,, Age 36 Yrs. Occu.: Household R/o. B1/602, 10 Elite Katepuram Chowk, New Sangvi Pimple Gurav, Pimple Gurav Pune-411081

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **नामदेव नारायणराव भुरके** हे दिनांक 06.05.2021 रोजी Rewasa, Tq.Dist.Amravati येथे मयत झाले.अर्जदार **मिरा अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मिरा अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०४.०७.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१२४९/२०२५
श्रीमती पुष्पा अधिक दोन -वि- निरंक
पुढील ता.०६.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार ः
१. पुष्पा पांडुरंग उघडे, वय ५७ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
२. चैताली पांडुरंग उघडे, वय ३३ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
३. वैशाली पांडुरंग उघडे, वय ३० वर्षे, व्यवसाय - गृहिणी
सर्व रा.हनुमान मंदिराजवळ, सोनल कॉलनी, शेगांव रोड, व्हीएमव्ही, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **पांडुरंग नामदेवराव उघडे** हे दिनांक 08.06.2021 रोजी Amravati, Tq. Dist. Amravati येथे मयत झाले. अर्जदार **पुष्पा अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **पुष्पा अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०५.०७.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

# सायटेशन/जाहीरनामा

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.४५३/२०२५ ने.ता.२१.०८.२०२५

अर्जदार -
१. हुसेनाबी महंमद हनिफ, वय ६५ वर्षे, धंदा - घरकाम
२. शेख शकुर शेख इस्माईल, वय ६० वर्षे, धंदा - मजुरी
३. शहनाजबी शेख खलील, वय ५० वर्षे, धंदा - घरकाम
सर्व रा.हिवरखेड, ता,मोर्शी, जि.अमरावती
४. नजीमा सैय्यद आरिफ, वय ५५वर्षे, धंदा - घरकाम
रा.मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती
५. समशादबी नसिम पठाण, वय ४८ वर्षे, धंदा - घरकाम
रा.पेठ मांगरुळी, ता.वरुड, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार- निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदारचे वडील नामे **शेख इस्माईल शेख इब्राहीम** हे दि.**०१.०१.२०२०** रोजी त्यांचे राहते घरी **हिवरखेड**, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले असून अर्जदाराची आई नामे **सुगराबी शेख इस्माईल** ही दिनांक **०३.०८.२०२०** रोजी तिचे राहते घरी **हिवरखेड**, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०७.०७.२०२५

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.११५६/२०२५
हरिहर व ईतर -वि- निरंक
पुढील ता.०८.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार ः
१. हरिहर महादेवराव बडनेरकर, वय ... वर्षे, व्यवसाय - निरंक
२. शामकुमार महादेवराव बडनेरकर, वय ६१ वर्षे, व्यवसाय - मजुरी
दोघेही रा.जुनी वस्ती, बडनेरा, ता.जि.अमरावती
३. छाया नरेंद्र चिखलकर, वय ४९ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.ब्राम्हणपुरा, ओल्ड टाऊन बडनेरा, अमदापूरा, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **महादेवराव पंढरीनाथ बडनेरकर** आणि **कमलताई महादेवराव बडनेरकर** हे अनुकमे दिनांक 01.02.2019 व ०८.०५.२०१२ रोजी Amravati, Tq. Dist. Amravati येथे मयत झाले. अर्जदार **हरिहर महादेवराव बडनेरकर व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **हरिहर महादेवराव बडनेरकर व ईतर** विरुध्द निरंक वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २५.०६.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
वि.श्री.एस.एस.बिंगरदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१२९४/२०२५
श्री.श्रेयस अधिक दोन -वि- निरंक
पुढील ता.१४.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार ः
१. श्रेयस सुनिल निंघोट, वय २३ वर्षे, व्यवसाय - मजुरी
२. सरीता सुनिल निंघोट, वय ५० वर्षे, व्यवसाय - गृहिणी
३. राधा रामराव निंघोट, वय ७८ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
सर्व रा.वार्ड नं.२, टाकळी कानडा, पो.धानोरा फसी, ता.नांदगांव खंडे.जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **सुनील रामराव निंघोट** हे दिनांक 16.03.2025 रोजी Amravati, Tq. Dist. Amravati येथे मयत झाले. अर्जदार **श्रेयस अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रेयस अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०५.०७.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**वाहन भाडे तत्त्वावर घेण्याबाबत**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचेकरीता टोयोटा इनोव्हा क्रिस्टा (Toyota Innova Crysta) हे वाहन भाडे तत्त्वावर घेण्याबाबत**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांच्याकरीता (Toyota Innova Crysta) हे वाहन भाडेतत्वावर घ्यावयाचे आहे. त्यानुषंगाने पुरवठादारांकडून निविदा मागविण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे भाडेतत्वावर घेतल्या जाणाऱ्या (Toyota Innova Crysta) या वाहनाकरीताच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१. वाहन सन २०२५ मध्ये खरेदी केलेले असावे.
२. वाहनाचा विमा कार्यरत असणे आवश्यक आहे.
३. पुरवठादार यांचेकडे नोंदणी प्रमाणपत्र असावे.
४. वाहन चालक या कार्यालयाचा राहील.
५. इंधन खर्च या कार्यालयाकडून करण्यात येईल.
६. वाहन अमरावती परिवहन कार्यालयातून नोंदणी झालेले असावे. (MH-27)

तरी ईच्छुक पुरवठादारांनी त्यांचे दरपत्रक, वाहनाची कागदपत्रे, वाहन घेतल्याचा दिनांक व वाहन किती कि.मी. चाललेले आहे, याचा तपशील सोबत जोडून, उपसचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती, शासकीय विश्राम भवन जवळ, कॅम्प, अमरावती-४४४६०२ यांचेकडे **दिनांक १४/०७/२०२५** पर्यंत पोहोचतील अशा बेताने समक्ष अथवा टपालाद्वारे सादर करावा. विहीत दिनांकानंतर प्राप्त होणारे दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत.

स्वाक्षरी
(देविसिंग ह.डाबेराव)
उप सचिव तथा प्रादेशिक कार्यालय प्रमुख,
महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
अमरावती खंडपीठ

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.
संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
अमरावती आवृत्ती वर्ष - ३६ अंक ३०६
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025
मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# बालगृह 'वझ्झर मॉडेल'म्हणून घोषित करण्यासाठी प्रयत्न-जिल्हाधिकारी



## जिल्हाधिकाऱ्यांची वझ्झर बालगृहाला भेट

**अमरावती/का.प्र.**

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आज वझ्झर फाटा, ता. अचलपूर येथील स्व. अंबादास पंत वैद्य मतिमंद व मूकबधिर बालगृहाला भेट दिली. यावेळी त्यांनी पद्मश्री डॉ. शंकरबाबा पापळकर यांच्यासोबत एक तास चर्चा केली. यावेळी त्यांनी बालगृहाला वझ्झर मॉडेल म्हणून घोषित करण्यासाठी प्रयत्न करण्याबाबत चर्चा केली.

भेटीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी संपूर्ण बालगृहाची पाहणी केली. त्यानंतर मतिमंद व मूकबधिर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. परिसरात विद्यार्थ्यांनी लावलेल्या झाडांचीही पाहणी केली. संस्थेचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. शंकरबाबा पापळकर यांच्यासोबत त्यांनी विविध विषयांवर चर्चा केली. चर्चेदरम्यान बालगृहाशी संबंधित महत्त्वाचे प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याबाबत विनंती करण्यात आली. यामध्ये बालगृहाला 'वझ्झर मॉडेल' म्हणून घोषित करणे, विद्यार्थ्यांचे मानधन पाच हजार रूपयांपर्यंत वाढवणे, विद्यार्थ्यांना आजीवन बालगृहात ठेवण्याची परवानगी देणे आणि वझ्झर मॉडेल विभागीय स्तरावर सुरू करणे, याबाबींचा समावेश आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी सदर प्रस्ताव शासनास सादर करण्याचे आश्वासन दिले.यावेळी जिल्हा समाज कल्याण अधिकारी डी. एम.पुंड, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सोंदळे आदी उपस्थित होते.दरम्यान जिल्हाधिकारी येरेकर यांनी आज चांदूर बाजार तहसील कार्यालय येथे महसूलविषयक बाबीचा आढावा घेतला. महसूल विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आढावा घेऊन त्यांनी सूचना केल्या. यासोबतच त्यांनी टोंगलापूर येथील रोपवाटिकेला भेट दिली. यावेळी तालुका पालक महसूल उपजिल्हाधिकारी विवेक जाधव, अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव, प्रभारी तहसीलदार तिवारी, नायब तहसीलदार सोनारकर, तालुका कृषी अधिकारी फाल्गुनी ननीर, गटविकास अधिकारी निलेश वानखडे उपस्थित होते.बैठकीत घरकुल लाभार्थ्यांना वाळू वाटप, नैसर्गिक आपत्ती, आपले सरकार आणि पीजी पोर्टलवरील प्राप्त तक्रारी, शेतकरी आत्महत्या, संजय गांधी योजना आणि श्रावणबाळ योजनेसाठी आधार प्रमाणीकरण,ॲग्रीस्टॅक याबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्राम महसूल अधिकारी यांचा सत्कार करण्यात आला.

अचलपूर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये फळभाज्या आणि इतर शेतमालाच्या संरक्षणासाठी उभारण्यात आलेल्या शीतगृहाची पाहणी जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी केली. यावेळी तहसीलदार संजय गरकल, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव आणि सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभागाचे कार्यकारी अभियंता रोहन पाटील उपस्थित होते.सदर शीतगृहाची साठवणूक क्षमता १० मेट्रिक टन आहे. यात फळे आणि भाज्या दीर्घकाळ टिकवून ठेवण्याची क्षमता आहे. यासाठी आवश्यक असलेली सापेक्ष आर्द्रता देखील राखली जाते. शीतगृहाच्या आत बाष्पीभवन युनिट आणि बाहेर कंडेन्सर युनिट असलेल्या 'स्प्लिट' प्रकारच्या प्रणाली बसविण्यात आली आहेत. सदर शीतगृह १० किलोवॅट क्षमतेचे असून सौर ऊर्जेवर चालते. यामध्ये बायफेशियल सोलर पॅनेल वापरले आहेत, जे कमी प्रकाशातही वीज निर्माण करतात. शीतगृह अत्याधुनिक सेन्सर्सनी सुसज्ज आहे. हे सेन्सर्स फळे आणि भाज्यांमधून निर्माण होणारे अनावश्यक व हानिकारक वायू शोधून त्यांना शीतगृहातून बाहेर काढतात, ज्यामुळे फळे आणि भाज्या अधिक कालावधीसाठी साठवता येतात. यामुळे परिसरातील शेतकऱ्यांसाठी आधुनिक सोय निर्माण झाली आहे.

# ११ वी च्या दुसऱ्या प्रवेश फेरीला प्रारंभ

## १३ जुलैपर्यंत करा अर्ज

**अमरावती/का.प्र.**

अकरावी प्रवेश प्रक्रियेतसाठी पहिल्या फेरीची अंतिम निवड यादी तांत्रिक कारणामुळे वेळेवर यादी जाहीर झाली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. बदललेल्या वेळापत्रकानुसार ३० जूनला यादी जाहीर होणार होती. मात्र २८ जून रोजीच यादी जाहीर झाली. त्यानुसार आजवर जिल्ह्यात १२ हजार २५६ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत तर २९ हजार जागा अजूनही रिक्त आहेत. यंदा जिल्ह्यात ४२ हजार १८० जागा आहेत. ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश अद्यापही बाकी आहेत अशांसाठी १० ते १३ जुलैपर्यंत दुसरी प्रवेश फेरी राबविण्यात येत आहे. अशी माहिती प्रवेश समन्वयक प्रा. अरविंद मंगळे यांनी दिली आहे.

जिल्ह्यात यंदा अरावीची प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाइन पध्दतीने राबविण्यात येत आहे. या अंतर्गत जिल्ह्यतील ३१० कनिष्ठ महाविद्यालयांमधील ४२ हजार १८० जागासाठी आतापर्यत ३० हजारांवर विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. यावर्षी तांत्रिक अडचणीमुळे अकरावी प्रवेशाला उशीर झाला. ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश व्हायचे आहेत. त्यांच्या करिता प्रवेशाचे वेळापत्रक राबविण्यात आल्याची माहिती प्रवेश समन्वयक प्रा. अरविंद मंगळे यांनी कळविली आहे. त्यानुसार प्रवेशासाठी नोंदणी व पसंतीफॉर्म १० जुलै ते १३ जुलैपर्यंत भरणे आहेत. त्यानंतर गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांचे संबंधीत कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश १८ ते २१ जुलैपर्यंत घ्यायचे आहेत.

# सहाय्यक कृषी अधिकारी ज्योती ठाकरे यांचा गौरव

## जलतारा शोषखड्डयांमधून जलसंधारणाचे उत्कृष्ट उदाहरण
## जिल्ह्यात सर्वाधिक १०३ शोषखड्डे केले पूर्ण



**नांदगाव पेठ/वार्ताहर**

यावली शहीद येथे कार्यरत सहाय्यक कृषी अधिकारी ज्योती नितीन ठाकरे यांचा जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. त्यांनी नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन अंतर्गत अमरावती जिल्ह्यात सर्वाधिक १०३ जलतारा शोषखड्डे यशस्वीरित्या पूर्ण केले. हा उपक्रम शेतकऱ्यांच्या शेतात जलसंधारणासाठी प्रभावी ठरत असून, भूगर्भातील जलसाठा वाढवण्यास मोठा हातभार लागत असल्यामुळे शासनाच्या वतीने त्यांना गौरविण्यात आले.

खरीप हंगाम २०२५ साठी आयोजित राष्ट्रीय कृषी विकास योजना,तृणधान्य अभियान अंतर्गत आयोजित 'उत्पादकता वाढ कार्यशाळा व शेतकरी सन्मान सोहळा' नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती येथे नुकताच पार पडला. या सोहळयाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी आशिष येरेकर होते. कार्यक्रमाला विभागीय कृषी सहसंचालक प्रमोद लहाळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते, उपविभागीय कृषी अधिकारी पंकज चेडे, तसेच आत्मा प्रकल्प संचालक अर्चना निस्ताने यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमात खरीप पीक स्पर्धा २०२४-२५ चे विजेते, नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणारे शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनी, तसेच पीएमएफएमई अंतर्गत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा आणि कृषी क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या कृषी कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला.यावेळी पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी ज्योती ठाकरे यांचा सत्कार केला.

या उल्लेखनीय कार्यासाठी उपविभागीय कृषी अधिकारी पंकज चेडे यांचे मार्गदर्शन, तालुका कृषी अधिकारी प्रशांत गुल्हाने, मंडळ कृषी अधिकारी नीता कवाने आणि उप कृषी अधिकारी शुभांगी बोंडे, तसेच यावली गावातील सरपंच शिल्पा खवले, कृषी मित्र सुनील लंगडे, अक्षय भोपळे व रवींद्र वानखडे यांचे विशेष सहकार्य लाभले असल्याचे यावेळी ज्योती ठाकरे यांनी सांगितले.शासनाच्या वतीने सन्मानित झाल्यामुळे ज्योती ठाकरे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# पर्यावरण संवर्धनासाठी विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा-डॉ.डी.बी.मालपे

## विद्यापीठात 'पर्यावरण, उर्जा व जल संवर्धन' विषयावर जनजागृती कार्यक्रम



**अमरावती/का.प्र.**

आपल्या देशात मागील साठ वर्षात आपण वनाचा विनाश केला असून त्यामुळे झालेली निसर्गहानी भरुन निघावी याकरीता पर्यावरणाचे महत्व विद्यार्थ्यांनी समजून घेवून त्याच्या संवर्धनासाठी पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र विभागाचे माजी प्राध्यापक डॉ.डी.बी. मालपे यांनी केले.

प्रधान मंत्री उच्चतर शिक्षा अभियान (पीएम-उषा) अंतर्गत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील प्रादेशिक समन्वय संस्था,उन्नत भारत अभियान, राष्ट्रीय सेवा योजना व रासायनिक तंत्रज्ञान विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'पर्यावरण, ऊर्जा व जल संवर्धन' या विषयावर एक दिवसीय जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन डॉ. श्रीकांत जिचकार स्मृति संशोधन केंद्राच्या सभागृहामध्ये करण्यात आले, त्याच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, उन्नत भारत समन्वयक डॉ. एम.बी. कुंभारे, रा.से.यो. संचालक डॉ. निलेश कडू, रासायनिक तंत्रशास्त्र विभागप्रमुख डॉ. अनिल नाईक, भूगर्भशास्त्र विभागप्रमुख डॉ. यादवकुमार मावळे उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले,आज निसर्गाचा झालेला असमतोल, त्याला आपणच कारणीभूत असून वसुंधरेच्या संवर्धनासाठी समाजाने आणि विशेषत: विद्यार्थ्यांनी पुढे यायला हवे.सशक्त विश्व निर्मितीसाठी आमचे विद्यार्थी पर्यावरण दूत बनून त्याच्या संवर्धनासाठी जनजागृती करतील, स्वत: या कार्यात पुढाकार घेतील, असा विश्वास त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला.उद्घाटन सत्राचे संचालन प्रा. तृप्ती बारबुद्धे यांनी, तर आभार रासेयो संचालक डॉ. निलेश कडू यांनी मानले. उद्घाटन कार्यक्रमाला विद्यापीठाचे शैक्षणिक विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, रासेयो विद्यार्थी व इतर विद्यार्थी उपस्थित होते.दुपारच्या उद्घाटन सत्रानंतर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र विभागाचे माजी प्राध्यापक डॉ.डी.बी. मालपे, लॅबकेम, अमरावतीचे संचालक डॉ. वैभव तिवारी व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मारेगांव, यवतमाळचे भौतिकशास्त्र प्रमुख डॉ.एन.आर. पवार यांचे व्याख्यान संपन्न झाले.

# संक्षिप्त

## अरूणोदय इंग्लिश स्कूलमध्ये गुरूपौर्णिमा



**अमरावती-**व्ही.एम.व्ही. परिसरातील अरुणोदय इंग्लिश स्कूल व ज्यू. कॉलेज ऑफ सायन्स, हर्षराज कॉलनी, अमरावती येथे गुरूपौर्णिमा दिन उत्साहात साजरा पडला. कार्यक्रमाच्या सुरूवातीला सरस्वतीच्या फोटोचे पूजन अरूणोदय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.डॉ.वसंत लुंगे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. गुरूपौर्णिमेचे दिनविषेश व त्याचे महत्व किती महान आहे. जिवनामध्ये आपले प्रथम गुरू हे आई वडील असून, दुसरे गुरू हे आपले शिक्षक असतात. त्यांचे आपल्या जिवनामध्ये असलेले अनन्य साधारण महत्व डॉ. वसंत लुंगे यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले.याप्रसंगी अरूणोदय शिक्षण संस्थेच्या सचिव मा. डॉ. भारती लुंगे, प्राचार्या विशाखा नाफडे, उपप्राचार्या सीमा कुथे, कार्यालयीन अधिक्षिका रेखा राऊत, अरुणोदय इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका शिल्पा पाजनकर, उपमुख्याध्यापिका निता काळमेघ उपस्थित होते.

## पी.आर.पोटे पाटील कॉलेजमध्ये गुरुपौर्णिमा

**अमरावती-**पी.आर.पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड मॅनेजमेंट, अमरावती येथे गुरुपौर्णिमा सण भक्तिभावाने साजरा करण्यात आला. पारंपरिक अध्यात्मिकतेने महाविद्यालयाचा



संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारलेला होता. कार्यक्रमाची सुरुवात संत गजानन महाराजांची पूजा करून आरतीने झाली. विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी सामूहिक आरतीत सहभाग घेत संतांच्या चरणी नतमस्तक होत आशीर्वाद घेतला.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एम.जावांधिया सर व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा विद्यार्थ्यांनी सन्मान केला. विद्यार्थ्यांनी आपले भविष्य घडवणाऱ्या गुरुंसाठी कृतज्ञता व्यक्त केली.कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी भक्तिमय भजने सादर केली. विद्यार्थिनींनी गुरुपौर्णिमेच्या महत्त्वावर केलेल्या भाषणांनी उपस्थितांची मने जिंकली.प्राचार्य डॉ. जावांधिया यांनी मार्गदर्शन करत सांगितले,'गुरु केवळ ज्ञान देत नाही तर शिष्याचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व घडवतो. आपल्या संस्कृतीत गुरुंना वंदन करणे ही परंपरा आहे आणि ती जपणे ही आपली जबाबदारी आहे.'कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक क्लब केले होते. शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे कार्यक्रम यशस्वी ठरला.

## अंजनगाव बारीत 'बळीराजा संवाद अभियान'

**अंजनगाव बारी-**कृषी विभागाला दिलेल्या सुचनेनुसार पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून अंजनगाव बारी येथील ग्रामपंचायत कार्यालय येथे 'बळीराजा संवाद अभियान' राबविण्यात आले.कार्यक्रमाचे आयोजन सहाय्यक कृषी अधिकारी प्रियंका पाठबाजे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी उपसरपंच अरविंद निंबर्ते,मनोज इंगोले, विजय टारपे, मिथुन अंबाडकर, शेषरावजी राऊत, शेख हारून शेख बिस्मिल्ला, सय्यद याकूब सय्यद इमाम, विलास पोकळे, ओंकार रतये, वैभव हटवार, निखिल पोकळे, गणेश न्यायखोरे, नारायण बनसोड, केशव पोकळे, रमेश किंदरले, शंकर गिरपुंजे, संतोष इंगोले तसेच पी.आर.पोटे कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी व गावातील सर्व शेतकरी बंधू बहुसंख्येने उपस्थित होते.

## आषाढी एकादशीला १५० अंध कुटुंबांना राशन वाटप

**अमरावती-**कच्छी वि.सा ओसवाल दृष्टी फाउंडेशन माटुंगा मुंबई द्वारा अमृत मुथा यांच्या निवासस्थानी राजापेठ चौक येथील मासिक राशन वाटप करण्यात आले. दर महिन्या ला १५० अंध कुटुंबीयांना पहिल्या रविवारी हे राशन वाटप होत असते. कच्छी वि.सा अमरावती विभागाचे प्रमुख धीरेन गाला



यांच्यामार्फत हे कार्य होत असते योगायोगाने जुलै महिन्याच्या पहिल्या रविवारी आषाढी एकादशी दिवस होता व सर्व बांधवांना फराळाचे वाटपही करण्यात आले. कार्यक्रमाला धीरेन गाला,डॉ. गोविंद कासट, प्रदीप जैन, अमृत मुथा, निलेश ठाकरे कार्यकर्ता व लाभार्थी मंडळी मोठ्या संख्येने हजर होती.

# पुण्यात रविवारी संत अच्युत महाराज गुरुपौर्णिमा उत्सव

## मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित राहणार

**अमरावती/का.प्र.**

पुणे येथील श्री संत अच्युत महाराज सत्संग मंडळाच्या वतीने सलग दुसऱ्या वर्षी श्री संत अच्युत महाराज गुरुपौर्णिमा उत्सवाचे आयोजन रविवारी १३ जुलै रोजी सकाळी १० वाजता पुण्यातील साफा बँक्वेट हॉल, बालेवाडी हायस्ट्रीट येथे करण्यात आले आहे.



गुरुपौर्णिमा उत्सवात गुरुपूजनानंतर संत अच्युत महाराजांचे शिष्य संत श्री सचिन देव महाराज यांचे आशीर्वचन होईल. या कार्यक्रमाला राज्याचे उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, शिर्डीतील श्री साईबाबा संस्थानचे माजी अध्यक्ष व अमरनाथ श्राइन बोर्डाचे सदस्य डॉ. सुरेश हावरे प्रामुख्याने उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहे.

विदर्भातील जी मंडळी नोकरी व शिक्षणाच्या निमित्ताने पुण्यात स्थायिक झाली आहे, त्यांच्या पुढाकारातून पुण्यात या गरुपौर्णिमा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या वर्षीपासून उत्सवाची सुरुवात झाली. यंदा उत्सवाचे दुसरे वर्ष आहे. विदर्भातील भक्तमंडळी या उत्सवात सहभागी होणार असून उत्सवाची जय्यत तयारी सुरू आहे. उपरोक्त गुरुपौर्णिमा उत्सवात अच्युत परिवारातील सदभक्तांनी उपस्थित राहावे, असे आवाहन पुणे येथील श्री संत अच्युत महाराज सत्संग मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# वृद्ध कलावंतांच्या मानधनाबाबत शासनाची उदासीनता

## आजवर केवळ दोनच हप्ते जमा
## ५० कलावंतांवर निवडीअभावी अन्याय

**अमरावती/का.प्र.**

कोरोना काळापासून जिल्ह्यात वृद्ध कलावंत निवड समितीची बैठकच झाली नसल्याने सन २०२२ पासून जवळपास ७५० प्रस्ताव धुळखात पडले होते. अखेर ९ व १० डिसेंबर २०२४ रोजी निवड समितीची बैठक घेऊन, प्रलंबित प्रस्तावांमधून २०२२-२३ चे १०० प्रस्ताव आणि दरवर्षीचा इष्टांक १०० असताना सुद्धा २०२३-२४ मधील फक्त ५० प्रस्तावच मंजूर केल्याने जिल्ह्यातील सुमारे ५० कलावंतांवर निवडीअभावी घोर अन्याय झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

शिवाय, निवड झालेल्या एकूण १५० कलावंतांना त्यांनी ज्यावर्षी प्रस्ताव दाखल केले तेव्हापासून मासिक मानधन मिळणे अपेक्षित असताना आजवर केवळ दोनच महिन्यांचे व तेही अनियमितपणे मानधन डीबीटी प्रणालीद्वारे बँक खात्यात जमा झाले आहे. प्रलंबित सुमारे ७५० प्रस्तावांपैकी केवळ १५० कलावंतांचेच प्रस्ताव मंजूर झाल्याने ६०० प्रस्ताव संबंधित कलावंतांना परत करून त्यांना नव्याने ऑनलाइन पद्धतीने दाखल करण्याचे सांगण्यात आले असले तरी, शासनाची ती वेबसाइट बंदच असल्याने कलावंतांना ऑनलाइन अर्ज करण्याचा मार्ग बंद झाला आहे. १६ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार, जून महिन्यात स्थानिक वर्तमानपत्रांतून जाहिरात प्रसिद्ध करून, जुलै महिन्यात अर्ज मागविण्याच्या प्रक्रियेला स्थानिक प्रशासनाने अद्यापही सुरुवात केली नसल्याने मनस्ताप सहन करावा लागत असून, शासनाची संबंधित वेबसाइट अजूनही बंदच असल्याने कलावंतांची दमछाक होत आहे. त्यामुळे एकूणच या निवड प्रक्रियेसंदर्भात प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. केवळ कलेवरच गुजराण करून उपजीविका करणाऱ्या वृद्ध कलावंतांना पन्नाशीनंतर आर्थिक आधार मिळावा यासाठी १९५३-५४ पासून शासनामार्फत राजर्षी शाहू महाराज वृद्ध कलावंत मानधन योजना सुरू करण्यात आली असून, यासंदर्भाने शासनाच्या परिपत्रकात नमूद करण्यात आलेल्या लाभार्थी निवड वेळापत्रकाप्रमाणे व नियमावलीनुसार स्थानिक प्रशासनाने वृद्ध कलावंत मानधन निवड समितीच्या प्रक्रियेची योग्य प्रकारे अंमलबजावणी करून जिल्ह्यातील वृद्ध कलावंतांना योग्य न्याय मिळवून द्यावा, अशी सर्वत्र मागणी केली जात आहे.

# पतीच्या निधनानंतर पत्नीस मिळाला जीवन ज्योती विमा योजनेचा लाभ

## तिवसा स्टेट बँकेमार्फत महिलेस दोन लाखांची आर्थिक मदत

**तिवसा/वार्ताहर**

एखाद्या विम्याची दरमहा किंवा वार्षिक हप्ते जरी आपण अल्प किमतीत भरत असलो तरी त्याचा लाभ कितीच्या पटीत व कोणत्या कठीण प्रसंगी मिळेल हे सांगता येत नाही.पतीने तिवसा येथील स्टेट बॅंकेमार्फत प्रधानमंत्री जीवन ज्योती विम्याचे केवळ ४३६ रुपये असे हप्ते भरल्यानंतर त्यांच्या मृत्यूनंतर पत्नीला त्याच जीवन ज्योती विमा योजनेंतर्गत दोन लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली.



गेल्या काही महिन्यांपूर्वी तिवसा येथील सुरेंद्र देशमुख यांचे नैसर्गिक मृत्यू झाला. त्यांच्या खात्यावर प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेचा हप्ता भरलेला असल्याचे बँकेच्या तपासणीत निष्पन्न झाले. दुर्दैवाने त्यांच्या कुटुंबीयांना यासंदर्भात पूर्वी कोणतीच माहिती नव्हती. मात्र, स्टेट बँक तिवसा शाखेचे शाखा प्रबंधक केतन नाईक व उपशाखाप्रबंधक अमोल नितनवरे यांनी सदर योजनेचे दस्तावेज पूर्ण करून हा विषय वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवला आणि पाठपुरावा करून त्या कुटुंबाला लाभ मिळवून दिला.अखेरीस शिल्पा सुरेंद्र देशमुख यांच्याकडे दोन लाख रुपयांचा चेक देण्यात आला. हा आर्थिक आधार मिळाल्याने त्या भावविवश झाल्या आणि बँकेचे आभार मानताना त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू ओघळले.या मदतीसाठी भारतीय स्टेट बँक तिवसा शाखेचे प्रबंधक मधुकर तळपाडे, माजी शाखा प्रबंधक केतन नाईक, उपप्रबंधक अमोल नितनवरे, अश्विनी गणवीर, तसेच कर्मचारी ज्योती बोंडे, नेहा बागडे, व इतर सर्व टीमने महत्त्वाची भूमिका बजावली.

# भाजपाच्या राज्य परिषदेवर सुधीर रसे, अभय माथने यांना संधी

**अचलपूर/वार्ताहर**

भारतीय जनता पार्टीच्या पक्षांतर्गत रचनेनुसार जेष्ठ पदाधिकाऱ्यांना राज्य परिषदेवर पाठवण्यात आले असून, मेळघाट जिल्हा अमरावती ग्रामीण येथील तीन पदाधिकाऱ्यांचा यात समावेश करण्यात आला आहे.

भारतीय जनता पार्टीचे अमरावती जिल्हा ग्रामीण उपाध्यक्ष सुधीर रसे रा. पथ्रोट , जिल्हा कार्यकारिणी सदस्य व माजी नगरसेवक अभय माथने रा. अचलपूर तसेच दर्यापूर येथील पदाधिकारी गोपाल चंदन यांची राज्य परिषदेवर निवड करण्यात आली आहे. ते २०२५ ते २०२८ या कालावधीत भाजपा राज्य परिषद सदस्य राहतील. हे तीनही पदाधिकारी गेल्या दोन दशकांपासून भारतीय जनता पक्षात एक निष्ठेने कार्य करत आहे. त्यांनी पक्ष मजबुतीला व वाढीला नेहमी प्राधान्य दिले आहे. त्यांचे कार्य बघून त्यांची राज्य परिषदेवर निवड करण्यात आली आहे.

या तिघांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जिल्हाध्यक्ष मेळघाट माजी आमदार प्रभुदास भिलावेकर यांचे आभार मानले असून पक्षाने दिलेल्या जबाबदारीवर खरे उतरणार असा विश्वास व्यक्त केला आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय


# हत्या करून मृतदेह फेकला पुलाखाली

## मृतक महिलेचे हातपाय बांधलेले

### -शिरजगाव कसबा येथील घटना



**अमरावती/प्रतिनिधीः-** शिरजगाव ते ब्राह्मणवाडा थडी रस्त्यावरील एका छोट्या पुलाखाली गुरुवारी दुपारी एका अनोळखी महिलेचा मृतदेह आढळून आला.

मृतदेहाची अवस्था पाहता ही हत्या असल्याची शक्यता आहे. त्यामुळे परिसरात खळबळ उडाली असून, पोलिसांनी खुनाचा गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. महिलेचा मृतदेह ब्लॅंकेटमध्ये गुंडाळलेला होता. तिचे हात-पाय कपड्याने घट्ट बांधलेले होते आणि गळा आवळल्याचे दिसून आले. त्यामुळे ही हत्या असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

मृत महिलेच्या अंगात पिवळ्या रंगाची साडी आणि ब्लाऊज होते. हातात हिरवट-सोनेरी काचेच्या बांगड्या आणि पायात पैजण (तोरड्या) होत्या. बाजूला एक चप्पलही सापडली. तिच्या उजव्या हातावर 'A.M. दुर्गा' आणि 'अनिल' अशी दोन टॅटू गोंदलेली आहेत. वय अंदाजे २५ ते ३० वर्षांदरम्यान असल्याचे सांगण्यात आले आहे.

मृतदेह पूर्णपणे सडलेला असून मृत्यू ४-५ दिवसांपूर्वी झाला असावा.

ही माहिती मिळताच अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, सहाय्यक पोलीस अधीक्षक शुभम कुमार व अन्य वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी पोहचले आणि पाहणी केली. मृतदेह अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. पोलीस तपास सुरू असून, या महिलेबाबत कोणालाही काही माहिती असल्यास शिरजगाव कसबा पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. पोलीस लवकरच आरोपींचा तपास लावतील, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

# चाकूचा धाकावर २० हजारांची जबरी चोरी करणारा गजाआड

## शिरजगाव कसबा पोलिसांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** परतवाडा परिसरात एका ऑटोचालकाकडून चाकूचा धाक दाखवत २० हजार रुपयांची जबरी चोरी करणाऱ्या अनोळखी आरोपीला शिरजगाव कसबा पोलिसांनी अखेर जेरबंद केले आहे.

३ जुलै रोजी सकाळी मंगेश भाऊराव सोलव (वय ४४, रा. कु-हा, ता. चांदुरबाजार) हे आपल्या ऑटो क्रमांक एमएच ४९ ई २४५ ने कामासाठी परतवाडा येथे गेले होते. तिथे त्यांनी आपल्या भाच्याकडून २० हजार रुपये घेतले व रात्री साडेआठच्या सुमारास पुन्हा कु-हा गावाकडे निघाले. परतवाडा येथील गुजरीबाजारात तीन सवाऱ्यांनी त्यांचा ऑटो थांबवला.



दोन जण खरपी येथे उतरले, तर तिसऱ्या सवारीने आपले नाव अनिकेत सांगत करजगाव येथे जाण्याचे कारण दिले. खरपी टी-पॉईंट ओलांडल्यानंतर सुमारे १०० मीटर अंतरावर अनिकेतने ऑटो थांबवण्यास सांगितले. ऑटो थांबताच त्याने अचानक चाकू दाखवून सोलव यांच्याकडील २० हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतले आणि अंधाराचा फायदा घेत पळून गेला. आरोपी अनोळखी असल्याने शिरजगाव कसबा पोलिसांनी तात्काळ गुप्त माहिती संकलन सुरू केले. सोलव यांनी दिलेल्या नावावरून अनिकेत या नावाच्या व्यक्तीचा खरपी गावात शोध घेतला असता, तो व्यक्ती गावातून पळून गेल्याचे समजले. पुढील तपासात तो बडनेरा येथे लपून बसल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने बुधवारी बडनेऱ्यात धाड टाकून आरोपीला ताब्यात घेतले. सखोल चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडून १२ हजार रुपये रोख रक्कम, (पान २ वर)

# चिखलदराच्या प्रवाशाला ट्रेनमध्ये लुटले

## चॉकलेट मधून गुंगीचे औषध देणारा ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** कोकण कन्या एक्सप्रेस मध्ये चिखलदरासह अन्य एक प्रवाशाला चॉकलेट मधून गुंगीची औषध देऊन त्यांचे मोबाईल आणि पर्स पळवणाऱ्या चोरट्याला रेल्वे आरसीएफ पथकाने संगमेश्वर स्थानकावरून शिताफीने पकडले. मोहम्मद उस्मान धनी (वय २५, बिहार)



असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. माहितीनुसार चिखलदरा (पान २ वर)

# कृषी उत्पन्न बाजार समितीचे कृषी भवन वादात!

## सहाय्यक निबंधकाकडे लेखी तक्रार दाखल

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहरात कृषी उत्पन्न बाजार समितीने लाखो रुपये खर्च करून तालुक्यातील ग्रामिण भागातील शेतकरी, शेतमजूर यांच्या सोयीकरिता कृषी भवनाची भव्य इमारत उभारली व त्यावर नियंत्रण म्हणून स्थानिक सहायक निबंधक यांचे देखरेखी खाली तेथील कारभार चालायला हवा. मात्र असे प्रत्यक्षात दिसून येत नाही. कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव कृषी भवनाचा कारभार पाहत असून त्यांचे व बाजार समितीचे व वरिष्ठ अधिकारी यांच्या संगनमताने होत असलेला गैरप्रकार थांबला पाहिजे व सर्वसामान्य शेतकरी कष्टकरी यांना न्याय मिळाला पाहिजे याकडे प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे.



भामोद येथील शेतकरी हरिदास सहदेवराव खडे यांनी कृषी भवन येथे त्यांच्या मुलीच्या डोहाळे कार्यक्रमाचे आयोजन दि.२१जून रोजी केले होते.

त्यासाठी त्यांनी रितसर कृषी भवन बुक केले होते. नियमानुसार दोन हजार रुपयाची पावती ही देण्यात आली. बाकी कृषी भवनातील साहित्य व इतर सामानाच्या बाबत पैसे लागतील याबाबत साधी सूचना दिली नव्हती. कार्यक्रम संपल्यावर हरिदास खडे यांना ११००० रुपयाची मागणी केली. ती पूर्ण रक्कम खडे यांनी भरली. परंतु रक्कम भरल्या बाबत कुठल्याही प्रकारची पावती दिली नाही. याबाबत कृषी भवनाच्या व्यवस्थापनास विचारणा केली असता उडवा उडवी चे उत्तर देऊन खडे यांना अपमानित करण्यात आले.असा आरोप करण्यात आला आहे.

याबाबतची तक्रार हरिदास खडे यांनी दर्यापूर येथील सहाय्यक निबंधकाकडे लेखी स्वरूपात दाखल केली असून या तक्रारीवर सहाय्यक निबंधक (पान २ वर)

# नोकरीच्या नावावर ८.५० लाखांने गंडविले

## तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** सुशिक्षित बेरोजगार युवकांना आपल्या जाळ्यात ओढून त्यांना नोकरीचे आमीष दाखवून फसवणूक करणाऱ्या अनेक टोळ्या कार्यरत आहे. अशा युवकांची फसवणूक झाल्यानंतर लाखो रुपये उकळण्यात येतात.पोलिसात गुन्हे दाखल होतात, परंतु युवकांना त्यांची फसवणूक झालेली रक्कम काही केल्या मिळत नाही. याच श्रृंखलेत शहरातील एका युवकास





नोकरी लावण्याचे नावावर ८.५० लाखांनी गंडविण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. पोलिसांनी गुलजार पुरा येथील ६५ वर्षीय उत्तम वामनराव ढोरेंच्या तक्रारीवरून तीन आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. आरोपींमध्ये (पान २

# अमरावती शहरात 'मिशन फ्री फुटपाथ' अभियान

## महापालिका आयुक्त सौम्या शर्मा यांचे निर्देश

अमरावती/प्रतिनिधीः- अमरावती शहरातील रस्ते व फुटपाथवर झालेल्या अतिक्रमणामुळे नागरिकांना व विशेषतः विद्यार्थ्यांना चालण्यास अडथळा निर्माण होत आहे. या पार्श्वभूमीवर महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी 'मिशन फ्री फुटपाथ – फुटपाथ मोकळे' हे विशेष अभियान तात्काळ राबविण्याचे स्पष्ट



निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

शहरातील अनेक ठिकाणी व्यावसायिक दुकानदारांनी रस्ते व लगतच्या पादचारी मार्गावर अनधिकृत कच्चे व पक्के बांधकामे करून अतिक्रमण केल्याने वाहतूक व नागरिकांची सुरक्षितता धोक्यात आली आहे. महानगरपालिकेने या पायाभूत सुविधांसाठी शासकीय निधी खर्च करून कामे केली आहेत. मात्र अतिक्रमणामुळे या सुविधांचा उपयोग होऊ शकत नाही, हे लक्षात घेऊन (पान २ वर)

# लाचखोर कंत्राटी अभियंता एसीबीच्या जाळयात

## घरकुलाच्या हप्त्यासाठी १० हजार मागितले

**धारणी/प्रतिनिधीः-** रमाई आवास योजनेतून मंजूर घरकुलाचा तिसरा हप्ता देण्यासाठी १० हजारांची लाच मागणाऱ्या कंत्राटी अभियंत्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. ही कारवाई गुरुवारी (दि. १०) दुपारी पंचायत समिती धारणी कार्यालयात करण्यात आली. पकडण्यात आलेल्या अभियंत्याचे नाव पंकज रमेशराव निंघोट (वय ३०) असून तो शेंदोडा खुर्द (ता.



तिवसा) येथील रहिवासी आहे. सध्या धनई नगर, धारणी येथे भाड्याच्या घरात राहून तो पंचायत समिती धारणी येथे ग्रामीण गृहनिर्माण अभियंता म्हणून ठेका पद्धतीवर कार्यरत होता. दुनी (पान २ वर)

# शालेय वाहतूक अधिक सुरक्षित होणार

## स्कुल बस सुरक्षेसाठी पोलीस आयुक्तालयात बैठक

अमरावती/प्रतिनिधीः- अमरावती शहर व जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची शालेय वाहतूक अधिक सुरक्षित व्हावी, यासाठी गुरुवारी पोलीस आयुक्तालयात शालेय बस सुरक्षितता समितीची महत्वपूर्ण बैठक पार पडली. पोलीस आयुक्त अरविंद चावरीया यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत शालेय बस सुरक्षेसंदर्भातील धोरणात्मक निर्णय, अंमलबजावणी आणि शाळांमध्ये वाहतूक सुरक्षेचा आढावा घेण्यात आला.



या बैठकीस प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मीला पवार, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे यांच्यासह शिक्षण विभाग, मनपा, परिवहन विभाग, एसटी प्रशासन आणि विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शालेय वाहतूक समितीचे पदाधिकारी व स्कुल बस संघटनेचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व शाळांमध्ये शालेय वाहतूक समिती तात्काळ स्थापन करावी व प्रत्येकी तिमाही बैठक अनिवार्य करावी. शाळा सुटण्याच्या वेळा टप्प्याटप्प्याने (पान २ वर)

# खाजगी रुग्णालयातून मोबाईल चोरणारा अटकेत

## दोन्ही मोबाईल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील सिटी कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका खासगी रुग्णालयाच्या बेसमेंटमधून दोन मोबाईल चोरी केल्याच्या प्रकरणात पोलिसांनी चोरट्याला अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव शेख रौशन शेख इमाम (वय ३६, रा. आझाद नगर) असे आहे.



वाशिम जिल्ह्यातील शिवाजी नगर येथील वैभव सुरवे हे आपल्या वडिलांच्या उपचारासाठी अमरावतीतील एका खासगी रुग्णालयात आले होते. उपचारादरम्यान ते बेसमेंटमध्ये झोपले असताना अज्ञात चोरट्याने त्यांचे २ मोबाईल चोरी केले होते. या तक्रारीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणता (पान २ वर)

# दुकानफोडी प्रकरणातील दोन चोरटे गजाआड

## गाडगे नगर डीबी पथकाची कारवाई

अमरावती/प्रतिनिधीः- गाडगे नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या अर्जुन नगरमधील व्यापारी राहुल रोहेडा यांच्या ट्रेडिंग दुकानात १० जुलैच्या मध्यरात्री झालेल्या चोरीप्रकरणी गाडगे नगर डीबी पथकाने दोन आरोपींना अटक केली आहे. या चोरट्यांनी दुकानातून सुमारे २१ हजार रुपयांचा माल चोरून नेला होता. दुकानदाराच्या तक्रारीवरून गाडगे नगर



पोलिसांनी अज्ञात चोरांविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. यानंतर गुप्त माहिती आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलीस तपासात प्रगती झाली. डीबी पथकाने गजानन अरुण आत्राम (वय ४५, (पान २ वर)

# गावठी हातभट्टीसह ८१ हजारांचा मुद्देमाल जप्त

## मध्यप्रदेशातील आरोपी अटकेत

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती ग्रामीण पोलिस दलांतर्गत ब्राम्हणवाडा थडी पोलीस ठाण्याच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे धाड टाकून गावठी हातभट्टीची दारू आणि दुचाकीसह एकूण ८१ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी मध्यप्रदेशातील आरोपीस अटक करण्यात आली असून, त्याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

८ जुलै रोजी ब्राम्हणवाडा थडी पोलिसांना मिळालेल्या गुप्त बातमीच्या आधारे दुर्गेश माणिक मालवे (वय ३५, रा. चारघड धरण, परसाडा रोड परिसरात सोनोरा, ता. आठनेर, जि. बैतूल (म.प्र.) याला पकडले असता, त्याच्याकडे असलेल्या (पान २ वर)

# सासरच्या छळाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

## आईच्या तक्रारीवरून तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** सासरच्यांकडून शारीरिक व मानसिक छळ होत असल्याने कंटाळून हिरापुर येथील २७ वर्षीय विवाहितेने गळफास लावून आत्महत्या केली. या प्रकरणी मृत विवाहितेच्या आईने दत्तापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पतीसह सासरा आणि देवराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत विवाहितेचे नाव पूजा खडतकर (वय २७, रा. हिरापुर) असून तिचे लग्न ६ वर्षांपूर्वी (पान २ वर)

# राष्ट्रसंतांच्या महासमाधीस्थळी गुरुपौर्णिमा महोत्सव

## गुरुकुंज मोझरीत हजारो भाविकांची उपस्थिती

**गुरुकुंज मोझरी/प्रतिनिधीः-** अखिल विश्वाला मानवतेचा संदेश देणाऱ्या राष्ट्रसंत तुकडोजी तुकडोजी महाराज यांच्या महासमाधीस्थळी एक दिवसीय गुरुपौर्णिमा महोत्सवाला आज पहाटे ब्रह्ममहुर्तावर तीर्थस्थापना व सामुदायिक ध्यानाने या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची महासमाधी दिव्यांचा लख्ख प्रकाशाने,विविध आकर्षक रंगीबेरंगी फुलांनी



सजविण्यात आली होती. सकाळपासून भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.

गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वावर गुरुवारी हजारो गुरुदेवप्रेमींनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाना गुरुस्थानी ठेऊन आदरांजली अर्पण केली. या दिमाखदार



सोहळ्यात तमाम गुरुदेव प्रेमींनी प्रचंड गर्दी केली होती. ब्राह्ममहुर्तावर पहाटे चार वाजता राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या महासमाधीला यावेळी अभिषेक करण्यात आला. गुरुदेवप्रेमींनी गुरूमाऊलीला आदरांजली वाहताना एकापेक्षा एक सुमधुर सुहाय्य वंदनाने राष्ट्रसंतांची भजने सादर करण्यात आली.शंखाच्या ध्वनी नीनादनाने व राळ उदाच्या धुपाने (पान २ वर)

# दिवसा मजुरी, रात्री चोरी करणारे दोघे गजाआड

## -१४.३२ लाखांचा मुद्देमाल जप्त, -११ घरफोडीची दिली कबुली

**अकोला/प्रतिनिधीः-** दिवसा मजुरी आणि रात्री गुन्हेगारी करणाऱ्या दोन जणांच्या टोळीचा शहरातील खदान पोलिसांनी उलगडा केला आहे. पोलिसांनी दोन अट्टल चोरट्यांना ताब्यात घेऊन त्यांची कसून चौकशी केली असता त्यांनी तब्बल ११ ठिकाणी घरफोडी केल्याची कबुली दिली.शेख अहमद शेख उर्फ आरीफ (वय ४, रा.भगतवाडी, डाबकी रोड, अकोला), तेजस कैलास खोब्रागडे (वय ३२,रा.जुना तारफाईल, अकोला ) या आरोपींकडून पोलिसांनी १४.३२ लाखाचा मुद्दे माल जप्त केला आहे.शहरात चोरीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली होती. घर मालक बाहेर गावी गेल्यावर बंद घरांना लक्ष्य करून दागिण्यांसह रोख रक्कम लंपास करण्याचे सत्रच चोरट्यांनी सुरू केले होते. आरोपींना गजाआड करण्याचे आव्हान पोलिसांपुढे होते. दरम्यान, २४ जून रोजी यज्ञेश मोहन जोशी, रा. केशव नगर यांनी खदान पोलीस ठाण्यात घरी चोरी झाल्याची तक्रार दिली.ते काही कामानिमित्त बाहेर गावी गेले होते. परत आल्यावर घर विस्कळीत झाल्याचे दिसून आले. त्यांनी पाहणी केल्यावर घरातून ४७ हजार २०० रुपये चोरी गेल्याचे उघडकीस आले. या प्रकरणी खदान पोलिसांनी कलम ३११ (४), ३०५ बी.एन.एस अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. या प्रकरणाच्या तपासादरम्यान गुप्त माहितीवरून आरोपी शेख अहमद शेख उर्फ आरीफ व तेजस कैलास खोब्रागडे यांना ताब्यात घेऊन सखोल चौकशी करण्यात आली. या आरोपींनी खदान पोलीस ठाण्यांतर्गत घरफोडीचे एकूण ११ गुन्हे केल्याची कबुली दिली आहे. आरोपींच्या ताब्यातून ११३ ग्रॅम सोने किंमत १० लाख १७ हजार, चांदी २. ९१० किलो किंमत २ लाख ६१ हजार, गुन्हयात वापरलेल्या दोन दुचाकी कि.१ लाख ५० हजार व इतर साहित्य ५०० रुपये असा एकूण १४ लाख ३२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.